

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १९ मार्च २०२३



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

समोरच्या व्यक्तीनं सुद्धा समजून घेतलं पाहिजे तरच सांगण्याला, बोलण्याला काही अर्थ उरतो. बाळा, घेशील ना मला समजून... ?'
तिचे डोळे पाणावले होते. उरात हुंदका दाटून आला होता. मी तिच्या चरणांना वाकून स्पर्श केला. माझ्याजवळही आता शब्द नव्हते. मी फक्त एवढंच म्हटलं, ' आई, पाठीवर हात ठेवून फक्त लढ म्हण...' तिचा मोरपिशी हात पाठीवरून फिरला. काय नव्हतं त्या स्पर्शात ! ज्ञानोबा, तुकोबा, सावरकर, कुसुमाग्रज आदी सर्व मराठी सारस्वतांचे आशीर्वाद त्यात सामावले होते. मी भारावून वर पाहिलं, तर माऊली अदृश्य झाली होती. गोदामाई शांततेत वाहत होती. माईला मनोमन नमस्कार केला. तिची मूक संमती घेऊन मार्गस्थ झालो. दिव्यांनी रस्ते उजळले होते आणि तारकांनी आकाश... ! मराठीमध्ये लग्न पाहावे करून आणि घर पाहावे बांधून अशी एक म्हण आहे. जो कोणी या अनुभवातून जाईल त्यालाच त्यातला गहन अर्थ कळतो. म्हणतात ना ' जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे .' काय एकेक म्हणी आठवताहेत आज ! आपल्या मराठी भाषेचा प्रभाव, दुसरं काय ! तर ते असो. झालं असं की काही दिवसांपूर्वी मी एका लग्नाला गेलो होतो. लग्न केल्याचा आणि घर बांधल्याचा असे दोन्ही अनुभव मी घेतले. त्याला बरीच वर्षे झाली. त्याबद्दल नाही बोलत मी. उगीच कशाला सांगायचे ते ! अहो, आपले अनुभव आपल्यापाशी असलेले बरे. नाहीतर कोण काय म्हणेल काही सांगता यायचे नाही. हां, तर मी काय सांगत होतो ? तर मी एका लग्नाला गेलो होतो. आता तुम्ही म्हणाल यात काय विशेष आहे ? आम्ही सगळेच जातोच की लग्नाला. तर मंडळी, मला काय म्हणायचे आधी नीट ऐकून तर घ्या.






## आनंदी पहाट

## भीतीयुक्त आदर काय उपयोगाचा... ?

आधुनिक केसरी

जगाच्या पाठीवर कोणत्याही प्रांतात आपण गेलो तर, आपल्याला नव्यानं भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला नमस्कार करण्याची पारंपारिक प्रथा सर्वत्र आहे. अर्थात, प्रत्येक प्रांतात नमस्काराची पद्धत निराळी असते; परंतू हेतू मात्र बहुतांशी सारखाच आणि एकच असतो, तो म्हणजे आपल्या अंतर्मनातील आदरभाव व्यक्त करणं होय. ज्याठिकाणी आपण आदर व्यक्त करतो त्याचठिकाणी आपण नमस्कार करतो, काहीवेळा तर नतमस्तक देखील होतो. जेव्हा आदर दिला जातो, तेव्हाच तो आपल्याला मिळायलाही लागतो, हे आपण अनुभवत असतो. आपल्या प्रत्येक


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

क्रियेला प्रतिक्रिया असते, जशी क्रिया तशी प्रतिक्रिया. म्हणूनच आपल्या नमस्काराच्या क्रियेला नमस्काराचीच प्रतिक्रिया मिळते. ह्या नमस्काराची सुरुवात आपल्या घरापासूनच होत असते. मातृ-पितृ-आचार्य देव भवं म्हणताना आपल्यासंस्कारक्षम मनाला आई-वडील-गुरु ह्याच्यापुढे नतमस्तक होण्याची सवय जडलेली असते. तेव्हापासून नमस्काराचा चमत्कार आपण अनुभवत आलेले असतो. वडिलधाऱ्या व्यक्तींना नमस्कार करणं हा आदराचा भाग झाला, परंतू तो नमस्कार जेव्हा भीतीयुक्त असतो, तेव्हा मात्र त्यांतून नेमकं काय साध्य होत असतं, हेच उमगत नाही. काहीवेळा एखाद्या व्यक्तीला अव्हेरून, टाळून चालत नाही; पर्याय नाही म्हणून देखील नमस्कार करावा लागत असतो. तर काहीवेळा, तो भीतीपोटी देखील करावा लागतो. खरं तर, भीतीयुक्त आदर आणि त्यासाठी केला जाणारा नमस्कार, जी व्यक्ती तो करून घेते त्या व्यक्तीला देखील का बरं तो इतका प्रतिष्ठेचा, महत्वाचा, मोलाचा वाटत असतो ? त्याची त्यांना काही जाणीवच होत नसते का ? कि केवळ स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी आणि मोठेपणासाठी तो करून घेतला जात असतो. काही घरांमध्ये अजूनही आणि आजही वडिलकीच्या पिढीमध्ये भीतीयुक्त आदर जपल्याचं दिसून येतं.

## अनमोल नाती....

आधुनिक केसरी

जन्माने मिळालेली अनेक नाती आपल्या भोवती असतात. पण आपल्या प्रेमाने, स्वभावाने, कर्तुत्वाने, मिळालेली देखील खूप नाती असतात. पण फक्त नाते निर्माण न करता ते निभवता आले पाहिजे. व्यक्तीतील गुणदोष स्वीकारले पाहिजे. तरच आपले नाते टिकून राहते ,निभावले जाते. लहान मुलांची शालेय मैत्री खूप निखळ असते. जीवापाड जपतात ते आपल्या मैत्रीला. कधी कधी मोठ्या माणसांमुळे किंवा काही चाणाक्ष मुलांमुळे त्या मैत्रीत बाधा पण येत असते. पण मैत्रीत चाणाक्ष, चतुर, हुशार, खरा, खोटा, साधा, भोळा, विसराळू, गरीब, श्रीमंत हा भेद नकोच. त्या व्यक्तीवर तुम्ही प्रेम करा. त्याच्या परिस्थितीवर नको! हेच तर मुलांना शिकवायचे आहे. माणसं ओळखायला पण त्यांना शिकवायचे आहे. विचार जुळले की मैत्री होते. नाते निर्माण होते. जिथे विचार जुळत नाही तिथे कदाचित मैत्री होईलही, पण नातं निर्माण होणार नाही. वरवरची मैत्री असेल तर धोका होता कामा नये. आपणही कोणाला धोका देऊ नये. आणि धोकेबाज पण वेळीच ओळखा. आपल्या प्रगतीत अडसर ठरणाऱ्या मैत्रीला, नात्याला वेळीच दूर करा. थोडी हुरहुर वाटेल, वाईट वाटेल पण ठेच लागण्यापासून वाचाल. ठेच लागणारं नातं नको आहे. नातं कसं अनमोल हवं. मित्राचा एखादा मेसेज, फोन, विचार हा आपल्यासाठी प्रेरणादायी असावा. मार्गदर्शक असावा. प्रेम, युद्ध, मैत्री यात सारं माफ असतं म्हणे. पण ठराविक गोष्टींना येथे पण माफी नसते. मग तिथे युद्ध, तह हेच अपेक्षित असतं .युद्धापेक्षा तह बरा, थोड्याफार अटी, शर्ती ठेवून केलेला. त्यात फार नुकसान होत नाही .नात्यांमध्ये किंतु परंतु नकोच. त्या नात्यांना मग घरघर लागते. नातं असं असावं ते शेवटपर्यंत सावलीसारखं सोबत असावं. त्यात प्रेम असावं. जिव्हाळा असावा. आपुलकी, काळजी असावी .तरच त्या नात्याला अनमोल नातं असं म्हणता येईल. असं अनमोल नातं आधी आपल्याला आपल्यात व मुलांमध्ये निर्माण करायचं आहे....

संस्कारधन


सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-66

## भगवान बुद्धांनी सांगितलं – सगळ्याचं हित करा

आधुनिक केसरी

एका दिवशी एक व्यक्ती भगवान बुद्धाकडे गेला. तो खूप तणावाखाली होता. त्याच्या डोक्यात अनेक प्रश्नांचं काहूर माजलं होतं. जसं आत्मा म्हणजे काय? मृत्यूनंतर माणूस कुठे जातो, सृष्टीची रचना कोणी केली, स्वर्ग-नरकाचं सत्य नेमकं काय आणि ईश्वर आहे की नाही? त्याला या प्रश्नांची उत्तर मिळत नव्हती. जेव्हा तो भगवान बुद्धांकडे पोचला तेव्हा त्याने पाहिलं की, अनेक जण त्यांच्या आसपास बसले आहेत. भगवान त्या सगळ्यांच्या प्रश्नांच समाधान अत्यंत सहजतेने करत आहेत. खूप वेळ हा उपक्रम सुरू होता. पण बुद्ध सगळ्यांना संतुष्ट करत होते. ती व्यक्ती त्यांचे असे हाल पाहून हैराण झाली. त्याने विचार केला की, भगवानांना दुनियादारीच्या प्रकरणात पडून काय फायदा आहे? त्यांनी भजन करावं आणि साधारण समस्या असणाऱ्या लोकांना दूर करावं. पण भगवान बुद्धांना पाहून तर असं वाटत होतं की, त्या लोकांचं दुःख जणू भगवानांचं दुःख आहे. शेवटी एका व्यक्तीने तो प्रश्न विचारलाच की, महाराज



तुम्हाला संसाराच्या गोष्टींबाबत काय देणंघेणं? तेव्हा बुद्ध म्हणाले की, मी ज्ञानी नाही आणि मी एक माणूस आहे. तसंही ज्ञान काय कामाच, जेव्हा एखादा गर्विष्ठ आणि आत्मकेंद्री होऊ दुसऱ्यांच्या चिंतेला आपली मानू शकणार नाही. असं ज्ञान तर अज्ञानापेक्षाही वाईट आहे. बुद्धाचं बोलणं ऐकून आलेल्या व्यक्तीच्या मनातील शंका दूर झाली. त्या दिवसापासून त्याच्या वागण्याबोलण्यात फरक पडला.


## निरुपण

आधुनिक केसरी


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

चित्ते हि पवित्रे जाते
तथैव सदनं भवेत्।
पवित्रे सदने स्वयं
सम्पदाऽयाति शाश्वती॥3॥
चित्त पवित्र झाले, तर घर तसेच म्हणजे पवित्र होईल. आणि अशा पवित्र घरात शाश्वत सम्पदा स्वतःहून येते.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**तृण घर तृण शैय्या हवै, अग्नि लगै जर सोय । तामहँ सोय सुख चाहहीं, त्यों जग की गति होय ।।१८८।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१८८**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

सुकलेल्या गवताची शय्या आणि त्याचीच चादर आहे. त्याला आग लागलेली आहे आणि ते हळूहळू जळत आहे. अशा शैय्येवर सुखनिद्रा घेणारा किती अज्ञानी आहे. तो त्या गवताबरोबर जळून भस्म होणार आहे. हीच गती संसारातील अज्ञानी जीवांची आहे, जे नश्वर संसारातील विविध भोगांचं सुख मिळवण्यात मग्न आहेत. सत्य आणि शाश्वत सुख परमेश्वरात आहे. म्हणून मनुष्यजन्मातच परमेश्वरप्राप्ती साठी प्रयत्न केला पाहिजे. संसाराची क्षणभंगूरता विसरता कामा नये.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

समाजात आपण वेगवेगळ्या प्रकारची माणसं पहातो.कणी खुपच प्रेमळ असतात, तर काही रागीट स्वभावाची असतात. काही लबाड असतात, संधीसाधू असतात. तर काहीचां जन्मच जणू दुसऱ्यांचे कल्याण करण्यासाठी झालेला असतो. अशी माणसं स्वतः साठी कमी व समाजासाठी जास्त जगत असतात. अशी सत्वगुणी माणसं आहेत म्हणून तर समाजात नितीमुल्ये टिकवून आहेत. तमोगुणी व रजोगुणी माणसांमुळे समाजाला हानी पोहचते. तर सत्वगुणी माणसांमध्ये देखील निव्वळ शुध्द भगवंताची आवड असणारे माणसं सर्वात कमी असतात. त्यांना फक्त परमार्थ साधण्याची हौस असते. म्हणून त्यांना आत्मज्ञान प्रतिपादन करणा-या अद्वैत ग्रथांची आवड असते. बाकीच्यांना इतर विषयांची ओढ असते. ज्ञानमार्गी आहे त्यास ज्ञानाची ओढ असते. भक्तांना भजन आवडते. तर साधकाचा सगळा वेळ साधन मार्गातचं जातो. कंजूस माणसाला द्रव्य आवडते.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

**धन मेळविलें कोडी । काळ घेतल्या न सोडी ॥३॥**
**कामा न ये हा परिवार । सैन्य लोक बहु फार ॥४॥**
**तंववरि मिरविसी बळ । जंव आला नाहीं काळ ॥५॥**
**तुका म्हणे बापा । चुकवीं चौऱ्याशींच्या खेपा ॥६॥**
**कानडीनें केला मऱ्हाटा भ्रतार । एकाचें उत्तर एका न ये ॥१॥**
**तैसें मज नको करूं कमळापति । देई या संगति सज्जनांची ॥ध्रु.॥**
**तिनें पाचारिलें इल बा म्हणोन । येरु पळे आण जाली आतां ॥२॥**

# परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे

आधुनिक केसरी

आईकरिता रडत असलेले मूल आई भेटल्याशिवाय रडणे थांबवत नाही, त्याप्रमाणे, समाधानाकरिता, आनंदाकरिता, धडपडणारा आपला जीव, परमेश्वर प्राप्त झाल्याशिवाय शांत राहू शकत नाही. म्हणून प्रपंचाची काळजी न करता, परमेश्वराची प्राप्ती कशी होईल याची काळजी करा. भगवंतावर संपूर्णपणे निष्ठा ठेवल्याशिवाय आपली प्रपंचाची काळजी दूर होणार नाही. सर्व जगताचा जो पालनकर्ता, तो आपले पालन नाही का करणार ? प्रत्येक गोष्ट त्याच्याच सत्तेने होते हे लक्षात ठेवा, मग प्रपंच कधीही बाधक होणार नाही. एक भगवंतावरची निष्ठा मात्र शेवटच्या श्वासापर्यंत सांभाळा. आपण पुराणात वाचलेच आहे की, भीष्माने पांडवांना मारण्याची प्रतिज्ञा केली. भीष्मप्रतिज्ञाच ती, मग ती खोटी कशी होऊ शकेल ? सर्व पांडव चिंताग्रस्त झाले, पण द्रौपदीची निष्ठा मात्र जबरदस्त होती. ती म्हणाली, "आपण श्रीकृष्णाला विचारू." तिने सर्व वृत्तांत त्याला कथन केला. श्रीकृष्ण म्हणाला, "भीष्माची प्रतिज्ञा खोटी कशी होईल



? तरी आपण एक प्रयत्न करून बघू." तो म्हणाला, "द्रौपदी, तू आता असे कर, रात्री भीष्माचार्यांच्या आश्रमात जा. तिथे फक्त संन्याशांना आणि स्त्रियांना मुभा आहे. मी तुझ्याबरोबर आश्रमापर्यंत येतो." त्यानंतर श्रीकृष्ण द्रौपदीला घेऊन भीष्माचार्यांच्या आश्रमापर्यंत गेले आणि बाहेरच तिचे अलंकार आणि इतर वस्तू सांभाळत बसले. श्रीकृष्णांनी तिला आत जाताना सांगितले की, "भीष्माचार्य आता झोपत आहेत, अशा वेळी तू आत जा आणि बांगड्या वाजवून नमस्कार कर." त्याप्रमाणे द्रौपदी आत गेली, आणि बांगड्या वाजवून भीष्माचार्यांना तिने नमस्कार केला. त्यांनी लगेच तिला "अखंड सौभाग्यवती भव" म्हणून आशीर्वाद दिला. मग त्यांनी पाहिले तो द्रौपदी ! तेव्हा ते म्हणाले, "द्रौपदी ही अक्कल तुझी खचित नव्हे; तुझ्याबरोबर कोण आहे ते सांग." ती म्हणाली, "माझ्याबरोबर गडी आणला आहे; तो बाहेर उभा आहे." भीष्माचार्यांनी बाहेर येऊन पाहिले. त्यांनी श्रीकृष्णाला ओळखले, परंतु आता सर्व काम होऊन चुकले होते. म्हणून म्हणतो, परमात्म्यावर पूर्ण निष्ठा पाहिजे. या निष्ठेच्या आड जर काही येत असेल तर तो म्हणजे आपला अभिमान. हा अभिमान सर्वांना घातक आहे. तो घालवण्यासाठीच परमात्म्याला वारंवार अवतार घेणे भाग पडले. ही अभिमानाची हरळी नाहीशी व्हायला भगवंताच्या नामासारखा दुसरा उपाय नाही. नामावर प्रह्लादाने जशी निष्ठा ठेवली तशी ठेवावी. त्याने नाम श्रद्धेने घेतले आणि निर्विषय होण्याकरिता घेतले, आपण ते विषयासाठी घेऊ नये. नामापरते दुसरे सत्य नाही हे समजावे. याच जन्मात हे नाम शांतीचा आणि समाधानाचा ठेवा मिळवून देईल. **आजचे बोधवचन आहे – नामस्मरणात स्त्रीपुरूष, श्रीमंतगरीब, हे भेद नाहीत.**




रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, १९ मार्च २०२३


# महाराष्ट्राला आर्थिक खड्ड्यात टाकण्याचा डाव ?




कमलाकर जोशी

ज्येष्ठ पत्रकार, नांदेड

संपर्क क्र. 9422170850


आधुनिक केसरी

**भारतीय लोकशाही प्रत्येकाला अधिकार मागण्याचा अधिकार आहे, पण त्याच बरोबर त्यांना कर्तव्याची जाण असणे महत्वाचे आहे. महाराष्ट्रात आज शेतकरी, असंघटित क्षेत्रातील कामगार, कंत्राटी कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक यांच्या आज जीवन -मरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. यांना कोणतेही निवृत्ती वेतन मिळत नाही. दुसरीकडे शासकीय कर्मचाऱ्यांना गल्लेलठ्ठ वेतन मिळत असतानाही १८ वर्षापूर्वीची जुनी निवृत्ती वेतन योजना'जुने ते सोने' वाटत असल्याने पुन्हा हवी आहे. शासकीय कर्मचाऱ्याची ही मागणी महाराष्ट्राच्या हिताची आहे काय ? तरीही शिंदे - फडणवीस सरकारने तत्वतः मागणी मान्य केली आहे. संघटनेने चर्चा करून त्यामार्ग काढण्याऐवजी 'आधी घोषणा करा'अशी आडमुठे भूमिका घेतली आहे.**

स्वातंत्र्यानंतर देशात पहिला १८७७ मध्ये नागपूर मील कामगारांनी संप केला होता.१९७४ मध्ये कामगार नेते जार्ज फर्नांडीस यांचे नेतृत्वाखाली रेल्वे कर्मचाऱ्यांचा संप झाला होता.ता मीळनाडूत २००३ मध्ये दहा लाख कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. पण राज्य सरकारने कारवाई बडगा उभारला २ हजार कर्मचाऱ्यांना अटक झाली व २ लाख कर्मचाऱ्यांची सेवा समाप्तीचे आदेश काढले होते. देशात कर्मचाऱ्यांसाठी वेतनाबाबत पहिला वेतन आयोग जानेवारी १९४६ मध्ये श्रीनिवासन वरदाचारियर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केला गेला.नंतर दर दहा वर्षानी वेतन आयोग स्थापना करण्यात येते. पहिला वेतन आयोग-१९४७-१९५९ दुसरा- १९५९-१९७३,तिसरा- १९७३-१९८७, चौथा-१९८७-१९९६, पाचवा- १९९६- २००६, सहावा- २००६- २०१६ सातवा- २०१६- २०२४ या वेतनानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होत गेली.१९४७ मध्ये किमान ५५ रूपये कमाल २ हजार रूपये मिळत होते. १९५७ मध्ये कुटुबांचे पती,पत्नी, २ मुले यांचा अन्न,वस्त्र,निवारा,इंधन आदीचा खर्च गृहीत धरुन किमान वेतन ७ हजारावरुन १८ हजार रूपये व कमाल वेतन २ लाख ५० हजार रुपये इतके निश्चित केले गेले पण आज खासगी कापड हॉटेल,धान्य बाजार,,जनरल स्टोअर्स,इतर दुकान कामगारांना ६ हजार रूपायाच्यावर वेतन मिळत नाही. तेथे कामगार कायदे वैद्यकीय लागू नाही. पण त्यात शासकीय कर्मचाऱ्यांना मोठ्या प्रमाणात वेतन, इतर सर्व सोयी मिळतात. म्हणून अनेक शेतकरी सुध्दा मुलाला शासकीय नोकरी लावण्याचे शेती विकतो तो उगाच नाही! या संपात शेतकऱ्यांची मुले त्यांनी आहेत, त्यांनी तरी आपल्या कष्टकरी बापाचा विचार करावा! पूर्वी म्हणायचे 'उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी' होती.पण आता सर्व उलटे झालेले आहे. सरकार चालविण्यासाठी शासन व प्रशासन हे दोन्ही चाके महत्वाची आहेत, लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारी कर्मचारी हे जनतेचे सेवक आहेत, ते मालक नाहीत. पण आज प्रशासनात अधिकारी, कर्मचारी मुजोर व मालक बनले आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन व त्यांचे अधिकार मिळावेत, यात दूमत नाही. पण त्याला मर्यादा असल्या पाहिजेत.

महाराष्ट्रात ६ नोव्हेंबर १९६२ मध्ये राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटनेची स्थापना झाली. तेंव्हापासून या संघटनेने राज्यात अनेकवेळा संपाचे अस्त्र उगारले होते. १९६६ मध्ये सामूहिक रजा आंदोलनाचा संप झाला होता. १९७० च्या संपाच्या काँग्रेस सरकारने 'एस्मा' कायद्याखाली संघटनेच्या नेत्यांना तुरूंगात टाकले होते. १९७५ मध्ये ३७ दिवस संप झाला होता. तत्कालिन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे काळात कर्मचाऱ्यांचा ५४ दिवसाचा संप झाला.तेंव्हा त्यांनी या कर्मचाऱ्यांना 'एक खडकू सुध्दा वाढवून मिळणार नाही',अशा शब्दात सुनावले होते. काँग्रेस सरकारने कर्मचाऱ्यांचे संप मोडीत काढण्याचे अनेकवेळा प्रयत्न केले आहेत. राज्य कर्मचारी संघटनेने संपाचे अस्त्र उगारून केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आयोग व महागाई भत्ता लागू करून घेतला. यात शिंदे - फडणवीस सरकारने फेब्रु.२०२३ मध्ये सातवा वेतन आयोगाच्या शिफारशी २०१६ पासून लागू केल्या. यातून महाराष्ट्र सरकारवर वार्षिक १४ हजार कोटी व ३ वर्षाची थकबाकीसह ३८ हजार ६५५ कोटी रुपये खर्च होणार आहे. यातून कर्मचाऱ्याचे वेतन ५० हजार ते २ लाख ५० हजार रूपायाचे वर गेले आहे.महाराष्ट्र शासनाच्या ३१ आक्टोबर २००५ च्या राजपत्र प्रसिध्द झाले.तेंव्हा तत्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख व अर्थमंत्री जयंत पाटील हे होते. त्या सरकारने जुनी वेतन योजना बंद केली आहे,ते आपले कृत्य लपवित आहेत. त्या राजपत्रात केंद्राच्याधर्तीवर नवीन परिभाषात अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे,असे स्पष्ट नमुद केलेले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) व महाराष्ट्र नागरी सेवा १९८४ ( निवृत्तीचे अंशराशीकरण ) आणि सध्या अस्तित्वात असलेल्याभविष्य निर्वाह निधी योजनेच्या तरतूदी शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना १ नोव्हेंबर २००५ लागू होणार नाहीत,असे स्पष्ट उल्लेख आहे. तेंव्हा राज्य कर्मचारी संघटनेच्या नेत्यांना 'कुंभकर्णी' झोप लागली होती काय ? आता १८ वर्षानंतर जाग आली आहे! तेंव्हा २००४ ते २००९ केंद्रात मनमोहनसिंग व महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार होते. केंद्रात वाजपेयी सरकार असताना निवृत्ती वेतन योजना बंद केली, असा अप्रचार काँग्रेस व भाजपाविरोधी मंडळी करत आहेत. नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष मान्टेकसिंग अहलुवालिया यांनी जुनी निवृत्ती योजना लागू करणे, म्हणजे मूर्खपणाचे आणि राज्यांना दिवाळीखोरीकडे नेणारा आहे,असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. त्याकडे दुर्लक्ष केले गेले. तरी देशात विरोधी पक्षाने सहा राज्याच्या निवडणुकीत जुनी निवृत्ती वेतन देण्याची घोषणा केली. त्यातून सत्ता मिळविली.यात राजस्थान, पंजाब, छत्तीसगड, झारखंड, हिमाचल प्रदेश या पाच राज्यांनी पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू केली. पण या योजनेमुळे या राज्यासमोर खर्च कितीतरीपटीने वाढणार आहेत.पण या राज्याच्याधर्तीवर महाराष्ट्रातही जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याची मागणी राज्य शासकीय कर्मचारी संघटना करत आहे. यामागे काँग्रेस पक्षाचा राष्ट्रवादी काँग्रेसची फूस आहे. देशात जुनी निवृत्ती वेतन योजना ( ओ. पी.एस. ) व नवीन निवृत्ती वेतन योजना( एन.पी.एस. ) योजनेबाबत गोंधळ चालू आहे.जुनी वेतन योजनेत कर्मचारी निवृत्त झाला तर शेवटच्या वेतनाच्या पन्नास टक्के निवृत्तीच्यावेळी निवृत्ती म्हणून दिली जाते. या योजनेत भविष्य निर्वाह निधी ( जी.पी.एफ ) ची तरतूद आहे यात २० लाख रूपायांपर्यंत उपदान ( ग्रॅच्युईटी ) मिळते. तसेच कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीला वेतनाच्या तीस टक्के रक्कम मृत्यूपर्यंत दिली जाते. तसेच केंद्राप्रमाणे महागाई भत्ता देण्याची तरतूद या कायद्यात आहे. एवढेच नव्हे, जुन्या निवृत्ती वेतन योजनेत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून एकही पैसा न करता संपूर्ण रक्कम सरकारच्या तिजोरीतून खर्च केली जात असे.राज्य कर्मचारी संघटनेच्या संमतीने केंद्रीय वेतन आयोगानुसार वेतन वाढ व महागाई भत्ता आणि २००५ नंतर नवीन नोकरीत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना ही निवृत्ती योजना बंद करण्याचा निर्णय घेतला.नवीन निवृत्ती योजनेत कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनातून दहा टक्के महागाई भत्ता कापला जातो, त्यात राज्य सरकार १४ टक्के जमा करते. म्हणजे निवृत्त कर्मचाऱ्यांना २४ टक्यातून ६० टक्के एक रक्कमी रक्कम दिली जाते नंतर ४० टक्के रक्कम दिली जाते. शासकीय कर्मचाऱ्यात मोठ्या प्रमाणात वेतन वाढ व महागाई भत्ता मिळत असताना पोट भरलेले नाही. जगात अनेक राष्ट्रात कर्मचाऱ्यांच्या अशंदान सहभागावर आधारित आहे.यात जर्मनमध्ये वीस टक्के वाटा भरावा लागतो. अमेरिकेत निवृत्ती वेतन कपात ३.३ टक्के आहे. इस्राईल, इग्लंड, आस्ट्रेलिया,थायलंड या देशात कर्मचाऱ्यांच्या कामानुसार वेतन व योगदानावर निवृत्ती वेतन दिले जाते. राज्य सरकार व कर्मचारी संघटनेत यावर चर्चा झाली आहे. महाराष्ट्राचे २०२२-२३ चे महसूल उत्पन्न ४ लाख ४९ हजार ५२२ कोटी रूपये आहे.त्यात वेतन, निवृत्ती वेतनावर महसूली उत्पन्नाच्या ५९.४६ टक्के खर्च होतो. नवीन निवृत्ती वेतन योजना लागू केल्यास राज्यावर १ लाख १० हजार कोटी रू.चा अतिरिक्त बोझा पडणार आहे. त्यात राज्यावर कर्जाचे बोजा ७ लाख ७ हजार रू. कोटीच्यावर जाण्याची शक्यता आहे. राज्याचा खर्च ८५ टक्के वाढणार आहे. तेंव्हा जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करुन राज्याला आर्थिक पुन्हा संकटात टाकणारे आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'जुनी निवृत्ती वेतन योजना लागू केल्यास त्याचे राज्याला आज नव्हे २०३० नंतर त्याचे आर्थिक परिणाम भोगावे लागणार आहेत! हे निश्चितच! सगळे सोंग करता येतात, पैश्याचे सोंग करता येत नाही. राज्यात कोणतेही पक्ष सत्ते येईल आणि जाईल,पण महाराष्ट्र वाचला पाहिजे. फडणवीस यांनी राजकीय नेत्यांना सावध केले आहे. आम्हाला सत्तेसाठी निवडणूक ही महत्वाची नाही, महाराष्ट्र हित महत्वाचे आहे' त्यांनी म्हटले आहे. हे सरकार शासकीय कर्मचाऱ्यांच्या विरोधात नाही, त्यांना निवृत्तीवेतन व इतर हक्क मिळाले पाहिजे,हे या सरकारने तत्वतः मान्य केले आहे.त्यासाठी प्रशासकीय अर्थतज्ज्ञ सुबोधकुमार, सुधीरकुमार श्रीवास्तव व के. पी. बक्षी यांची अभ्यास समिती नियुक्ती केली आहे. या समितीच्या अहवालानंतर योग्य निर्णय घेवू,अशी सकारात्मक भूमिका घेतली आहे.पण कर्मचारी संघटनेने 'आधी घोषणा करा" मगच अभ्यास करा अशी आडमुठी भूमिका घेतली आहे,ती योग्य नाही.ही संघटना 'एकच मिशन, जुनी निवृत्ती योजना' अश्या घोषणाच्या गांधी पांढऱ्या टोप्या' घालून संपात उतरला आहे. कर्मचारी संघटना या योजनेचा राज्याच्या तिजोरीवर बोझा पडणार नाही, असे म्हणते आहे.तर सातव्या वेतन आयोगाच्या वेतन सुधारणा समितीचे अध्यक्ष के.पी. बक्षी व सदस्य सीताराम कुंटे, राजीव कुमार मित्तल हे प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी होते. त्यांच्या अहवालात राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या ५० टक्के पेक्षा जास्त खर्च वेतन,निवृत्ती वेतन होत असल्याचे म्हंटले आहे.तेंव्हा राज्य शासनाचा प्रशासकीय खर्च वाढत चालला आहे,हे मान्य करावा लागेल त्याच बरोबर खासदार व मदारांना निवृत्ती वेतन मिळते.ते सुध्दा बंद झाली पाहिजे हे सामन्य माणसाचे मत आहे. पण सगळेच राज्याची लुट करू पहात आहेत.या संघटनेने लोकप्रतिनीधींचे वेतन व भत्ते बंद केले पाहिजे. लोकप्रनिधी हे लोकसेवक आहेत,ते निवडणुकीत कोट्यवधी रूपये खर्च करणारे जेव्हा त्यांना वेतन, सवलती, निवृत्ती वेतन घेतात, तेंव्हा त्यांना थोडीशी शरम वाटत नाही. ते जर दारिद्र्यरेषेखालील लोकप्रतिनिधी आहेत. मोदी सरकारने निर्णय घेतला पाहिजे. काँग्रेस व विरोधी पक्ष तसा प्रस्ताव का आणीत नाही. कर्मचारी संघटनेने यासाठी संप केला असता तर किमान जनतेची सहानुभूती तरी मिळाली असती. लोकप्रतिनिधी शेतकरी, गरीब कुटुंबाला मदत देण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडे पैसा नाही, तर मग शासकीय कर्मचाऱ्यांचे लाड कशाकरिता ? असा सवाल विरोधी का करत नाही ? संघटनेने चर्चा करुन व पर्याय शोधावा. पण तसे न करता संप करणे व जनतेला वेठीस धरणे कितपत योग्य आहे. यात शासकीय कर्मचारी कार्यालयात किती काम करतात ? याचे कधीही मुल्यमापन होत नाही. ते सामान्य नागरिकांची अडवणूक केली लाच मागितली जाते.भ्रष्टाचाराला करतात, नेत्यांना साथ देतात. त्यामुळे जनतेत नाराजी आहे.खासगी क्षेत्रात "वर्कशीट' तयार केली तरच पगार मिळतो.पण येथे अनेकांना काम न करता वेतन दिले जाते.'रोहयो'च्या मजुरांना कामाशिवाय मजुरी मिळत नाही. मग शासकीय कर्मचारी हे शासनाचे जावाई आहेत काय ?तत्कालिन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी संपकाळात नवीन तरूणांची भरती केली होती. तेंव्हा शासनाने तसा बडगा उगारलाच पाहिजे, या संपाबाबत शेतकरी, सामान्यांच्या नाराजीच्या संतप्त प्रतिक्रिया सोशल मिडीयावर येत आहेत. राज्याचा २०२० मध्ये अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना जुन्या निवृत्ती योजनेची गरज नसल्याचे म्हंटलेले होते. आता सत्ता जाताच त्यांचे सूर बदलले आहेत. त्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना जिव्हाळ्याची वाटत आहे. विरोधी पक्षाने संपात 'आगीत तेल' टाकण्याचे काम करून महाराष्ट्र द्रोह करण्याचे तरी पाप करू नये. या सरकारने अर्थसंकल्पात बळीराजा. अंगगणवाडी सेविका, समाजातील विविध घटकांना मदत देण्याचा प्रयत्न केला आहे,ती चूक आहे काय ?. तेंव्हा विरोधी मंडळी हे राज्य सरकार पैसा कोठून आणणार ? अशी चिंता व्यक्त करत होते.तेंव्हा काँग्रेस चाटुकारांची' पोटदुखी वाढली होती.पाश्चिमात्य संस्कृतीत जे वाढले त्यांना नित्य मद्यपान व हाडकाच्या स्वादीष्ट चवीची सवत असते, त्यांना भारतीय संस्कृतीतील 'पंचामृता'चे तरी महत्व कसे कळणार ?आता त्यांची शासकीय कर्मचाऱ्यांच्या जुन्या निवृती वेतन योजनेच्या मागणीवर 'दातखिळी' बसली आहे. देशात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कोणत्याही प्रकारचे निवृत्ती वेतन मिळत नसताना जुन्या निवृत्ती योजनेनुसार या कर्मचाऱ्यांना आताच्या पगाराच्या निम्याहून अधिक वेतन देणे,हा असंघटित क्षेत्रातील कामगारांवर अन्याय ठरतो. ईपीएस-९५ अंतर्गत निवृतधारकांची संख्या ७५ लाख आहे.त्यांना तर १ हजार ते २ हजार इतकेच निवृत्ती वेतन मिळते. केंद्राचे भाजपा सरकार याबाबत निर्णय घेत नाही हे दुर्देवच! दुसरीकडे नासिकहून लाल वादळ निघालेले आहे. त्यांचे शेतकरी- कामगाचे प्रश्न आहेत. यावर सरकार व शिष्टमंडळात झाली. संघटना व यातून मार्ग निघत आहेत. शासकीय कर्मचारी आता आठव्या वेतन आयोगाची प्रतीक्षा करत आहे. त्यांच्या अपेक्षा वाढत जाणार आहेत. शासकीय कर्मचारी आधी 'पोटाबा, मग विठोबा' या स्वार्थी भावनेने संप करत आहेत.त्यांना महाराष्ट्र बुडाला तरी काय ? याची पर्वा नाही. बीडमध्ये अपघातात जखमी झालेले रूग्ण आले होते,तेथे संपकरी कर्मचारी घोषणा व टाळ्या वाजत होते त्यांनी माणूसकी विसरले आहेत काय ? राज्यातील जबाबदार विरोधी पक्षाच्या नेत्यांना महाराष्ट्रात भविष्यात मोठे आर्थिक संकट येणार आहे, याची कल्पना आहे.तरी ते कर्मचाऱ्यांच्या मागणीचे समर्थन करत आहेत. त्यांना इपण विरोध केलातर राज्याच्या २०२४ च्या निवडणुकीत मतावर परिणाम होईल,याची त्यांना भीती वाटत आहे. कारण नुकत्याच झालेल्या शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीच्यावेळी विरोधी पक्षांनी याच योजनेचे भांडवल केले होते. महाराष्ट्र आर्थिक खड्यात गेला तरी चालेल! आमची सत्ता येणार !हा नवा राजकीय डाव विरोधी पक्ष खेळत आहे. तेंव्हा राज्यातील जनतेने विरोधी पक्षाचा हा कुटील डाव ओळखला पाहिजे, तरच महाराष्ट्र वाचेल!



# पेन्शनचे राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


आधुनिक केसरी

**शासकीय ध्येय धोरणांची प्रत्यक्ष मलबजावणी ज्या घटकांच्या माध्यमातून होते, असा घटक म्हणजे कर्मचारी. अनेक प्रकारच्या कर्मचाऱ्यांना विविध स्वरूपाची कामे करावी लागतात. सध्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. कर्मचाऱ्यांची ही जुनीच मागणी आहे, अलीकडे ही मागणी अधिक आक्रमकपणे होत आहे एवढेच. नोव्हेंबर २००५ पूर्वी महाराष्ट्रात जी कुटुंब निवृत्ती वेतन योजना चालू होती, ती महाराष्ट्र शासनाने केंद्राप्रमाणे बंद केली. तत्कालीन परिस्थितीत कर्मचाऱ्यांना आपण काय गमावले आहे याची जाणीव देखील झाली नाही. आज ती होत आहे.**




डीसीपीएस आणि एनपीएस म्हणजे काय, त्यात काय फरक आहे वगैरे वगैरे आजपर्यंत खूप सांगून झाले. मुळात कर्मचारी जुनी पेन्शन योजना का मागताहेत याचा शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे. हा प्रश्न राजकीय, सामाजिक आणि आर्थिक ह्या तिन्ही पातळ्यांवर प्रभाव पाडणारा असल्यामुळे त्याची तीव्रता जास्त असणार हे उघड आहे. पहिला मुद्दा राजकीय स्वरूपाचा आहे. ज्यावेळेस ही नवीन योजना सुरू झाली तेव्हा केंद्राने ही योजना अनिवार्य केलेली नव्हती, ऐच्छिक स्वरूपाची होती. असे असतानाही महाराष्ट्राने ती सुरू केली. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात केंद्रात ही योजना लागू केल्यामुळे जिथे जिथे भाजपाप्रणित सरकारे आहेत, त्या ठिकाणी जुनी पेन्शन पुन्हा नव्याने लागू करणे शक्य नाही. मग वेळ मारून नेण्यासाठी समिती गठीत करू, त्या शिफारशीनुसार आम्ही विचार करू इत्यादी गोष्टी म्हणजे निव्वळ धूळफेक आहे. कारण १९ जानेवारी २०१९ रोजी वित्त विभागाने एक शासन निर्णय निर्गमित करून डीसीपीएस मधील त्रुटींचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासगटाची स्थापना करू असे म्हटले होते. आजपर्यंत त्या अभ्यासगटाचे काय झाले, हे समजू शकले नाही. सध्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत करू असे म्हणतात. जर राज्याने यापूर्वी तशी समिती गठीत केली होती तर आज नव्याने पुन्हा समिती समिती खेळण्यात काय हाशील होणार आहे. बरे यात कोणताही सरकारी कर्मचारी आमदार, खासदारांची पेन्शन काढून घ्या असेही म्हणत नाही. हे राज्य राजकारण्यांचे जेवढे आहे तेवढेच कर्मचाऱ्यांचे देखील आहे. काही राजकीय पक्षांनी सुशिक्षित बेरोजगारांना हाताशी धरून पेन्शन धारकांच्या विरोधात मोर्चा काढायला लावला. अरे बाबांनो, कर्मचाऱ्यांच्या विरोधात मोर्चा काढून अर्ध्या वेतनावर आम्ही काम करण्यास तयार आहोत म्हणण्यापेक्षा दरवर्षी पंच्याहत्तर नोकऱ्या शासन देणार होते, त्याचे काय झाले हा जाब शासनास विचारा. बेरोजगार बांधवाप्रति पूर्ण सहानुभूती राखूनही असे प्रतिमोर्चे काढण्याने कोणाचेच भले होणार नाही. परंतु काही राजकारणी जाणीवपूर्वक कर्मचारी कसे वाईट आहेत हे समाजास सांगत सुटले आहे. शेतकरी उन्हातान्हात राबून देखील त्यांना काहीच नाही, कर्मचारी माजलेत, इथपर्यंत समाजमाध्यमातून संदेश फिरत आहेत. आज पंधरा वर्षांपासून स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी धूळ खात पडल्या आहेत. त्या काही कर्मचाऱ्यांनी दाबून ठेवलेल्या नाहीत. उलट स्वामिनाथन आयोग लागू झाला तर कर्मचाऱ्यांना आनंदच आहे, नव्हे तो लागू व्हावा यासाठी इथला कर्मचारी शेतकऱ्यांसोबत खांद्याला खांदा लावून लढण्यास तयार आहे. पण अशी सरमिसळ होणे कोणाच्याही फायद्याचे नाही.

राजकारण करायला सोपे जावे म्हणून असे होणारच. तेव्हा



## क्षितिजापल्याड

प्रत्येकाने मुळातून हा प्रश्न समजून घेतला पाहिजे. जुनी पेन्शन योजना लागू केल्यास राज्य दिवाळखोरीत निघेल असे उपमुख्यमंत्री यांनी माँटेंगसिंग अहलुवालिया यांचा संदर्भ देऊन सांगितले. हे खरे आहे असे गृहीत धरून दोन गोष्टींचा उहापोह झाला पाहिजे. फक्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन योजनेमुळे असे होणार आहे आणि आमदार , खासदारांच्या पेंशनमुळे तिजोरीत वाढ होणार आहे का ? फ्री कॉलिंग आणि मेसेजेसच्या जमान्यात हजारो कोटी रुपये त्यावर खर्च होतात, त्याबद्दल काहीच बोलायचे नाही. शासनपूरस्कृत हजारो कोटींच्या जाहिरातीमुळे तिजोरीवर ताण पडत नसेल असे सामान्यांनी समजायचे. खिळखिळ्या झालेल्या बसवर चकचकीत जाहिरात करण्यापेक्षा बस चकचकीत करा तीच तुमची चार गावात स्वतः जाहिरात होऊन फिरेल. पण हे सांगणार कोणाला. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे उद्या दवाखाण्याचा, मुलीच्या लग्नाचा, मुलाच्या नोकरीचा खर्च वाढणार म्हणून आजपासून उपाशी राहून बचत करायची, हे नवेच शास्त्र आजकाल जोर धरू लागले आहे. पण असे होत नसते. उद्याचे गणित बिघडू नये यासाठी आपल्या उत्पन्नाचे स्त्रोत आजपासूनच आपण का वाढवू नये. टाटा, वेदांता सारखे ग्रुप महाराष्ट्रातून गुजराथेंत जातात, आम्ही त्यांना थांबवून घेण्यात सपशेल अपयशी ठरलो. कित्येक मोठमोठी कार्यालये गुजराथेत जातात हा काय कर्मचाऱ्यांचा दोष आहे का ? अगदी वीस पंचवीस वर्षांपूर्वी तालुक्या तालुक्यात खिजडी भजे विकणारा गुजराथी आज महाराष्ट्रात सापडत नाही. कारण त्यांनी आपले अविकसित राज्य विकसित केले आणि आम्ही मात्र पूर्वीपासून प्रगत म्हणवून घेणारे हळूहळू मागे पडलो. बरे कोणीही उठावे आणि कर्मचाऱ्यांना दूषणे द्यावीत. कर्मचारी दोन ते तीन महिन्याचा पगार टॅक्सपोटी सरकार दरबारी जमा करतो. दीड महिन्याचा पगार डीसीपीएसच्या नावे कट होतो. एका कर्मचाऱ्यांवर किमान पाच सहा लोक अवलंबून आहेत, असे समजा आणि विचार करून सांगा. कर्मचारी खरेच माजला आहे का ? पेन्शनचा मुद्दा सामाजिक अंगाने देखील समजून घेतला पाहिजे. जे कर्मचारी कामचुकार आहेत, वेळेवर काम करत नाहीत किंवा काहीतरी चिरीमिरी घेतात त्यांना तुम्ही कठोरातले कठोर शासन अवश्य करा, परंतु सब घोडे बारा टक्के असे धोरण हितकारक ठरणार नाही. ज्या पश्चिम बंगाल राज्याने नवी पेन्शन योजना स्वीकारलीच नाही, तेथे जुनी पेन्शन योजना जशास तशी चालू आहे, ते राज्य डबघाईला आले असे कोठे वाचनात आले नाही. मा. अहलुवालिया

यांचा शासन हवाला देऊन सांगत आहे ते अहलुवालिया ज्या राजकीय विचारधारेचे आहेत त्याच काँग्रेसप्रणित राज्यात जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू केली आहे. मग विरोधकांच्या विचाराचे स्वागत तुम्ही करत आहात असे आम्ही समजायचे आणि टाळ्या पिटायच्या की आपल्याच विचारी माणसाच्या विचारांची काँग्रेस पायमल्ली करत

आहे म्हणून दूषणे द्यायची, ही मोठी विचित्र कोंडी निर्माण झाली आहे. पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे की जे विरोधक आज सत्तेत आहेत व कालपर्यंत आम्हीच जुनी पेन्शन देऊ शकतो असे म्हणत होते, ते किती खरे व खोटे बोलले हे येणारा काळच ठरवेल.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# पुरुष आयोगाची स्थापना ही काळाची गरज



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**एकीकडे महिलांच्या हितासाठी देशात आवाज उठवला जात आहे, तर दुसरीकडे पुरुषांच्या हितासाठीही आवाज उठत आहेत. बऱ्याच वर्षा पासून, काही पुरुष हक्क संघटना, ज्या सर्व गैर-सरकारी संस्था आहेत, पुरुष आयोगाची मागणी करत आहेत. यामागची विचारसरणी अशी आहे की पन्नास टक्के लोकसंख्या, जे पुरुष आहेत, सर्व प्रकारचे गुन्हे करतात, प्रत्येक संसाधनावर त्यांचे नियंत्रण आहे, ते सर्व शक्तिशाली आहेत. पण काही गुन्हेगार पुरुषांच्या उदाहरणावरून सर्व पुरुषांकडे पाठ फिरवणे योग्य नाही असे म्हणायचे आहे का?**

आजकाल कोणतेही वर्तमानपत्र किंवा वृत्तवाहिनी पाहा, फक्त पुरुषच गुन्हे करतात हा तुमचा भ्रम दूर होईल. आजकाल महिला गुन्हेगारांची संख्या कमी नाही. तरीही स्त्रिया निष्पाप प्राणी आहेत, कोणताही गुन्हा करू शकत नाहीत, काही चुकीचे करू शकत नाहीत हे समजणे योग्य नाही. देशात महिलांचा छळ करणाऱ्या पुरुषांची संख्या मोठी आहे. त्यांची कुठेही सुनावणी होत नाही. महिलांच्या छेडछाडीच्या कलमांतर्गत एकतर्फी सुनावणी सुरू असताना पुरुषांनाच अन्याय सहन करावा लागत आहे. अशा स्थितीत देशात पुरुष आयोगही स्थापन केला पाहिजे, ज्यामध्ये पुरुषांची सुनावणी होऊन त्यांना न्याय मिळू शकेल. ज्याप्रमाणे महिला आयोग, एससीएसटी आयोग आदी संबंधित पक्षाच्या छेडछाडीच्या तक्रारी ऐकून घेतात आणि त्यांना न्याय देतात, त्याचप्रमाणे पुरुष आयोगानेही पीडित पुरुषांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. महिलांना अधिकार मिळावेत आणि कायद्याने त्यांना मदत करावी , मात्र कायद्याच्या नावाखाली निरपराधांना गोवून त्यांची प्रतिष्ठा धुळीस मिळवणे लोकशाही आणि मानवतेच्या विरोधात आहे. मानवी हक्क फक्त स्त्रियांनाच नाहीत , फक्त पुरुषांनाच नाहीत. ते प्रत्येकासाठी आहेत आणि कायद्याचे काम प्रत्येकाच्या मानवी हक्कांचे रक्षण करणे आहे. खेदाची बाब म्हणजे महिलांसाठी बनवलेले कायदे इतके एकतर्फी आहेत की ते स्त्रियांना देवी म्हणून मांडतात आणि नेहमी सत्य सांगतात आणि पुरुषांना खलनायक ठरवतात. हे एकतर्फी कायदे पुरुषांच्या घरातील महिलांना पितृसत्ताकतेचे प्रतीक मानून त्यांना त्रास देण्याचे काम करतात. त्यामुळे लिंग तटस्थ कायद्याची मागणी जोर धरू लागली आहे. दोषी कोणीही असो - पुरुष असो वा महिला, त्याला शिक्षा व्हायला हवी. कायद्याचे काम गुन्हेगाराला शिक्षा करणे असले पाहिजे. निरपराधांना काठीने का छळायचे ? अलीकडे मीडियाच्या एका विभागात प्रचारासाठी एक माणूस आला होता. Man Too मोहीम राबवण्यात अभिनेत्री पूजा बेदीने प्रमुख भूमिका बजावली होती. ते म्हणाले की, आता वेळ आली आहे की पुरुषांच्या हक्कांबाबतही बोलले पाहिजे. शेवटी, हे ते युग नाही जे पितृसत्तेच्या वर्चस्वाचा समानार्थी मानले जाते. आता महिलांनाही पूर्ण अधिकार मिळाले आहेत. असे असूनही स्त्रिया हव्या तेव्हा स्वतःला शक्तिशाली म्हणवून घेतात आणि वाटेल तेव्हा गरीबी दाखवू लागतात. उदाहरणार्थ, लिव्ह- इनमध्ये राहणाऱ्या महिलासंबंध तुटल्यावर बलात्काराचा आरोप करणारे. तर न्यायालये सहमतीतील संबंधांना गैरवर्तन मानत नाहीत. मी टू दिवसांचे उदाहरण देताना पूजा बेदी म्हणाल्या की, त्या काळात पीआर एजन्सी सक्रिय झाल्या होत्या. प्रसिद्ध लोकांवर असे आरोप करण्याचा सल्ला ती फिल्मी दुनियेत स्थान मिळवण्यासाठी उत्सुक असलेल्या मुलींना देत होती. यासोबत त्यांच्याशी चर्चा होऊन काम मिळेल. राष्ट्रीय महिला आयोगाची आकडेवारी देताना त्यांनी असेही सांगितले की एप्रिल २०१३ ते जुलै २०१४ पर्यंत एकूण बलात्काराच्या गुन्ह्यांपैकी ५३.२ गुन्हे नोंदवले गेले.

२०२१ मध्ये प्रकाशित झालेल्या नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारी नुसार १,६४,०३३ लोकांनी आत्महत्या केल्या.यापैकी ८१०६३ विवाहित पुरुष होते तर २८,६८० महीला होत्या.३३.२टक्के पुरुषांनी कौटूंबिक समस्यांमुळे आणि ४.८ टक्के पुरुषांनी विवाहसंबधी समस्यांमुळे जीवन संपविले. २०२२ मध्ये १,१८,९७९ पुरुषांनी आत्महत्या केल्या आहेत.है प्रमाण ७२ टक्के आहे. एनसीआरबीच्या आकडेवारीत असेही सांगण्यात आले आहे की हुंड्याशी संबंधित दहा टक्के प्रकरणे खोटी आहेत. तिच्या म्हणण्यानुसार, सुप्रीम कोर्टाने असेही म्हटले आहे की महिलांना त्यांच्या पती आणि सासरपासून संरक्षण देण्यासाठी बनवण्यात आलेल्या कायद्याचा वापर सासर आणि पतीकडून बदला घेण्यासाठी केला जात आहे. पूजा बेदी यांनी मागणी केली की महिला आयोगाच्या धर्तीवर पुरुष आयोग स्थापन करण्याची वेळ आली आहे जेणेकरुन निष्पाप पुरुषांनाही त्यांचे मत बोलता येईल, कारण त्यांचे कोणीही ऐकत नाही - ना मीडिया, ना सरकार , ना समाज . निर्दोष सुटल्यानंतरही त्यांना अपमान सहन करावा लागत आहे.



त्याचे कुटुंब तुटते. आपल्या देशात दरवर्षी सरासरी ९४ हजार पुरुष आत्महत्या करतात . ही संख्या महिलांच्या तुलनेत सहा टक्क्यांनी जास्त आहे. कौटुंबिक आणि वैवाहिक कलह हे आत्महत्येचे प्रमुख कारण आहे. यावर महिला हक्कांच्या प्रवक्त्याने अतिशय निरागसपणे सांगितले की, पुरुष नैराश्याला बळी पडतात म्हणून असे करतात. एखादी व्यक्ती डिप्रेशनची शिकार का होते याचा शोध घेण्याची गरज नाही का ? पुरुष आयोग स्थापन व्हावा हा मुद्दा भाजपच्या दोन खासदारांनी संसदेत उपस्थित केला आहे. पुरुषही पत्नींकडून होणाऱ्या छळाला बळी पडतात. अशी अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदे आणि व्यासपीठे उपलब्ध आहेत पण पुरुषांच्या समस्यांची अद्याप दखल घेण्यात आलेली नाही. एनसीडब्ल्यूच्या धर्तीवर पुरुषांसाठी आयोगाची गरज आहे.,असा युक्तिवाद खासदारांनी संसदेत करून सभागृहाचे लक्ष वेधून घेतलेले आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

रविवार, १९ मार्च २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२००
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 19 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-200 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# जे नुकसान होईल, ते भरुन देऊ

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : शेतकऱ्यांनो चिंता करू नका

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक : राज्यात काही दिवसांपासून अवकाळी पाऊस पडत आहे. या अवकाळी पावसामुळे कांदा, द्राक्ष, केळी, हळद पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी वीजपडून जीवितहानीही झालेली आहे. पण शेतकऱ्यांनो तुम्ही घाबरू नका, अवकाळी पावसामुळे जेवढे नुकसान होईल, तेवढे आम्ही भरून देऊ, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. सर्वत्र अवकाळी पाऊस कोसळत आहे. पण शेतकरी बांधवानो काळजी करू नका, आम्ही सोबत असल्याचे शिंदे म्हणाले.**



नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात नांदूरशिंगोटे येथे दोन एकर परिसरात गोपीनाथ गड उभारण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. ते म्हणाले की, आज ही गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणारी जनता शुभ कार्याची पत्रिका गोपीनाथ गडावर नेतात. ती श्रद्धा, प्रेम आहे, ज्यांनी चांगले काम केले, आपण राज्यात अनेक नेते पाहिले, ते लोकनेते म्हणून प्रसिद्ध झाले, गोपीनाथ मुंडे हे लोकनेते बिरुदाचे मुकुटमणी होते. त्यांनी सर्वसामान्य माणसासाठी न्याय देण्यासाठी अहोरात्र काम केले. कोणाला आवडो न आवडो, परखड बोलणारे होते, सर्वसामान्य माणसांना न्याय देण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. 70 च्या दशकात सायकलवर शबनमची झोळी घेऊन पायी फिरून भाजप वाढविण्याचे काम केले. भाजप शिवसेना युतीचे शिल्पकार गोपीनाथ मुंडे होते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, ज्या ज्या वेळी अडचणींचा संघर्षाचा काळ होता, त्यावेळी बाळासाहेब ठाकरे त्यांना मार्गदर्शन करायचे. लोकनेता अकाली जाईल, असे कोणाला वाटले नव्हते. ते गेले तो काळा दिवस होता. त्यांनी जे समाजासाठी काम केलं, त्यामुळे शेवटच्या दिवशी जिकडे तिकडे माणसे वणव्यासारखी धावत होते. त्यांचे वक्तृत्व कर्तृत्व शिकण्यासारखे आहे. ते बोलत असताना सन्नाटा असायचा. माणसं जोडण्यासारखी ताकद मुंडे यांच्याकडून शिकण्यासारखी असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

एकाच व्यासपीठावर एवढी सगळी माणसं आली, ही माणसं मुंढे यांनी जोडलेली आहेत. त्याकाळात मिळेल त्या यंत्रणेला सोबत घेऊन काम केले. या राज्यात मोठे काम केले. महाराष्ट्रातील राजकारणाचा पट बदलून टाकणारा नेता म्हणजे गोपीनाथ मुंढे होय. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रमाणे 80 टक्के समाजकारण 20 टक्के राजकारण असे काम केले. हाच मूलमंत्र जपून गोपीनाथ मुंढे यांनी राज्यात केलं. आम्ही एकत्र आलो, ही काळाची देशाची गरज होती. म्हणून सर्वसामान्यांच्या मनातील सरकार आले. फडणवीस यांनी अर्थसंकल्प मांडला. त्यात महिला शेतकरी सर्वांना सामावून घेतले. राज्याच्या प्रगतीवर विकासावर आलेले मळभ दूर केले. गडकरी यांनी मदत केली, तुम्ही पाठबळ दिले म्हणून आम्ही चांगले काम केले.

### गोपीनाथराव मुंडे असते तर जेलमध्ये गेलो नसतो

नाशिक : लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे हयात असते तर माझे अडीच वर्ष जेलमध्ये गेले नसते, पहाडासारखा हा माझा धाकटा भाऊ माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला असता. महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेसाठी हा नेता आजही आपल्यात पाहिजे होता. त्यामुळे शेवटचा श्वास असेपर्यंत त्यांचे काम सुरू ठेवू, असे आवाहन छगन भुजबळ यांनी करत भावूक झाले. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील नांदूर शिंगोटे येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या गोपीनाथ गड या स्मारकाचे व त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भुजबळ म्हणाले की, लोकांसाठी काम केलेल्या व्यक्तीवर प्रेम करण्यासाठी हजारो लोक स्वयंस्फूर्तीने येत असतात. बहुजनांना एकत्र आणण्याचे काम गोपीनाथ मुंडे यांनी केले असून, ओबीसींची गणना झाली पाहिजे, मंडल आयोगाची अमलबजावणी झाली पाहिजेत यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले. सर्व समाजाला न्याय देण्याची भूमिका घेणे, हीच स्व. गोपीनाथ मुंडे यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे त्यांनी सांगितले. गोपीनाथ मुंडे यांनी राज्यातील ओबीसीसह पीडित सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी आयुष्यभर लढा दिला. त्यांनी सुरू केल्याल्या कामाची सर्व जबाबदारी आता माझ्यावर आणि तुमच्यावर आहे. त्यामुळे शेवटचा श्वास असेपर्यंत त्यांचं काम सुरू ठेवू असे प्रतिपादन छगन भुजबळ यांनी केले. यावेळी बोलतांना छगन भुजबळ अतिशय भाऊक झाल्याचे बघावयास मिळाले. ते म्हणाले की, गोपीनाथराव मुंडे यांनी राज्यात सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांचे अकाली जाणं हे आपल्यासाठी मोठा धक्का आहे.

# वैश्विकस्तराचा विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांची भूमिका मोलाची

## प्रा. डॉ. कन्नूलाल विटोरे : मत्स्योदरी महाविद्यालयामध्ये स्व.मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमाला



प्रा. डॉ. कन्नूलाल विटोरे

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड : शहरातील मत्स्योदरी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई तथा मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड व दैनिक मराठवाडा साथी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्वर्गीय मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शनिवार, दि. 18 मार्च रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शहाजीराव गायकवाड तर मराठी विभागाचे प्रमुख डॉ.राम रौनेकर, प्रा. दीपक राखुंडे, डॉ. वैशाली प्रधान, डॉ. संदीप गाडेकर, डॉ. पैठणे, व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी, मराठवाडा साथीचे तालुका प्रतिनिधी रामदास पटेकर,पत्रकार मुदस्सिर बेग यांची उपस्थिती होती.**



प्राचार्य डॉ. शहाजीराव गायकवाड



पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश गायके



स्वर्गीय मोहनलालजी बियाणी यांच्या प्रतिमेचे प्रथम पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मॉडेल कॉलेज घनसावंगीचे हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. कन्नूलाल विटोरे यांचे 'आजचा युवक आणि नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 2014 पासून या नवीन शैक्षणिक धोरणाबाबतीत शासनाच्या वतीने देशातील सर्वस्तरातील नागरिकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या आणि शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, वैज्ञानिक, व्यापारी, शिक्षणतज्ञ विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींच्या तसेच लाखो-करोडो लोकांच्या मनातील भावना व प्रतिक्रिया जाणून घेऊन पूर्ण समन्वय आणि या नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या शैक्षणिक धोरणांमध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक ते वरिष्ठ महाविद्यालय आणि 4 विभागात विभागणी केलेली असून फाईव्ह प्लस, थ्री प्लस, फोर हा फार्मूला अंमलात आणलेला आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील डिग्री ही चार वर्षांची असेल त्यामध्ये पहिल्या वर्षी प्रमाणपत्र दुसऱ्या वर्षी डिप्लोमा, तिसऱ्या डिग्री आणि चौथ्या वर्षी रिसर्च संशोधन पदविका दिली जाईल. देशांमधील सर्व स्तरातील प्राथमिक स्तरातील सर्वसामान्य शिक्षण दिले जाईल, शिक्षकांनाही प्रशिक्षित करून. शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही. याचीही विशेष काळजी घेतली जाईल. यासाठी दोन करोडपेक्षाही जास्त शाळाबाह्य मुलांना सामावून घेण्याची संकल्पना आहे. तसेच सहावी वर्गापासून मातृभाषा राष्ट्रभाषा यावर विशेष भर दिला जाईल आणि कौशल्य परक अभ्यासक्रम मुलांना शिकविला जाईल. विद्यार्थ्यांना दप्तराचे वजन न होता सुकर अशा पद्धतीचे लवचिक आणि सर्वसमावेशक शिक्षण देण्यावर भर आहे. दहावीचे बोर्ड समाप्त होईल बारावीला बोर्ड असेल आणि नववी ते बारावी यामध्ये सेमिस्टर पद्धतीने परीक्षा घेण्यात येतील. तसेच देशामध्ये विविध परदेशी विद्यापीठांनाही संमती मिळेल. देशाचा विद्यार्थी हा वैश्विकस्तराचा सर्वगुणसंपन्न असेल. विज्ञान शाखेचा विद्यार्थी कला शाखेचा विषय घेऊ शकतो, आयआयटीमध्ये सुद्धा संगीत साहित्य कला या विषयांचा समावेश असेल शिक्षकांनासुद्धा विविध एनसीआरटीच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण घेण्यात येतील. परंतु खऱ्या अर्थाने ही नवीन शैक्षणिक धोरण लागू करताना शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल. विद्यार्थ्यांनी, युवकांनी जिज्ञासूवृत्तीने अधिक शिक्षकांच्या संगतीत राहणे आवश्यक आहे. शिक्षकांनीसुद्धा पूर्ण समर्पण भावनेने अध्यापन कार्य केल्यास 2030 पर्यंत जे टारगेट नवीन शैक्षणिक धोरणामध्ये आखून देण्यात आलेले आहे. जीपीआरपीमध्ये जो काही बदल आवश्यक आहे तो निश्चितपणे यशस्वीहोईल. गुरु -शिष्य परंपरा अत्यंत महत्त्वाची असून विद्यार्थी आणि शिक्षकांची भूमिका नवसमाज निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक आहे. या नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये अमूलाग्र असे बदल करण्यात आलेले आहेत. ते दीर्घकाळ परिणामकारक असतील. यातून बेरोजगारी कमी होईल. कौशल्य प्रशिक्षण प्राप्त होऊन विद्यार्थी स्वयंरोजगार प्राप्त करतील. देश- विदेशात शिक्षण घेतील. क्रेडिट सिस्टमच्या माध्यमातून वेगवेगळ्या अभ्यासक्रमाचाही अभ्यास एकाच वेळी करू शकतील, अशी लवचिकता यामध्ये आहे.

याप्रसंगी पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश गायके यांनीही हास्यरंजनात्मक शैलीमध्ये उच्चशिक्षणामधील युवकांचे योगदान आणि नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये युवकांनी पूर्ण समर्पण भावनेने आणि जिज्ञासूवृत्तीने अभ्यास केल्यास यश हमखास मिळू शकते. 21 व्या शतकातील युवक हा सर्वगुणसंपन्न होण्यासाठी शिक्षण हाच एकमात्र उपाय आहे, असे सांगत त्यांनी विविध देशभक्तीपर आणि सामाजिक प्रबोधनपर गीतांच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शहाजीराव गायकवाड होते. अध्यक्षीय समारोपामध्ये त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबाबतीत शासनाची भूमिका ही अत्यंत रास्त असून येणाऱ्या काळात बेरोजगारी कमी होऊन 2030 पर्यंत दर्जेदार शिक्षण प्राथमिक ते उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना मिळेल आणि यातून भारताचा विकास होईल. दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी यांचे महाराष्ट्राच्या पत्रकारिता क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान राहिलेले आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

आधुनिक केसरीचे संपादक डॉ. प्रभू गोरे यांनी सूत्रसंचालन करून या व्याख्यानमालेची भूमिका विशद केली. तसेच येणाऱ्या काळातही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक मराठवाडा साथीच्या वतीने विविध साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येतील अशी घोषणा केली.



# विरोध पेन्शनला आहे का ?

विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**जुनी पेन्शन योजनेला सर्व सामान्य लोकांचा विरोध आहे का? की इतर कोणत्या बाबींना विरोध आहे ही गोष्ट लक्षात घेणे गरजेचे आहे. परंतु सर्वात अगोदर सर्वांनी एक बाब लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे सर्व समस्येचे कारण सरकारी कर्मचारी नाहीत आणि लोकांनी सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन विरोधात बोलले किंवा मत व्यक्त केले म्हणून त्यांचे पेन्शन बंद झाले नाही. कर्मचाऱ्यांचे पेन्शन २००५ पासून बंद झाले परंतु तेव्हा शासकीय पातळीवर कोणत्याही प्रकारचा दबाव सरकारवर आणला नाही.**

असो तो भाग आपण समोर बघुया परंतु दुसरी गोष्ट महत्वाची आहे ती म्हणजे सर्वसामान्य लोक पेन्शनला विरोध का करत आहेत तर लोकच आरोप करत आहेत की सरकार दरबारी वेळेवर कोणते काम होत नाही, कर्मचारी अधिकारी वेळेवर कार्यालयात येत नाही वेळे पर्यंत कार्यालयात थांबत नाहीत, कोणतेही काम करताना लाच दिल्याशिवाय काम करत नाहीत. सदर प्रकरणातील मतीतार्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. लोक पेन्शला नाही तर पेन्शन मिळाणाऱ्या लोकांच्या कर्तव्य व जबाबदारी वर मुख्य प्रश्न उपस्थित करत आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना सरसकट लाचखोर बोलणे चुकिचे असले तरीही शासकीय वर्ग कामचुकार, वेळेचा दुरुपयोग, नागरिकांचा सन्मान आणि लाच यापैकी कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे सर्व सामान्य नागरिकांना त्रास सहन करून दहा मिनटाच्या कामाला महिना महिना लागतो, काही लोक सरकारी काम लवकर होत नाही म्हणून बरेच काम तसेच राहु देतात. हि वस्तुस्थिती सुद्धां नाकारून चालणार नाही. परंतु अनेक सर्व सामान्य लोकच आपले काम लवकर व्हावे, रांगे उभे न रहावे वा नेहमी नेहमी कार्यालयाच्या चकरा न माराव्या म्हणून अनेक खात्यांच्या कर्मचाऱ्यांना पैशाची लालच दाखवून काम करून घेतले जातात ही गोष्ट तर सर्व सामान्य लोकांना ही मान्य करावी लागेल. पेन्शन हा संविधानीक अधिकार आहे. पेन्शन सरकारी कर्मचाऱ्यांना च नाही तर सर्व कर्मचाऱ्यांना मिळायलाच पाहिजे यामध्ये कुठेही दुमत नाही. परंतु संविधानाने दिलेले हक्क अधिकार आणि सुख सुविधा संविधान विरोधी सरकार हळूहळू बंद करत आहे तरीही शासकीय कर्मचारी वर्ग एकही शब्द बोलत नाहीत किंवा जे बोलतात त्यांना समर्थन करत नाहीत, प्रोत्साहन देत नाहीत. उलट तुला काय समजते आम्ही इतक्या दिवसापासून सरकार मध्ये काम करतो तसे काही नसते म्हणून त्याचे खच्चीकरण केले जाते. सरकारी कर्मचारी हे सर्व समस्यांचे मुळ नसले तरीही दैनंदिन जिवनात वावरताना याच कर्मचाऱ्यांमुळे सर्वसामान्य मानसाला अनेक समस्यांना सामोरे जाव लागते. शासकीय पगार ल सुख सुविधा घेणारे लोक उपभोग मात्र खाजगी वस्तुचा घेतात. म्हणुन सर्वसामान्य लोकांना त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष फटका बसतो. जसे सरकारी शाळेवर शिकवायला जाणारा शिक्षण खाजगी स्वतःच्या मुलाला शाळेत सोडून कामावर जातो. याचे नेमके कारण काय ? सरकारी शाळेमध्ये गुणवत्ता नाही ? जर गुणवत्ता असेल तर शिक्षकांचे मुल खाजगी मध्ये का ? जर सरकारी शाळेमध्ये गुणवत्ता नाही असे शिक्षकालाच वाटत असेल तर मग गुणवत्ता वाढविण्याचे काम कोणाचे आहे ? शिक्षणकांचेच मुल खाजगी शाळेत म्हणजे खाजगी शाळेत शिक्षण चांगले मिळते असा समज सर्वसामान्य लोकांचा होतो आणि म्हणून आज सर्वांचा कल खाजगी शाळेमध्ये झाला आहे. शाळेतील पटसंख्या कमी झाली, शाळेतील शिक्षक संख्या कमी झाली, लहान लहान मुलांना दूरपर्यंत शाळेत जावे लागते. तेव्हा कोणीही आवाज उठवला नाही. मुळात हे फक्त शिक्षकांना लागु होत नाही शिक्षक फक्त उदाहरण आहेत. आणि शिक्षकांकडून वेळ व गुणवत्ता याच दोनच गोष्टींची अपेक्षा असते. परंतु इतर खात्यामध्ये पैसे दिल्या शिवाय काम पुढे सरकतच नाही. एक गोष्ट शासकीय कर्मचारी खरोखरच विसरले आहेत. ती म्हणजे सर्वसामान्य लोकांच्या विकासामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचे खुप मोठे योगदान आहे. म्हणून त्यांनी आपले काम जबाबदारी पुर्वक पार पाडले तर लोकांच्या अनेक समस्या दूर होउन लोक सुखी समाधानी होतात. सरकारी अनेक योजना ह्या याच शासकीय यंत्रणेमार्फत राबविल्या जातात परंतु योजना राबविताना पक्षपाती पणा करून त्यातही पैसा बघितला जातो. आपण बघतो अनेक शेतकऱ्यांच्या नावाने कर्मचाऱ्यांनीच कागदोपत्री विहीरी खोदून पैसे सुद्धा काढले. असे एकच उदाहरण नाही अनेक उदाहरणे आहेत. रोज कुठे ना कुठे लाच घेताना शासकीय वर्ग सापडतो. नोंद झालेल्या बाबी आपल्या समोर येतात परंतु ज्याची नोंदच नाही असे किती असतील. बर आजपर्यंत कोणत्याही विभागातील कर्मचाऱ्यांनी विभागातील भ्रष्टाचार बंद व्हायला पाहिजे म्हणून आवाज उठवला, आंदोलन केले किंवा सर्वसामान्य मानसाची जागृती केल्याचे उदाहरणे नाहीत आणि ज्यांनी असे केले असेल त्यांना खरचं वंदन. ग्रामपंचायत च्या रहिवासी दाखल्यापासुन तर नौकरी च्या प्रमोशन पर्यंत किती वेळेस कोणा कोणाला किती लाच मागितली जाते किंवा किती लाच स्वतः हुन दिली जाते यावर खोलवर न जाता हे कृत्य मात्र केले जाते.




आणि याच कृत्याला सर्व सामान्य लोकांचा विरोध आहे. एखादे काम करण्यासाठी माणसाला कार्यालया भोवती खुप वेळा चकरा माराव्या लागतात. कागदपत्रे जमा करून फक्त तारखेवर तारीख दिली जाते. एखाद्या कामाला उशीर होत असेल किंवा जास्त काम असल्याने लवकर करणे शक्य नसेल तर संबधीत व्यक्तीला दोन दिवस उशीरा बोलवायला पाहिजे पण ज्या दिवशी बोलवले त्या दिवशी काम व्हायला पाहिजे पण तसे होताना दिसत नाही. कधी फाईल दाखल केलेला कर्मचारी हजर नसतो कधी सही करणारे अधिकारी हजर नसतात म्हणून सर्व सामान्य लोक त्रस्त होतात. अशा वागण्यामुळे शासकीय कर्मचारी व सर्वसामान्य लोक अशी फळी निर्माण झाली. आणि शासकीय कर्मचारी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपल्या नोकरी चा रुबाब सर्वसामान्य लोकांवर दाखवत असतो हि बाब नाकारता येत नाही. ( रुबाब न दाखवता प्रेमाने राहणारे आणि आपलं समजून काम करणारे लोक आहेत त्यांना मनापासून वंदन ). सदर आंदोलनाच्या माध्यमातून सरकारी कर्मचारी चांगला लिहु शकतो, चांगला बोलु शकतो याची जाणीव लोकांना झाली. परंतु खरचं एकदा कर्मचाऱ्यांनी चांगले आत्मचिंतन करण्याची गरज आहे. आपण आपले कर्तव्य जबाबदारी ने पार पाडतो का ? कोणत्या उणिवा आहेत ? सर्वसामान्य लोक आपल्या विरोधात का बोलत असतील याचा विचार करणे आवश्यक आहे. सर्व सामान्य लोकांवर दुर्लक्ष करून किंवा त्यांना विरोध करून चालणार नाही. म्हणून आत्मचिंतन केल्याने उणिवा लक्षात येऊन त्या सुधरण्याचा प्रयत्न करायचा. परंतु शासकीय कर्मचाऱ्यांच्या लिखाणा मधून सर्व सामान्य जनतेने मुद्दे खोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. जसे काही कर्मचारी लोक म्हणतात आणि शेतकऱ्यांचे मुलं आहेत आमचे सर्व कुटुंब पगारावरच आहे. अशी भावनिक साद घालणारे कर्मचारी शेतकऱ्यांडून विविध योजनेच्या नावाखाली पैसे घेतले जातात, शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळत नाही, शेतकरी आत्महत्या करतात तेव्हा कोणीच बोलत नाही, स्वतः च्या विभागात अनेक जागा रिक्त आहेत, त्या जागा रिक्त असल्याने नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार येतो म्हणून जागा भरण्यासाठी कधी कर्मचारी बोलत नाहीत, भरलेल्या जागा कंत्राटी पद्धतीने भरल्या जात जाऊ नये यासाठी कर्मचारी वर्ग बोलत नाही. विभागामध्ये रिक्त जागा भरण्यासाठी कर्मचाऱ्यांनी आवाज उठवला तर तेथे शेतकऱ्यांचे बेरोजगार मुल रुजू होणार नाहीत का ? लोकसंख्या वाढत आहे आणि कर्मचारी संख्या कमी होत आहे तरीही कर्मचारी वर्ग काम कसे करत असेल त्यातही त्यांच्या नियमानुसार सुट्या व वेळेनंतर येऊन वेळेआधीच निघून जाने हा वेळ कमी केला तर कर्मचारी सुद्धा तारेवरची कसरत करताना दिसत आहेत. बाहेर बेरोजगाराची फौज आहे, आणि आत मध्ये रिक्त जागा आहेत यासाठी कर्मचारी वर्ग कधीच बोलला नाही. कोल्हापूर मध्ये बेरोजगार तरुणांनी जो मोर्चा काढला तर तो विरोध म्हणून नव्हे बेरोजगार तरुणांच्या हाताला काम नाही, मिळेल ते आणि मिळेल तेवढ्या पगारावर काम करायला ते तयार आहेत. एवढी बेरोजगारी असतात शासकीय कर्मचारी काहीच बोलत नाहीत म्हणून सरकारी कर्मचाऱ्यांना विषयी नकारात्मकता निर्माण झाले आहेत.काही कर्मचारी म्हणतात आम्ही मेहनत करून आलो याचा अर्थ सध्या चे बेरोजगार मेहनत करत नाहीत का ? खर तर हा लढा व्यवस्थेविरुद्ध आहे. पण आत्मपरीक्षण सुद्धां महत्त्वाचे आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना सर्व सामान्य लोकांच्या मनात आदर निर्माण करायचा असेल तर कर्मचारी वर्गांनी समाजाशी नाळ जोडून सामाजिक समस्येची जाणीव ठेवायला पाहिजे व कर्तव्य पार पाडतात पुर्ण वेळ कोणत्याही प्रकरची लाच न घेता करावे व लाच घेणाऱ्या विरोधात आणि खाजगीकरण विरोधात आवाज उठवावा म्हणजे भविष्यातील धोके कमी होतील. शेवटी एकदा समजून घ्यावे विरोध हा पेन्शनला नाही तर प्रतिमेला आहे ती प्रतिमा चांगली करण्याची ग्वाही कर्मचाऱ्यांनी द्यावी.

# महाडचा मुक्तिसंग्राम काय शिकवितो ?

श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883


आधुनिक केसरी

**दलित महिलांचा मोठा सहभाग आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांचे जीवतोड आवाहन या सत्याग्रहाचे वैशिष्ट्ये ठरले. या सत्याग्रहासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असल्याने आणि आपली जात दाखवणारी कोणतीच लक्षणे आपल्या शरीरावर न बाळगण्याविषयी उपस्थित स्त्री-पुरुषांना खास आवाहन केले. त्यातच पुरुषांनाही हातात कायम काठी ठेवण्यासारखी चिन्हे बाळगण्याची आता गरज उरली नाही. तत्कालिक स्त्रिया गुडघ्यापर्यंतच तोकडे लुगडे नेसत असत. डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांना इतर उच्च जातीय स्त्रीयांसारखे पूर्ण टाच घोळ लुगडे नेसण्यास सुचविले. त्याची अंमलबजावणी लागलीच पुढच्या काही दिवसांतच घडून आली.**

महाड सत्याग्रह हा दि.२० मार्च १९२७ रोजी विश्वरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील महाड येथील सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांना घेता यावे, म्हणून केलेला हा सत्याग्रह होता. यामुळेच २० मार्च हा दिवस सामाजिक सबलीकरण दिन म्हणून भारतात साजरा केला जातो. महामानव डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लोकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन केलेली ही पहिली सामायिक कृती होती. या सत्याग्रहास महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह, महाडचा मुक्तिसंग्राम किंवा महाडची सामाजिक क्रांती म्हणूनही ओळखले जाते.

भारतीय जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यांना उच्च जातीय हिंदूंपासून वेगळे ठेवण्यात आलेले होते. अस्पृश्यांना पाण्याच्या मुख्य स्रोतामधून पाणी घेण्यास तसेच मुख्य रस्त्यावरून चालण्यास परवानगी नव्हती. ऑगस्ट १९२३मध्ये मुंबई कायदे मंडळाने एक निर्णय पारित केला, त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या आणि सुस्थितीत ठेवलेल्या सर्व मालमत्तेवर सर्वांना म्हणजेच अस्पृश्यांनाही वहिवाटीचा हक्क असेल. महाडच्या नगरपालिकेनेही जानेवारी १९२४ साली या कायद्याची अंमलबजावणी करणारा निर्णय पारित केला, परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच नाही. सुरेंद्रनाथ टिपणीस, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे व अनंत विनायक चित्रे यांच्यासह अन्य पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते व सहयोगी महाड सत्याग्रह दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मदत करण्याचे काम करीत होते. कोकणातील महाड हे शहर सत्याग्रहासाठी निवडले गेले, कारण उच्च जातीय हिंदूंनी हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी तयारी दाखवली होती. त्यामध्ये अनंत विनायक चित्रे, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे, सुरेंद्रनाथ टिपणीस हे महाड नगरपालिकेचे प्रमुखही त्यांत सहभागी होते. सन १९२७ साली सुरेंद्रनाथ टिपणीसांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती- सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली आणि त्यानिमित्ताने डॉ.आंबेडकरांना सभा घेण्यासाठी आमंत्रण दिले. सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले. त्यांनी सर्वात प्रथम त्या तळ्यांमधून पाणी प्यायले आणि त्यानंतर जमलेल्या सर्व लोकांनीही त्या तळ्याचे पाणी प्राशन केले. त्यावेळी स्त्री-पुरुष मिळून सुमारे पाच हजार जण या सभेसाठी व नंतर चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी आलेले होते. त्यातील पुरुष हे आपल्या हातात काठी घेऊन आलेले होते. हातात काठी घेतलेले पुरुष म्हणजे महार जातीच्या पुरुषांचे प्रतिक होते.

सत्याग्रहींवर सनातन्यांचे अत्याचार झाले. जरी महाड नगरपालिकेने सरकारी अखत्यारीतील सर्व पाणवठे अस्पृश्यांना खुले केले असले, तरीही त्या पाणवठ्यांवर तसा कसलाही उल्लेख केला गेलेला नव्हता. त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने अस्पृश्य जमा होऊनही त्यांनी आसपासच्या कोणत्याही पाणवठ्यावरून पिण्यासाठी पाणी घेण्याची हिंमत केली नाही. म्हणूनच या सभेसाठी आलेल्या लोकांच्या पाण्याच्या सोयीसाठी ४० रुपये किमतीचे पाणी उच्च जातीय हिंदूंकडून विकत घेण्यात आले होते. कारण सभेच्या ठिकाणी अस्पृश्यांना आसपासच्या पाणवठ्यावरून पाणी घेण्यास मनाई होती, हे आपण जाणताच की! डॉ.बाबासाहेब चवदार तळ्याचे पाणी पिऊन सभेपुरते ते रहात असलेल्या सरकारी बंगल्यावर परतले आणि इतर सर्व लोक सभेच्या मंडपात परत गेले. चवदार तळ्यावरून सर्वजण निघाल्यानंतर सुमारे दोन तासाच्या आतच महाड गावात एक अफवा उठली की, तळ्यातील पाणी बाटवल्यानंतर आता जमलेला जमाव वीरेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहे. धर्म धोक्यात आल्याची बोंब उच्च जातीय हिंदूंनी महाड गावभर पसरविली. त्यातून उच्च जातीय हिंदूंचा



एक घोळका हत्यारे, लाठ्या-काठ्या घेउन सभेच्या ठिकाणी आला व त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. हा उच्च जातीयांचा घोळका नंतर महाड शहरभर फिरून सर्व अस्पृश्यांना धमकावत होता. शिवाय आसपासच्या सर्व गावांमध्ये या सभेला आलेल्या सर्व अस्पृश्यांना धडा शिकवण्याबद्दल संदेश पोहोचवला गेला. त्यामुळे अनेक अस्पृश्यांना स्वतःच्या गावी पोहोचल्यानंतरही हिंसेला सामोरे जावे लागले. या सत्याग्रहाला गांधीजींनी पाठिंबा दिला आणि स्पृश्यांनी अस्पृश्यांवर अशाप्रकारे हिंसा करून चुक केली आहे, असे मत त्यांच्या यंग इंडियामध्ये प्रकाशित केले.

विरेश्वराच्या मंदिराच्या गुरवाने अस्पृश्यांनी विरेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे, अशी अफवा उठविल्यामुळे गावातील सनातनी हिंदुंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर अत्याचार केला. परंतु अहिंसा हे तत्त्व मानणाऱ्या डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनातनी हिंदूंविरूद्ध "हिंसा करू नका!" असा आदेश दिला होता. त्यामुळे एवढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिक लोकांपेक्षा जास्त संख्येने असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम ठेवला. त्याबद्दल गांधीजींनी सर्व सत्याग्रहींचे कौतुकही केले होते. नंतर दि.१९ मार्च १९४० रोजी डॉ.बाबासाहेबांनी महाडमध्ये चौदावा महाड सत्याग्रह दिन आयोजित केला. महाड शहरात त्यांचा मोर्चा व सभा झाली. या दिवशीं महाड नगरपालिका प्रेसिडेंट ॲड.विष्णू नरहरी खोडके यांनी एक समारंभ आयोजित करत त्यांना मानपत्र देऊन गौरविले. खोडके यांनी सन १९३१पासून त्यांच्या चळवळींना पाठिंबा दिला होता.

दलित महिलांचा मोठा सहभाग आणि बाबासाहेबांचे जीवतोड आवाहन या सत्याग्रहाचे वैशिष्ट्ये ठरले. या सत्याग्रहासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असल्याने आणि आपली जात दाखवणारी कोणतीच लक्षणे आपल्या शरीरावर न बाळगण्याविषयी उपस्थित स्त्री-पुरुषांना खास आवाहन केले. त्यातच पुरुषांनाही हातात कायम काठी ठेवण्यासारखी चिन्हे बाळगण्याची आता गरज उरली नाही. तत्कालिक स्त्रिया गुडघ्यापर्यंतच तोकडे लुगडे नेसत असत. डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांना इतर उच्च जातीय स्त्रीयांसारखे पूर्ण टाच घोळ लुगडे नेसण्यास सुचविले. त्याची अंमलबजावणी लागलीच पुढच्या काही दिवसांतच घडून आली, हे विशेष!

# पोरकेपण



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**काळ  वेगाने पुढे जात राहतो.तो कधीच कोणासाठी थांबत नाही. काळाबरोबर वयही हळूहळू वाढत जातं. तारुण्याच्या उत्साहात पण हे कळायला वेळ लागतो. काही वेळेला कळत असतं पण वळत नाही अशी मनाची अवस्था झालेली असते.आपल्याच धुंदीत जगणं सुरू असतं. आपल्या जवळची माणसं, आपली माती, कधीच विसरून गेलेलो असतो. त्या वेळेला माझ्यासारखा मीच अशी मनाची भावना होऊन बसलेली असते. पण हा उत्साह, आनंद फार काळ टिकू शकत नाही.**

तारूण्य ओसरून टवटवीत चेहऱ्यावर सुरकुत्या पडायला लागतात,शरीराच्या कुरबुरी सुरू होतात. मग मात्र  मन परत लहान होऊन भूतकाळात जातं. बऱ्याच आठवणी, अनेक चेहरे नजरेसमोर येऊन जातात. त्यातील काही चेहरे नुसती आठव ठेऊन पडद्याआड गेलेले असतात. कुटूंबाबरोबर आपल्याला घडवण्यात त्यांचाही वाटा असतो. ती दिलेली संस्काराची शिदोरी सोबत असते.  नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने का असेना गावापासून आपण कोसो दूर गेलेलो असतो. गावची माती पायाला लागावी अशी इच्छा असूनही कधी कधी गावच्या मातीत जाता येत नाही तर, काही वेळेला जाता येईल नंतर ,पाहता येईल म्हणत आपल्याकडूनच चालढकल होत असते.

जीवनात स्वतःला जेंव्हा अनेक प्रसंगाना सामोरे जावे लागते तेंव्हा मन सैरभैर होतं. काय निर्णय घ्यावा हे कळतच नाही. तेंव्हा ती दिलेली शिदोरी आपोआपच उघडते. त्यातील मोजके शब्द'च पुरेसे होतात  परत त्याच उमेदीने पुढे जाण्यासाठी. ते असे कधीच हरून जाऊ नकोस, संकटांना खंबीरपणे तोंड दे.चालत रहा वाट त्याच आत्मविश्वासाने. एक अनामिक शक्ती संचारल्याचा भास होतो. पण खरं तर ती सकारात्मक विचारांची शक्ती असते. आपली त्या माणसांवरील भक्ती असते.

जेंव्हा एकांतात असतो तेंव्हा मन खूप उनाड होऊन जातं. लांब लांबचा प्रवास करून परत फिरून येतं.  वाटतं परत एकदा लहान होऊन मुलासारखं गावाच्या गल्लीबोळात फिरुनी यावं. मंदिरात चाललेल्या भजनात हाती टाळ घेऊन हरिनामात तल्लीन व्हावं. बुजुर्ग माणसांच्या अगदी जवळ जाऊन बसावं. सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यावरील हास्य पुन्हा एकदा  दिसावं. अनेक जुन्या नव्या अनुभवांचा खजिना त्याच्याकडून खुला व्हावा. तहानभूक विसरून ते सगळं आत साठवून घ्यावं. त्यांच्याकडचे अनेक प्रसंग ऐकताना जीव तसाच कानात गोळा व्हावा.

गावाच्या बाहेर अनवाणी पायांनी भटकत जावं. बालपणीचा सखा सोबत असावा. दोघांचेही हात हातात असावेत तर, कधी खांद्यावर डोके टेकवून विसावा मिळावा. दूर दूर नदीच्या काठावर जाऊन शांत बसावं.पाण्यात उठणाऱ्या तरंग लहरी डोळ्यात साठवून घ्याव्यात.वाऱ्याची झुळूक शरीर आणि मनाला सुखावून जावी.

पण संसाराच्या रहाटगाडग्यात बऱ्याच गोष्टी राहून जातात. तारुण्यातला सुसाट वेग, स्पर्धा, चढाओढ, मी पणा, पैसा, प्रसिद्धी याच्याच मागे आपली धावाधाव होत असते. भौतिक सुखाच्या कल्पनाच मनात रुंजी घालत असतात. या सगळ्यात खरं  जगणंच तर



राहूनच जातं. शरीर आणि मनाची एकाग्रता साधताच येत नाही. माझ्यामुळेच सगळं, माझ्याशिवाय होणार नाही या कल्पनेतच जगत असतो. पण आयुष्याच्या संध्याकाळी आपली गरज नसल्यासारखी आपलीच माणसं आपल्या सोबत वागायला लागतात.तेंव्हा मात्र विचारचक्र वेगाने फिरायला लागते. ते कधी सरळ फिरते तर तर कधी उलटे.ज्याची सोबत ,आधार हवा असतो तीच  माणसं आपली वस्तुसारखी वाटणी करतात.आई तुझ्याकडे ,बाप माझ्याकडे. त्यावेळी मन आतून आक्रोश करत असतं.पण काहीच उपयोग नसतो.बरेच क्षण आपणच गमावून बसलेलो असतो. मनातलं दुःख सांगावं कोणाला ?मन कुठे हलकं करावं ? जागा कुठेच शिल्लक नसते. कारण जिवाभावाची माणसं आपणच मागे टाकलेली असतात. पैसा ,प्रसिद्धी यावेळी काहीच कामाला येत नाही. शरीराच्या व्यथा ऐकायलाही कोणाकडे वेळ नसतो.

असलं जगण्यापेक्षा मेलेलं बरं असं स्वतःच म्हणत दिवस ढकलणे चालू असते. थरथरणारी पाऊले टाकत रस्ता तुडवत असताना  आपल्या सारखाच पण त्या ही वयात आनंद घेत जगणारा, शेती, मातीच्या गोष्टी मनावर कोरून त्या आठवणी ताज्या करणारा भेटतो. मस्त खळखळून हसतो. त्याच्या पांढऱ्याशुभ्र केसांवरही एक वेगळी चमक दिसते. वय झाले तरी तरुणाईला लाजवेल असा उत्साह त्याच्यात  खचोखच भरलेला असतो. हे त्याचे सुख पाहून मग आपलंच मन म्हणायला लागतं. हा आनंद घेणं, ह्रदयाचा ह्रदयाशी संवाद साधणं राहून गेलं माझं.मनात एकच प्रश्न उभा राहतो. खरंच आपणच का आपणाला पोरके केले. ? म्हणून वेळीच सावध होऊया. भरभरून जगूया. आनंद घेऊया आनंद देऊया.कवयित्री बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेत म्हणतात.

आला सास गेला सास
**जीवा तुझं  रे तंतर**
**अरे जगणं, मरणं**
**एका सासाचं अंतर.**

# उन्हाळी वाळवण आणि आमची लुडबुड

आधुनिक केसरी

**जानेवारी संपत आला की,किंवा मराठी महिन्यात म्हणायचं म्हंटलं तर माघ फाल्गुन संपत आला की, घरातील बायकांची एक वेगळीच गडबड सुरू होते. ही बायकांची गडबड काही नवीन नसते. कारण त्या कायमच गडबडीत असतात. खरं तर त्यांच्या व्यस्त रहाण्याला एकवीस तोफांची सलामीच द्यायला हवी.महिना कोणताही असो त्या महिन्यात कोणता नं कोणता सण हा असतोच.सण म्हटल्यावर तो साजरा केलाच पाहिजे. आमच्या पंढरपूरात तर प्रत्येक सण हा धामधुमीत, सगळे सोपस्कार पूर्ण करुन केले जातात. सर्व प्रथा परंपरा राखून सण साजरे केले जातात. प्रत्येक सणाला जशा सर्व गृहिणी कर्तव्य तत्पर असतात तशाच उन्हाळ्यात सुध्दा त्या उसंत घेत नाहीत. खरचं मानल पाहिजे त्यांच्या व्यस्तपणाला,कर्तव्य तत्परतेला.तापल्या उन्हात सुध्दा या काम करीत असतात.**

उन्हाळ्यात सर्व गृहिणींना वेध लागतात ते वाळवणं करुन ठेवण्याचे.या वाळवणला दुसरं कोणत नाव आहे माहिती नाही. पण लहानपणापासून हाच शब्द ऐकत आलो."अहो वहिनी, तुमची झाली का हो वाळवणं"!असंच विचारल जायचं."नाही हो वन्स!! आत्ता कुठे कुरडया पापडं झाली आहेत.अजून शेवया व्हायच्यात. म्हंटल अगोदर माळवदावरची काम करुन घ्यावीत.मग उन्ह वाढलं की घरात बसून सांडगे,शेवया, वळवट करु."

या वाळवणीच्या पदार्थांची यादी केली तर एक पानभर तरी होईल इतके पदार्थ, वस्तू असतात. पापडांचे वेगवेगळे प्रकार,कुरडईचे प्रकार,शेवयांचे प्रकार, वेगवेगळ्या दाळींचे सांडगे,उपवासाचे विविध प्रकारच्या जिनसा, हाताने करावयाचे रवा मैद्याचे छोटे नकुल्या सारखे पदार्थ, असे कित्येक पदार्थ ह्या सुगरणी करत असतात. त्या सर्व स्त्रियां सुगरणीच असतात म्हणूनच ऐवढे सर्व करतात. उन्हाळा लागताच या सुगरणी पहिल्यांदा चांगला गहू आणून तो भीजू घालतात. चांगले आठ एक दिवस त्या गव्हाला भिजवत ठेवतात. पण त्यातले पाणी रोज किंवा एक दिवसाढ बदलतात. आठ दिवसा नंतर तो चांगला भिजला की त्याचा चिक काढतात. जेवढा गहू चांगला तेवढा चिक चांगला पडतो म्हणे!! त्यातल्या त्यात जर खपली गहू असेल तर फारच छान. खपली गव्हाच्या कुरडया खायला एक नंबर लागतात. तळताना त्या मस्त फुगतात. त्याची चव अवर्णनीय असते.तसे इतर गव्हाच्या ही चांगल्या होतात पण खपली गव्हाच्या कुरडईची चव लाजबाब!! ह्या भीजू घातलेल्या गव्हाला चार पाच दिवसात आंबट वास यायला सुरुवात होते. खरं तर पाचसहा दिवसांनी त्या वासाने डोकचं उठायला सुरुवात होते. जणू काही घरात देशी दारु करण्याचे पिंप पुरलेत असा वास घुमत असतो.त्या वासाने पुरुष मंडळी हैराण होतात.रशियन मद्य व्होडका ही गव्हा पासूनच तयार करतात म्हणे.घरा जवळून जाणारे ही विचारात गहू भीजू घातलाय काय ?मग या भिजलेल्या गव्हाचा चिक काढून तो रात्रभर तसाच ठेऊन सकाळी मोठ्या पातेल्यात शिजवायला ठेवायचा.त्यात खडे मिठच घालायचं असा प्रघात आहे. त्या पातेल्याला बाहेरून चांगली माती लिंपून घेऊन मगच त्यात शिजवतात. ते लिंपण्याचे काम ही आदल्या दिवशीच करून ठेवतात. मग त्या चिकाच्या कुरडया करतात. पातेल्याला लागलेल्या खरवडाचे सांडगे टाकले की काम झालं आमची बालपणी लुडबुड गरम चिक बशीत घेऊन खायला असायची. आत्ताच्या मॅंगीच्या कानसुलात मारेल अशी चव त्याला असायची.तेच ज्वारीच्या पापडा वेळी असच व्हायचं.ज्वारी भिजवून थोडी वाळवून मग जात्यातून पिठ करुन मग त्याचे पापड केले जायचे.ज्वारीचे पापड घालायच्या अगोदर ही पोरांनो चव बघा रे म्हणून बशीभर ते गरमागरम चिक किंवा खिरी सारखे खायला मिळायचं.खूप छान चव असायची.काही कुरडया रंगीत ही केल्या जायच्या.

आमच्या घरी तर कधी शेवया, बोटवे,वळवट,हे आयत्या रव्याचे केलेच नाहीत. गहू थोडा भिजवून तो 'आला' की मग भरडून आणून त्याचा रवा चाळून पाकडून त्यापासून केल्या जायच्या." गहू आला" असाच वाक् प्रचार तिथे वापरला जायचा. या फडक्याने चाळलेल्या रव्याचे मग शेवया, नकुल्या, बोटवे, मरगुळगे, कानुल्या, इत्यादी गोष्टी केल्या जायच्या.त्यातल्यात्यात पाटावरच्या शेवया करताना मजा यायची. आई, काकू, आत्त्या, शेवयाच्या पाटावर वळण्यासाठी बसत.त्यांनी हाताने वळायला सुरुवात केली की खाली एकाने धरुन काठीवर हार घातल्या सारखे घालायचे. त्या घालण्याला चोंगे घालणे म्हणतात. मला हे पाहून पाहून चोंगे छान घालता येत होते. ( लहानपणी ) हे खोट नाही हं.अजूनही परीक्षा घेऊ शकता. ही कामे दुपारी अकरा नंतर करावयाची असल्याने सकाळचा सर्वांचा स्वयंपाक लवकर उठून करुन घेतला जायचा.

एक आठवलं!! आषाढी वारीची सुट्टी लागली होती. सकाळी अर्धी शाळा करुन सोडल्यावर आम्ही चहाला गेलो.जाताना घोंगडे गल्लीत काही घोंगड्यास रेवड घालणारे रेवडकरी रेवड घालत होते. माझा मित्र नंदकुमार कुलकर्णी मला म्हणाला दत्ता तुला येतं का ?मी हो म्हणालो.लागली पैज आणि मी त्याच्या हातून दोर्या घेऊन रेवड घालायला सुरुवात केली सगळे मित्र आवाक!!!लहानपणीचा सराव होता तसा या शेवयांचा होता. तसेच हात शेवया सुध्दा करतात. त्याच पिठाच्या नकुल्या, बोटवे, करतात.

पापडांचे सुध्दा बरेच प्रकार आहेत. ज्वारीचे पापड, चिक काढलेल्या गव्हाच्या कोंड्याचे पापड( हे पापड भाजक्या शेंगदाण्या बरोबर थोडे तेल लावून खूप छान लागतात यात पूर्ण फायबर असते. ) उडदाची पापडे वगैरे. उडदाचे पापड लाटायला आजूबाजूच्या बायकाही येत असतात. तेवढ्याच इकडच्या तिकडच्या गप्पा त्या कामावेळी होतात. नाचणीचे पापड तसेच हंडी पापड, उकडलेल्या तांदळाचे पापड, तांदूळ पोहे यांचेही उकड करुन अलीकडे पापड केले जातात, शाबुदाणा पापड वगैरे पापडांचे प्रकार केले जात होते. उपवासाचे वाळवण सुध्दा करुन ठेवले जायचे. शाबुदाणा पापड, शाबुदाणा चकली, भगर साबुदाणा शिजवून त्याची चकली,बटाटा पापड, वेफर्स, इत्यादी फराळाची वाळवण सुध्दा केली जात. उन्हाचे घरात बसून मग सांडगे केले जायचे.हा प्रकार ही मुलांना जमण्यासारखा असल्याने मुलं करीत.तीन बोटांनी फक्त सांडगे जवळजवळ  टाकत जायचे.

पाटावर ताटाच्या मागच्या बाजूस ते घातले जायचे. ते झाल्यावर आमचे काम त्यांना उन्हात नेऊन ठेवणे असायचे. तेही दोनतीन प्रकारचे असत.कांदा घालून केलेले तांदळाच्या सांडग्यांची चव खूप भारी!!न तळता ही कडम कडम खायला खूप मस्त लागतात. त्यात असलेल्या कांद्याची चव वेगळाच आनंद देऊन जाते. ऐवढी सगळी वाळवण झाली. की तोपर्यंत मृग नक्षत्र जवळ येत असल्याने कैरीचे आगमन झालेले असते. लगेच या सुगरणी कैरीचे लोणचे घालायला सुरुवात करतात. या दिवसातच हरभरा नवीन आलेला असतो. त्याला भिजवून घरच्या जात्यावर हरभरा भरडून दाळ करतात. हा हरभरा भिजवून चांगला फुगला की मटकीच्या उसळी प्रमाणे सायंकाळी खायला खूप छान वाटते. वाळवणं करता करता हे खायला आवर्जून केले जाते. ज्वारीचे पापड जुन्या नॉयलॉन साडीवर किंवा धोतरावर घातले जायचे.ते पापड काढताना पाण्याने ओले करुन काढावे लागे.ते काढता काढता तुटलेले पापड खायची मजा यायची. किंवा आई काकुची नजर चुकवून खायचो. त्या भातोड्याची चव खूप छान असायची. आंब्याचे दिवस सुरू झाले की आमरसा सोबत नवी कुरडई खायला मिळायची.ती टेस्ट ही खूप भारी.

खरच समृध्द बालपण जगायला मिळालं. परीक्षांचे निकाल ही याच दिवसात लागायचे. मी पास झालो. ती पास झाली. एवढाच निकाल ऐकायला मिळायचा. "नाही हो एक दोन टक्के कमी पडले असले कधीच ऐकायला मिळाले नाही. आत्ताच्या नव्याण्णव टक्के वाल्यांपेक्षा सुध्दा आमचा नुसता पासचा निकाल किती तरी चांगला होता.नुसतं पास झालेले प्रगतीपुस्तक ही आम्ही नाचत आणि नाचवत घेऊन जात असू. मग या आनंदाची पेढे आणि दुसऱ्या दिवशी आमरसा ने इतिश्री व्हायची. शेवटी हे सुध्दा घरातील स्त्री वर्गालाच करावे लागायचे. म्हणूनच सुगरणी हाच परफेक्ट शब्द योजणार्यांनी योजला आहे. पुरुष फक्त आणून द्यायचे काम करतो.पण येवढ सगळं त्या माता माऊली करतात. नाही म्हणलं तरी कुठं नं कुठं त्या कामात थोडा फार हातभार पुरुष मंडळाचा लागतो नाही असं नाही!!!

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ऐवढ सगळं केलेले योग्य ठिकाणी ठेवायचे काम उंचीवर ठेवायला 'ह्यांना' सांगितले जाते. हे सर्व वर्षभर पुरेल असं वापरायला काढायचं,वर्षभर ते नीट राहिलं याची काळजी घ्यायची हे काम ही त्यांचच असतं. त्यांच ते ही ठरलेले असतं की कोणत्या दिवशी कोणते पदार्थ त्यातून काढून करायचे.अशी दूरदृष्टी ही त्यांच्या जवळ आपसूकच असते.या पदार्थांना पुन्हा अश्विन महिन्यात म्हणजे ऑक्टोबर हिटला पुन्हा उन्ह देण्याचे ही त्या लक्षात ठेवून काम करतात. किती अष्टावधानी त्या असतात हे यावरून समजून येईल.

परवा बोटवे करायच्या निमित्ताने शेवया वाळू घालण्याचा प्रसंग आला म्हणून हे लिहिण्याचा योग आला. हल्ली वेळच मिळत नाही किंवा नोकरी मुळे घरी करणं होत नाही म्हणून मशीन वरील शेवया केल्या जातात. चवी ऐवजी भूक भागवणेच त्यातून होते. कसदार, चविष्ट, हाताचा गोडवा उतरलेलं,आपुलकी आणि माझ्या कुटुंबातील सगळ्यांचं उदर भरण यथासांग व्हावं ही सद्भावना मशीन मधल्या वळवटात कुठून येईल हो!!!!

**©®दत्ता तरलगट्टी सर, पंढरपूर**
**९८८१६२९०४८**



# पाऊस ... हत्ती गेला अन्....



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**हरवलेल्या त्या क्षणांची अपूर्वाई एखाद्या वळणावर अवचित पुढे येई. माणसाच्या मनाच्या किती भ्रामक कल्पना असतात ना! काल अचानक आलेल्या पावसात सहज बाहेर डोकावत असताना त्या... दिवसाची आठवण आली. तशी अगदी खास आहे अशीही नाही.पण तरीही आजही कुठेतरी...! पाचवी सहावीत असेन ,अगदी खूप सुंदर आहे अशीही नाही, पण तरीही श्रावण महिना संपता संपता आठवत नाही पण सुट्टीचा दिवस होता तो, नेहमीप्रमाणे मी माझे आई बाबा आणि आम्ही बहिण भावंडे आम्ही सर्वजण आमच्या 'म्हसोबाचा माळ' (शेताचे नाव ) नावाच्या शेतात भुईमुग खुरपण्यासाठी गेलो होतो.**

अर्थात मोठी माणसे खुरपणार होती. आम्ही लहान भावंडे छत्री खाली आणि मोठ्या निरगुडीच्या डहाळ्याने बनवलेल्या खोपित बसून लहान भावाला खेळवत खेळवत आमचा खेळ चालला होता. अगदी आतमध्ये चार पाच माणसे बसतील अशी मोठीच्या मोठी खोप. अगदी घरासारखी उन्हाळा असो पावसाळा अथवा हिवाळा ती कायम आमच्या बांधावर असायची. आत्ता खरे वाटणार नाही. पण कळायला लागल्यापासून रानात जायचे एवढे चांगले आठवते,आणि तेव्हापासून ती खोप ही पाहत आले आहे.

असो, पण खरे सांगायचे तर आमचे हे शेत खरे तर आमच्या गावच्या डोंगर पायथ्या पासून अर्ध्या किलोमीटरवर आहे. आणि तीच डोंगर रांग तशीच पुढे गेली आहे आणि तो बोगदा पाच सहा किमी असावा म्हणजे अंदाजे तेही डोंगर वाटा मधून गेले तर पश्चिमेच्या दिशेकडून दक्षिणेला गेलेल्या डोंगर रांग.आणि त्याच डोंगर रांगेतील एका डोंगराला एक मोठे छिद्र आहे. ते छिद्र , अर्थात ते निसर्गाच्या उलाढालीने पडले असावे, ते आमच्या शेतातून अगदी छोट्या वाटीच्या आकराऐवढे दिसते. खरे तर ते मोठे आहे. बहुदा परंतु बालमनाच्या कल्पना काहीही असू शकतात. त्या छिद्रा विषयी मोठ्यांच्याकडून ऐकलेली गोष्ट त्या बोगद्यातून हत्ती गेला पण त्याची शेपूट मात्र तिथेच अडकली. इतर वेळेचे गणित सुटायचे. पण का कुणास ठाऊक त्या कल्पनेतल्या त्या हत्ती विषयी ची ती आत्मीयता पावसाळ्यात उफाळुन यायची. तेव्हा वाटायचे की बिचारा त्या पावसात तिथेच अडकून पडला असेल.त्याला पावसाच्या थेंबाचा मारा लागत असेल.वगेरे वगेरे, ...शेतात गेल्यावर पहिल्यांदा त्या बोगद्याकडे बघायचे.

त्या दिवशी ही असेच पावसाचा जोर कमी जास्त जाणवत होता. सकाळपासून ढगाळ वातावरण होतेच. मध्येच बुरूंगाटाची ( बुरुंगाट म्हणजे पावसाची बारीक सर ) एकदा दोनदा येऊन गेली. पण दुपारनंतर निसर्गाने आपला पवित्रा बदलला आकाशात काळे ढग इस्तता फिरतच होते,त्याला फक्त त्या वाऱ्याची साथ मिळण्याचा अवकाश.क्षणात श्रावण सरींनी बरसायला सुरुवात केली. बांधावर जवळ जवळ असलेल्या दोन लिंबाच्या झाडांना प्लॅस्टिक कागद आणि बाजूला असलेली आमची घाणेरी ची खोप आणि आमच्या दोन तीन छत्र्या मिळून तयार केलेल्या त्या आडोश्याला आम्ही सर्वजण बसलो होतो. न जाणून तो पाऊस काही बराच वेळ थांबत नव्हता.( डोक्याला आडवा हात लावून डोळे छोटे करून लांब पर्यंत पाहण्याची एक पध्दत ) बाहेर डोकावता डोकावता आकाशाकडे बघत बघत हा काय लवकर थांबायचा दिसत न्हाय. सगळीकडून भरून आलेय, मोठ्यांच्या चर्चा मला मात्र त्या हत्ती विषयी मनात कुठेतरी खूप वाईट वाटतं होत. लहान भाऊ असल्यामुळे छत्रीतून बाहेर डोकावता ही येईना . मी छत्री खालून पाहण्याचा प्रयत्न केला.पण सगळ्यांचा ओरडा खाल्ला अर्थात ते बरोबरच होते. पण गप्प बसेल ते मन कसले. मग नंतर छत्री ला पडलेल्या एका छोट्या छिद्र तून त्या हत्तीला पाहण्याचा प्रयत्न केला. पण त्यातून काय दिसणार. बाहेर पडणाऱ्या धो धो पावसाच्या सरीत अख्खा डोंगरच गायब झाला होता, तर तो हत्ती कुठून दिसणार होता. उलट त्यावेळी मनाची झालेली उलघाल आज आठवली की इतके हसायला येते. कोणी तरी काहीतरी करावं या उद्देशाने त्यावेळेला माझ्या मोठ्या बहिणीला ही सांगितले की अग आक्का, तो हत्ती... तो हत्तीचा डोंगर च कुठेतरी गायब झाला आहे. त्यावेळेला बहिणीने मला गप्प बसायला लावले. मनाची चलबिचल थांबत नाही तोपर्यंत इकडे हळूहळू कागदावर चा नि छत्री वरचा आवाजाचा जोर कमी होऊन , रविराजांच्या प्रकाशात सारा आसमंत प्रकाशमय आणि सार कस धुवून स्वच्छ झालेल्या त्या निसर्गाचं नयंन रम्य रूप डोळ्यासमोर उभं राहिलं. निसर्गात एक विलक्षण सामर्थ्य असते . याची जाणीव त्या दिवशी झाली. म्हणजे तेव्हा ती लक्षात नाही आली. पण अलीकडेच केव्हातरी त्याचा प्रत्यय आला.

मोठी माणसे कपडे झाडत , बाहेर पडली. मलाही घाईच झाली होती. तासभर अवघडलेल्या हाता पायाला मोकळे करण्यासाठी पटकन बाहेर आले. बाहेर येताच त्या गरम झालेल्या पायांवर भुईमुगाच्या वेलावरचे दैवर लागले. त्या गरम झालेल्या पायांना दैवर लागल्यामुळे एक नैसर्गिक कृती म्हणजे खूप वैतागले. आणि जेवढ्या वेगात मनाचा पवित्रा झाला ,तेवढ्याच वेगात तो निसर्गाच्या नयन रम्य दृश्याने तो बदलला. शेताच्या बाजूने गेलेल्या ओढ्याच्या खळखळाटाच्या आवाजाच्या ओढीने काठावरच्या खडकावर आले. आणि पहिल्यांदा ... श्रावणाचे ते चार साडेचार वाजता करवंदाच्या घणेरीच्या जा ळ्या त्यावर पडलेलं ते सोनेरी ऊन आजही मनात नवे तरंग निर्माण करून समोर येते. या उन सावल्यात काहीतरी विशिष्ठ होते. ती वेळ आणि त्या साऱ्याचा मेळ म्हणजे निसर्गाची एक सुंदर कलाकृतीच! आणि त्याच्यात सामावलेला त्या ओढ्याच्या खळखळाट चा आवाज शब्दांच्या ही पलीकडली त्याची ती अनामिक ओढ ,म्हणजे उन सावल्या आवडतात म्हणून असेल कदाचित, पण



चे ते अनोखे रूप अनोखे म्हणण्यापेक्षा...

त्या स्वच्छ डोंगरातल्या त्या अर्ध्या डोंगरात उतरलेल्या त्या सावल्या आणि अर्धे ऊन , डोंगर पायथ्याला छोट्या टेकाडावर असलेले ते वडाचे झाड आणि त्या उन्हात त्याची दूरवर पडलेली सावली त्याची ती मुक भाषा खर तर त्याच्या आजूबाजूच्या आजही एखाद्या नाजूक क्षणी स्मृतीतूनी जगण्याचे नवे बळ देवून जातात. माहित नाही त्यात काय होते. पण एक मात्र नक्की की उत्कंठेची अपुर्वाईच. पण त्या ऊन सावलीचे आणि माझे नाते आजही तितकेच घट्ट आहे.

ती वेळ निघून गेली. पण मनाच्या एका कोपऱ्यात त्याची एक विशेष जागा करून गेली.

खूप वर्षापासूनची इच्छा, म्हणतात ना, इच्छा शक्ती जितकी तीव्र असते, तेव्हा अशक्य गोष्टी ही शक्य होतात. खर सांगायचे तर त्या डोंगरात जायची २५ ते ३० वर्षापूर्वी ची इच्छा मागच्या चार महिन्यापूर्वी गावी गेले होते तेव्हा पूर्ण झाली. आणि तिकडेच जायचे म्हणून ही नाही . एका मंदिरात गेलो आणि सहज म्हणून झालेली ती भेट मनाला खूप काही देवून गेली. कितीतरी वर्षाची ती इच्छा पूर्ण झाली तेव्हा इतका आनंद झाला, तो शब्दात नाही सांगता येणार.काही वर्षांपूर्वी सहज म्हणून त्याचं थोड फार लिखाण माझ्या एका ललित लेखात आले होते. लेख लिहला तेंव्हाही एकदा तिकडे जाणार असे लिहले होते. पण कधीतरी मनाला प्रश्न पडतो. या भेटीचे नियोजन कधी आणि केंव्हा झाले असेल ना! **क्रमशः**

# 'विविध खेळांची माहिती'



बबलू कराळे
संपर्क क्र. 7218029838

आधुनिक केसरी

**विविध खेळाविषयी माहितीपूर्ण पुस्तकं येणे ही एक अतिशय आनंदाची बाब आहे. संतोष मिसाळ यांनी लिहलेलं पुस्तकं "विविध खेळांची माहिती "या पुस्तकात खेळा विषयी माहिती पूर्ण लेख आहेत ते लेख लेखकांनी आपल्या अनुभवाचे आधारे लिहले आहे.**

संतोष मिसाळ हे एक उत्कृष्ट शारीरिक शिक्षण शिक्षक विविध खेळामध्ये गोल्ड मेडल प्राप्त आहेत. ते स्वतः मल्लखांब चे उत्कृष्ट खेळाडू व भारतातून सुवर्णपदक प्राप्त असून विद्यापीठाच्या मलखामच्या चमू मध्ये त्यांची टीम नायक म्हणून निवड झाली होती .त्यांनी मलखांमध्ये अनेक खेळाडू तयार केले.

खेळांप्रमाणेच संतोष मिसाळ यांना सामाजिक कार्याची आवड आहे. त्यांनी काही गावांमध्ये वाचनालय सुरू केले. लोकांनी वाचन करून ज्ञानसंपन्न व्हावे ही त्यांची धडपड आहे. संतोष मिसाळ हे एक उपक्रमशील व्यक्तिमत्व आहे. खेळ हा मानवी जीवनाला अत्यंत आवश्यक आहे. खेळामुळे अनेक फायदे होतात. या पुस्तकात संतोष मिसाळ यांनी विविध खेळांची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे खेळ व व्यायाम हे मानवी जीवनाला कसे आवश्यक असून मानवी जीवन प्रगतिशील करणारे आहेत त्याचे विवेचन या पुस्तकात आले आहे. विदेशी खेळांबरोबरच त्यांनी या पुस्तकात देशी खेळाबद्दल माहिती दिली आहे .त्याचप्रमाणे खेळाच्या द्वारे विद्यार्थी आपले करियर कसे घडवू शकतात तेही सांगितले आहे. या पुस्तकात कबड्डी, खो-खो , क्रिकेट आधी खेळांबद्दल सविस्तर माहिती आली आहे. संतोष मिसाळ यांनी खेळाबद्दल योग्य माहिती दिली आहे. त्या खेळाचा इतिहास, त्या खेळाचा विकास, खेळाची सद्य स्थिती अशा प्रकारची माहिती या पुस्तकात आली आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचनीय झाले आहे. संतोष मिसळ यांचे हे क्रीडा विषयक लेखन अभ्यासपूर्ण आहे. प्रत्येक खेळाची चांगली माहिती मिळवून त्याची योग्य मांडणी केली आहे. या पुस्तकातून खेळाबद्दल सुलभ रीतीने आपणास माहिती प्राप्त होते. केवळ खेळाबद्दल ची माहिती या पुस्तकातून मिळते असे नाही तर मानवी जीवनाला खेळ कसे आवश्यक आहेत तेही कळते व यातून खेळ खेळण्याची प्रेरणा मिळते. आजच्या काळात अनेक पुस्तके प्रकाशित होत आहेत पण त्यात खेळासंबंधी कमी पुस्तके असतात .हे पुस्तक खेळाच्या माध्यमातून मानवी जीवनाला योग्य दिशा देणारे पुस्तक झाले आहे .विविध खेळांची सविस्तर माहिती या पुस्तकातून मिळते त्यामुळे वाचणाऱ्याच्या सामान्य ज्ञानात भर पडते. विविध खेळाचे ज्ञान वाचकांना होते. संतोष मिसाळ यांची लेखन शैली उत्तम आहे साध्या सरळ भाषेत त्यांनी खेळाबद्दलची उत्कृष्ट माहिती दिलेली आहे. हे पुस्तक वाचनीय झाले आहे. ते वाचताना कंटाळा येत नाही. खेळ सर्वांनाच प्रिय असल्यामुळे आपल्या आवडीच्या खेळाची माहिती या पुस्तकातून जाणून घेता येते. खेळ खेळाडू यांच्या बद्दल कमी पुस्तके प्रकाशित होतात म्हणून या पुस्तकाचे महत्त्व मोठे आहे .शरीर संपदा ही सर्वात महत्त्वाची असते खेळ शरीर संपदा वाढवण्यासाठी मदत करतात त्यामुळे खेळाचे महत्व मोठे आहे .योगासह विविध खेळांची माहिती या पुस्तकात आल्यामुळे हे पुस्तक संग्रहणीय झाले आहे. कुस्ती मल्लखांब या खेळाबद्दल ची माहिती सखोल आहे .लेखक स्वतः मलखांब चे उत्कृष्ट खेळाडू असल्यामुळे या लेखनात वास्तवता व वस्तुनिष्ठता आली आहे. विटी दांडू ,लगोरी अशा खेळांची माहिती सुद्धा महत्त्वपूर्ण आहे. क्रिकेटचा इतिहास या पुस्तकात दिला गेला आहे तो रंजक व उद्बोधक आहे. क्रिकेट प्रमाणेच इतर खेळांचा इतिहास त्याचा विकास थोडक्यात मांडला आहे फ्लॉवर बॉल यासारख्या लोकांना फारशा परिचित नसलेल्या खेळाची विस्तृत माहिती या पुस्तकात आली आहे. माणसाच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योग फार महत्त्वाचा आहे योगा बद्दलची सविस्तर माहिती यात आली आहे ती उपयुक्त व महत्त्वाचे आहे. एकंदरीतच हे पुस्तक खेळाची आवड असणाऱ्यांसाठी व खेळाची आवड नसणाऱ्यांसाठीही उपयुक्त माहिती देणारे उत्तम पुस्तक झाले आहे .एका अधिकारी शारीरिक शिक्षकाने ते लिहिले असल्यामुळे पुस्तकाला विशेष मूल्य प्राप्त झाले आहे .श्री संतोष मिसाळ यांनी परिश्रमपूर्वक या पुस्तकाचे लेखन केले आहे .त्याबद्दल त्यांना धन्यवाद. त्यांच्या हातून अशीच क्रीडा सेवा व साहित्य सेवा होत राहो ही सदिच्छा त्यांनी एका चांगल्या पुस्तकाची निर्मिती केल्याबद्दल धन्यवाद पात्र आहेत. पुढच्यालेखनासाठी त्यांना शुभेच्छा.

**प्रकाशक :- साहित्य साधना प्रकाशन, दर्यापूर**
**किंमत :- 100 पृष्ठ :- 80**




# आशा स्वयंसेविकेची मोलाची भूमिका

आधुनिक केसरी

आजकालच्या धावपळीच्या जीवनात आशा स्वयंमसेविकेचे जीवन पाहिजे तेवढे सोपे नाहीये घराची जबाबदारी सांभाळून गावातील प्रत्येक पेशंटची विचारपुस करण सर्वांना जमत नाही गावातील एखादी स्त्रि गरोदर राहिली कि तिची नोंदनी करून तिच्या तिसऱ्या महिन्यापासून सतत तिची विचारपुस करण तिची डिलीवरीची वेळ येई पर्यंत अगदी



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

घरातल्या व्यक्तिप्रमाने तिची काळजी करण एवढ्यावरच आशाच काम संपत नाही तर लहान बाळाचे पोलियो लसिकरण असो किंवा गावातील महिलाना काही प्रॉब्लम पहिला शब्द तोंडातुन हा निघतो कि ती अशा स्वयंसेविका आहे जि असेल ती आपल्या कार्यातुन समजावर एक छाप पडणाऱ्या आशा स्वयंसेविका कड़क उन्हाळा असो किंवा मुसलधार पाऊस आपल्या सेवेत काहीच कमी पडू देत नाही अगदी जेवन करत असतांना सुद्धा कधी डिलीवरी पेशंटचा कॉल आला तर ताट सरकुन आधी त्या पेशंटला हॉस्पिटल मध्ये घेऊन जायची व्यवस्था करतात घरोघर फिरून नवजात बालकाच्या लसिकरनाची जबाबदारी त्या चोक पने पार पडतात मीटिंगा अटेंड करण, शिबिर राबवन, कागदी लिखान अशी बरिच काम आशा स्वयंम सेविकेला करावी लागतात जी सामान्य माणसांच्या नजरेंस पड़त नाही किती सहज़ एखादी व्यक्ति बोलून जाते ना कि आशा स्वयंसेविकेला काही जास्त काम नसत पण तीच काम तिलाच माहिती कितीही महत्वाची काम असली तरी ती बाजूला सारुन मीटिंग ज्वाइन कराविच लागते एवढ करून सुद्धा पेमेंट होत नाही चार चार महीने तरी ती एका शब्दाँन सुद्धा तक्रार करत नाही आपल काम ती निरंतर सुरु ठेवते आजतागत ग्रामीण भागातील महिला असो किंवा मुली काही गोष्टीपासून वंचित होत्या त्या आज त्यांना मिळतात यांच कारण फक्त आशा स्वयंसेविका आहे



पिरेड मध्ये आजही कापडचा उपयोग करणाऱ्या महिलांना सेनेटरी नैपकिन पूरवन त्यांना पटउन देन एवढ सोप नसत ते आशाला जमत लोकांची कितीतरी टोमने आशा स्वयंसेविकेला ऐकावी लागतात आशा स्वयंसेवीकेविषयी बोलाव तेवढ कमीच आहे अश्या सर्व आशा स्वयंसेविकाना सलाम.

# नदीकाठचा शिवार



अय्युब पठाण
संपर्क ९७६४३५०३७४

आधुनिक केसरी

**नदीकडे जाताना पांदीमधूनच जावे लागते. उन्हाने झाडांची पिकलेली पाने गळून खाली पडत होती. पांदीमधल्या झाडाखाली पाचोळ्यांचा निवारा करून बसलेली खारूताई होती. तिने आपल्या पिवळ्या - काळ्या पट्टयांचे अंग फुलवून गोंडेदार शेपटी उभारून आवाज काढला. खारूताई दोन पायावर बसून आपल्या पुढच्या पायांनी कान खाजवीत तोंड पुसून मोठी जांभाई दिली. इतक्यात साळूंक्याने मोठ्या आवाजात किलबिलाट केला. मग खारूताईने " चिररर चिक, " असा आवाज करून शेपटी फडकावली, आणि झाडांच्या उघड्या पांद्यावरून सरसरत शेंडा गाठला.**

विविध पक्षांच्या व रानपाखरांच्या किलबिलाटाने पांदीतली दुतर्फा झाडे स्तब्ध उभी होती. रानवारा अगदी शांत झोपी गेला होता. पांदीच्या पायथ्याला लागूनच असलेल्या रस्त्यावर जनावरे नदीकाठी चरत होती. चोहीकडे काळीभोर भेगाळलेली जमीन आणि भयाण वातावरण होते. रानात पसरलेली पक्षी आपापले कळप करून झाडांवर किलबिलाट करीत होती. गुराखी पोरे आपापले तहानलेल्या मुक्या जनावरांना पाणी पाजण्यासाठी गुरेढोरे- शेळ्या - मेंढया - करडे नदीवर आणून त्यांना भरपेट पाणी पाजून परत जंगलात चरायला घेऊन जात होते. मुख्य रस्त्याने जाणारे- येणारे वाटसरू पायवाटेला असलेल्या झाडाखाली बसून ऊन टाळून आसरा घेत होती. उन्हाच्या झळया अधिकच वाढत होत्या. हळूहळू साऱ्या जंगलात शांतता पसरली.

चारी बाजूंनी काळेभोर नदीकाठचा शिवार उन्हात तापत होता. तहानलेले काळवीट - हरिणी नदीवर पाणी पिण्यासाठी आलेली होती. त्यात काळविटाची निमुळती बनलेली टोकदार शिंगे मानेबरोबर थरथरत होती. काळविटाने नाकपुडी फुलवून चारी बाजूला मान फिरवून पाहिले, पण त्याला कुणीच दिसले नाही. त्याच्यामागे फक्त हरणांचा मोठा कळप उभा होता. भरपेट पाणी पिल्यावर साऱ्या हरिणी काळविटाच्या पुढील हालचालीची वाट पाहू लागल्या. एवढ्यात नदीच्या पाण्यातील एका माशाने पाण्यावर उडी मारुन पुन्हा पाण्यात सूर मारला. या आवाजाने सारी शांतता भंग पावली. क्षणार्धात कळविटाने, मॅंक असा आवाज काढला नि साऱ्या हरिणीचा कळप वाऱ्याच्या वेगाने काळविटामागे धावत जाऊन जंगलात दिसेनासा झाला. पुन्हा नदीकाठावर हळूहळू शांतता पसरू लागली. नदीच्या काठावर बगळ्याची रांग माशांच्या शिकारीसाठी उतरलेली होती. बगळयांचे पिवळे लांब पाय, लांब चोच. बगळ्यांचा हा थवा नदीतल्या निळ्याशार पाण्याला नदीच्या काठाला पांढऱ्या रंगाची झालर लावल्यासारखी शोभून दिसत होती. बगळे हे संथ व शांत निळ्याशार पाण्यात माशांची पाण्यावर येण्याची वाट पाहत अन् मासा दिसला की लगेच त्याला आपल्या लांब चोचीत धरीत. सारे बगळे मासे चोचीत पकडून बाजूला उडून जाऊन मासे खाण्यात दंग होती. एवढ्यात कोठून तरी कावऽऽ कावऽऽ झाडावरील एक कावळा ओरडला. बसल्या जागेवरून त्याने परत आवाज दिला. साथीदाराच्या या आवाजाने जागा झालेला दुसऱ्या कावळ्यानेही त्याला साद दिली. त्या आवाजाने झाडावर बसलेल्या इतर कावळेही बगळ्यांना व त्यांच्या चोचीतल्या पकडलेल्या माशांना भुकेल्या नजरेने न्याहाळून पाहू लागले.

पुढे नदीचे पात्र अनेक ठिकाणी खंडित झालेले होते. फक्त अधूनमधून पाण्याचे साठे दिसत होते. उन्हाच्या रखाट्याने होरपळल्या जाणाऱ्या शिवारावर उभी असलेली हिरवीगार झाडे मात्र डोळयांना विसावा देत होती. इतक्यात शेंड्यावरून काहीतरी वेगाने खाली उतरले, काय होतंय हे कळायच्या आतच शेजारचा मासा उचलला गेला, आणि क्षणभर तो होता रंगीत पाखराच्या चोचीत. मग भ्यालेले सारे मासे पाण्याच्या तळाशी जाऊन थांबले. सूर्य पश्चिमेकडे झुकत होता. हळूहळू आकाशात ढगांची दाटी होत होती. सोसाट्याचा वारा सुटलेला होता. सारे आकाश ढगानी भरून गेले. आणि ढगांची रास पूर्वेला थबकली. पूर्व क्षितिजावर काळ्याभोर ढगानी फळी धरली. ती फळी आकाशात चढत होती. सूर्य ढगाआड गेल्याने चोहीकडे शिरवळ पडलेले होते. त्यामुळे संध्याकाळ व्हायच्या आधीच अंधारून आल्यासारखे वाटत होते. सुकलेले झाडांचे शेंडे तेवढे मात्र वाऱ्याने डोलत होती, आणि एवढयात डोळे दिपवणारी वीज कडाडत खाली उतरली. पावसाचा पडदा विजांचा आदब घेत



पुढे-पुढे सरकत होता. टपोरे थेंब नदीच्या पात्रावर पडत होती. येणारे थेंबं तापलेल्या वाळूत घर करून जागच्या जागी सुकत होती. थेंबापाठोपाठ सरीही कोसळू लागल्या. उभ्या पावसात नदीचे पात्र भिजत होते. रानपाखरे व पक्षी आपापली घरटी जवळ करीत होती. वाऱ्याच्या झोतात सारी झाडांची पाने सळसळत होती. अचानक आलेला हा वळवाचा पाऊस बराच वेळ पडत होता. शिवारातल्या नाल्या- ओढयातून तांबड्याभोर पाण्याचे लोट येईल तो पालापाचोळा घेऊन पुढे पुढे धावत होता. नदीपात्रात ते पाणलोट वाहत- वाहत येत होते. पाऊस हळूहळू कमी झाला. मातीच्या सुगंधाने सारी भूमी दरवळली. झाडावरील चिमण्या- साळुंके, होले- पारवे आपापले ओलावलेले पंख फडफडवीत त्यांनी अंग साफ केले. कावळेही झाडावर बसून पंख झाडीत होते. जागोजागी साचलेल्या निथळ पाण्यात आकाशाचे प्रतिबिंब स्पष्ट दिसत होते. तिकडे सकाळपासून रानात गेलेले बायाबापुडे, बैलगाड्या, शेतकरी, शेतमजूर वळवाच्या पावसात भिजून रस्त्याने गावाकडे जात होती. गुराखी आणि गुरे-ढोरे घराच्या ओढीने घराकडे अंधार पडण्याच्या आत पाय उचलून गावाच्या दिशेने चालू लागली. वळवाच्या या पावसाने नदीकाठचा सारा शिवार अधिकच खुलून दिसत होता.

---

तुकारामनीती
भाग -४८

# पुण्य पर उपकार पाप ते परपीडा ।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जगद्गुरू तुकाराम महाराजांचा गाथा महाराष्ट्रातील प्रत्येक वाचकाने वाचायलाच हवा. एवढा अट्टहास का? असा सहज कुणी प्रश्न करेल, त्याला तुकोबांच्या गाथ्यात अनंत उत्तरे सांपडतील. संत तुकोबाराय जरी कीर्तनकार, भजनकरी, वारकरी सांप्रदायिक असले तरी त्यांचा जीवनानुभव आणि अभंग लेखन हे वैश्विक विचारांनी ओतप्रोत होते. तमाम मानवाचे कल्याण हा एकमेव उद्देश त्यांच्यासमोर असल्यामुळे त्यांचे अभंग सर्वांना जीवनोपयोगी पडतात. याशिवाय तुकोबांची वाणी ही रोखठोक आहे. कीर्तन अथवा लेखन करतांना ते कुणाचीही भाडभीड ठेवत नाहीत. याचाच परिणाम असा झाला की; विविध धर्मातील लोकसुद्धा तुकोबांच्या अभंगांचा संदर्भ देऊन बोलतात. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० साली संपादित प्रथम पाक्षिक "मूकनायक"च्या मुखपृष्ठावर काय करू आता धरुनिया भीड । निःशंक हे तोंड वाजविले।। नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण । सार्थक लाजोनी नव्हे हित।। असे जगद्गुरू तुकोबांच्या अभंगांचे उल्लेख आढळून येतात. सतराव्या शतकांत व्यक्त केलेले विचार विसाव्या शतकात प्रज्ञावंत महापुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर अग्रस्थानी घेतात, याचा अर्थ जगद्गुरू तुकोबाराय सर्वकाळ आपल्या सोबत राहून आपल्याला मार्ग दाखवत आहेत असे म्हणणे वावगे ठरू नये.**

याशिवाय गाथ्यातील अभंगांचे बरेच असे संदर्भ देता येतील, जिथे तुकारामांची गाथा मार्गदर्शक म्हणून उपयोगात आणली जात आहे. संत तुकारामांनी आपल्या गाथ्यात विविध प्रकरणे लिहून आपला अभंग गाथा वाचकांना सहज-सुलभ करून दिला आहे. विविध प्रकरणांपैकी धुर्वक नावाचे २८ अभंग असलेले प्रकरण आहे. हा शब्द मोठा मजेशीर आहे. मी अनेक शब्दकोश शोधले, मात्र कुठेही या शब्दाचा अर्थ सापडला नाही. अनेक विद्वान, अभ्यासक, महाराज मंडळींना विचारून पहिले, परंतु कुणीही या शब्दाचा अर्थ सांगितला नाही. सतराव्या शतकांत लिहिलेला एक शब्द आज आपल्याला सापडत नाही, याचा काहीतरी उपाय करावा, म्हणून मी हे सर्वच्या सर्व २८ अभंग काळजीपूर्वक वाचले. माझ्या परीने, चिंतनाने धुर्वक या शब्दाचा अर्थ लक्षात आला. धुर्वक म्हणजे, तुकाराम महाराज ईश्वराला प्रार्थना करतात की; हे ईश्वरा मला सुद्धा तू ध्रुव बाळासारखे अढळ पद दे म्हणजेच मी माणूस म्हणून जन्माला आल्याचे माझ्याकडून सार्थक करून घे! अशी ध्रुव बाळासारखी लडिवाळ मागणी अथवा कैफियत मांडणारे अभंग म्हणजेच धुर्वक अभंग होत. या अभंगांमध्ये सर्वपरिचित असे 'वायावीन वाढविला हा लौकिक', 'न कळे तत्वज्ञान मूढ माझी मती', 'नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितीभाव', 'तुझा शरणांगत जालो मी अंकित' 'कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन' आदि सुप्रसिद्ध अभंग यात समाविष्ट आहेत. त्यापैकीच

**पुण्य पर उपकार पाप ते परपीडा। आणिक नाही जोडा दुजा यासी ॥१॥ सत्य तैचि धर्म असत्य ते अकर्म। आणिक हे वर्म नाही दुजे ॥२॥**
**गति तेचि मुखी नामाचे स्मरण। अधोगति जाण विण्मुखता ॥३॥**
**संतांचा संग तोचि स्वर्गवास। नर्क तो उदात्त अनर्गळा ॥४॥**
**तुका म्हणे उघडे आहे हित घात। जया जे उचित करा तैसे ॥५॥**

हा सर्वांगसुंदर आणि अर्थ-तत्वाने ओतप्रोत भरलेला हा जगद्गुरू तुकोबांचा एक अभंग! इथे महाराज पाप-पुण्याची सहज सरळ-सोपी व्याख्या करून जातात. दुसऱ्याला अडचणीत मदत करणे, एखाद्याच्या अडचणीच्या कामाला धावून जाणे, आपल्याला मदत करणाराला आणि आपल्याला मदत न करणाराला, त्रास देनाराला, शत्रूला सुद्धा प्रसंगी मदत करणे म्हणजे खरे पुण्य होय. त्यामुळेच संस्कृत सुभाषितकार एकेठिकाणी

**पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः।**
**नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः परोपकाराय सतां विभूतयः॥**

हे सुंदर वचन असे सांगते की; ज्याप्रमाणे नद्या स्वतःचे पाणी पित नाहीत, वृक्ष स्वतःची फळे खात नाहीत आणि आपल्यातून पडलेल्या पाण्याने उत्पन्न झालेले अन्न ढग खात नाहीत. हे कार्य जसे परोपकारी असून त्यांची संतांच्या बरोबरीने तुलना होते, त्याच न्यायाने परोपकार करणाऱ्या लोकांची तुलना पुण्यवंत लोकांमध्ये होते. याच्या उलट जे लोकांना लुबाडतात, उपकार करणाऱ्यावर अपकार करतात असे कृतघ्न, काया-वाचा-मनाने इतरांना त्रास देणारे लोक हे खरे पापी आहेत. त्याचबरोबर सत्य हाच केवळ धर्म असून जे जे असत्य आहे ते अधर्म आहे. जसे तैतरीय उपनिषदात

**सत्यं वद धर्मं चर स्वाध्यायान्मा प्रमदः। आचारस्य प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः॥**

सांगितले आहे, तसे तुकोबाराय इथे प्रतिपादन करतात. धर्माची एवढी सरळ, साधी व्याख्या तुकोबाराय इथे करतात. एवढे सोपे वर्म महाराजांनी या अभंगात सांगितले आहे. सतत सत्कर्मात वेळ घालवणे म्हणजे गती किंवा प्रगती आणि कामाशिवाय अथवा नामाशिवाय वेळ घालवणे म्हणजे दुर्गती होय. त्याचबरोबर सज्जन, संत प्रवृत्तीच्या लोकांचा संग म्हणजेच खरा



स्वर्गवास असून अनियंत्रित, स्वैर, अनिर्बंध, उच्छृंखल लोकांसोबत राहणे म्हणजे नरकात राहणे होय. अशाप्रकारे कुणाला आपले हित करून घ्यायचे की घात करून घायचा ? हे उघड उघड ज्याच्या त्याच्या हातात असून यातून ज्याचे त्याने काय ते समजून घ्यावे.

संत तुकाराम महाराजांच्या वाङ्मयाचे हेच एकमेवाद्वितीय वैशिष्ट्य असून, तुकोबाराय आपल्या सरळ-सोप्या, कळणाऱ्या अभंगातून तमाम मानवी जीवनाच्या उत्थानाची अनेक तत्वे सांगत जातात. पाप-पुण्य, सत्य-असत्य, धर्म-अधर्म, प्रगती-अधोगती, स्वर्ग-नरक आणि त्यातून मानवाचे होणारे हित-अहित याचे एकदाच आणि इतके सोपे वचन सांगणारे अन्य कुणी आपल्याला इथे सापडत नाही. साधी बाळबोध भाषा वापरून अत्युच्च तत्वे व्यक्त करण्याचे कसब जगद्गुरू तुकोबांना सहज साध्य झाले. याचा परिणाम म्हणजे त्यांचे अभंग अशिक्षित, बालगोपाळ, स्त्रिया आणि वयोवृद्ध लोकांना सहज स्मरणात राहिले आणि राहतात. याचा परिणाम म्हणजे आज बहुतांश कीर्तनकार मंडळी संत तुकाराम महाराजांचे अभंग निरुपणाकरिता निवडतात. त्याशिवाय त्यांच्या अभंगातील नित्य व्यवहारातील दृष्टांत-सिद्धांत सहज सांगता येतात. अज्ञ लोकांना कळणारे, सुज्ञांना मार्गदर्शक आणि प्राज्ञ जणांना उपदेश करणारे महान वाङ्मय तुकोबाराय लिहून गेले आहेत. हा अनमोल ठेवा आपल्या हाती विनामूल्य मिळणे म्हणजे आंधळ्याला सोन्याच्या मोहरांचा हंडा सापडण्यासारखे आहे. त्याचा डोळसपणे आपण सर्वांनी विनियोग करून घेणे नितांत गरजेचे आहे. काळ बदलला आहे. साधने बदलली आहेत. सगळीकडे वस्तू आणि पैशाचा तुडुंब बाजार भरलेला असतांना मूल्य मात्र तिच आहेत. नियमित लोक जन्मत-मरत आहेत. साधनांच्या भाऊगर्दीत सुख मात्र दृगोचर झाले आहे. अशा खडतर काळात वाळवंटातील मरुद्यानाप्रमाणे तुकोबांचे अभंग अगदी विस्तीर्ण हिरवळीप्रमाणे डोळ्यांना सुखावून जातात. तुकोबांची दृष्टांत-सिद्धांत मालिका मोठी विलक्षण असून ती लक्षणीय निर्देशसंपन्न झालेली आढळून येते. विविध प्रतिमांची प्रतिभा ओसंडून वाहतांना गाथा सहजच लोकप्रवाही होऊन जातो. अगदी जगद्गुरु तुकोबांच्या भाषेतच सांगायचे झाले तर "तुका म्हणे असे हातीचे कांकण। तयांसी दर्पण विल्हाळक." अवघड सहज सोपे करून सांगण्याचे कसब तुकोबांएवढे कुणाकडे पटकन सापडत नाही. जीवन जगण्याची सहज-सुलभ तत्वे प्रतिपादन करतांना तुकोबाराय वृथा कर्मकांड आणि व्यक्तीस्तोमापासून समाजाला परावृत्त करून भजन, कीर्तन, परोपकार, सत्य, सत्संगती इत्यादी सुलभ साधनांच्या द्वारे मोक्ष म्हणजेच मानवी जीवनात परमोच्च आनंद प्राप्ती होऊ शकते असे सांगतात. माणसाला एनकेन प्रकारे सुख पाहिजे आणि ते मिळवण्यासाठी अनावश्यक अट्टहास करण्याची आवश्यकता नसल्याचे इथे लक्षात येते. काळाला आव्हान देऊन तुकोबाराय लोकांचे साध्या पद्धतीने प्रबोधन करतांना पाहून तत्कालीन अवडंबर माजवणारांना तुकोबांचा क्रोध येणे साहजिक होते. याची तुकोबांना जाण होती, आणि त्यांनी त्यांचा क्रोध अंगावर झेलला सुद्धा! ते प्रतिकार करू शकले असते, मात्र त्यांनी सहन करून वेदनेच्या सलीतून नवनिर्मिती करण्याचे महत्कार्य केले. कदाचीत शारीरिक प्रतिकार करणे हे तुकोबांच्या मनाला पटत नसावे, परिणामी ते अक्षर लिहिते झाले.

सज्जनहो, काळ प्रचंड खडतर सुरु आहे! माणसांजवळील माणूसकी नावाचा झरा आटत चालला आहे. माणसाला माणूस ओळखू यायला तयार नाही. दिवसेंदिवस कृतघ्नतेचे प्रमाण वृद्धिंगत होतांना पाहून भीती वाटू लागली आहे. आपत्य आपल्या पालकांना ओळखायला तयार नाही. पैसा, तारुण्य आणि सत्तेच्या बेधुंद टोळ्या नशेने बेभान होऊन फिरत आहेत. आज तारुण्य हे अनियंत्रित, बेताल, मोकाट सुटले आहे. अशा अवस्थेत या सर्व बाबींना योग्य मार्गावर आणण्याचे, मस्तवाल, मद्यधुंद लोकांची नशा उतरवण्याचे काम आज लेखक, कवी, चिंतक लोकांनी करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. त्यासाठीच मी सातत्याने "तुकाराम नीती" नावाचे सदर लिहून तुकोबांच्या अभंगद्वारा लोकांच्या डोळ्यातील धुंदी धूसर करण्याचा प्रयत्न करतो आहे. पाप-पुण्याच्या संकल्पना व्यवस्थित समजून घेऊन लोकांना संत तुकाराम महाराजांचे जीवन-कार्य आणि त्या अनुषंगाने त्यांचे अभंग वाचनात-जीवनात यावेत यासाठी हा प्रयत्न सातत्याने चालू आहे आणि तो चालूच राहणार आहे. चला तर मग, आपण तुकोबांचे अभंग व्यवस्थित समजून घेऊन ती तत्वे जीवनात अंगीकारण्याचा प्रयत्न करूयात! असे होणे म्हणजे सांप्रतकाळी तुकोबांना आपल्या जीवनात उतरवणे होय आणि प्रस्तुत तुकाराम नीतीचे फलित सुद्धा! जय तुकोबाराय!

# मुलांचा कॉपीचा अंधकारमय प्रवास..



राहुल अ. त्रिभुवन
संपर्क 8793433287

आधुनिक केसरी

**सध्या दहावी बोर्ड परीक्षा सुरु असून बारावीच्या परीक्षा संपल्या आहेत. संपूर्ण वर्षभर अभ्यास करूनही परीक्षा केंद्रावर कॉपीचा नंगानाचं सुरु असून याकडे सर्वच विभागाने दुर्लक्ष केल असून या मुलांसाठी कॉपीचा हा प्रवास नक्कीच अंधकारमय ठरणार आहे. मुलांनो वर्षभर तुम्ही दहावी बारावी चा अभ्यास करतात.भारिभारी शाळा, महाविद्यालय मध्ये प्रवेश घेता. इतकेच नाही तर खाजगी शिकवणी वर्ग पण लावतात.तरीसुद्धा कॉपी करण्याची वेळ का येते. याचा अर्थ तुम्ही तुमच्या आई,वडील व शिक्षकांना फसवत आहात.**

अवाजवी ट्युशन फीस शाळेचा, महाविद्यालयाचा खर्च, अभ्यासाच्या नावाखाली भारिभारी मोबाईल फोन असे सर्वच उपलब्ध करून दिल्यावरही कॉपी करण्याचा अट्टहास का? काही पालकही कॉपी ला समर्थन करताना दिसून येतात. दहावीचे वर्ष आहे बारावीचे वर्ष आहे.कॉपी करू द्या,तुम्ही पण मदत करा असा तर काही पालक संबधित शाळा महाविद्यालयास वटहुकूमच काढतात.पण मुलांनी कॉपी करून केलेला शैक्षणिक प्रवास खरंच आपल्या मुलांना फायदेशीर ठरणार आहे का? तो स्पर्धेत टिकू शकेल काय? त्याचा शैक्षणिक प्रवास अजून खडतर व अंधकारमय बनविण्यात काही शिक्षक व पालक दोन्हीची भूमिका दिसून येते.पालक व शिक्षक मुलांना दहावी बारावी ला कॉपीयुक्त मदत करतात पण भविष्यात एखादा डिप्लोमा,डिग्री व व्यवसाय करताना मुले यशस्वी होतील का? जर कॉपी करूनच पास व्हायचे असेल तर मग शैक्षणिक खर्च करायचा तरी कशाला. जास्तीची ट्युशन फीस, वर्षभर शाळा महाविद्यालतील शैक्षणिक खर्च करायचा तरी कशाला? मुलांचे भविष्य उज्वल घडवायचे असेल तर आजच पालकांनी मुलांनी शिक्षकांनी कॉपीमुक्त शिक्षणासाठी भर दिला पाहिजे. कॉपी करून भलेही तुम्ही पुढे जाल पण आयुष्याच्या गणितात स्पर्धेच्या युगात यशस्वी होऊ शकत नाही. काही शाळा महाविद्यालयात तर स्वतः विषय शिक्षक, ट्युशन शिक्षक मदत करताना दिसून येतात. पालकही या गोष्टीचे समर्थन करतात. पालकांना वाटत आमच्या मुलांची शिक्षकांना खूप काळजी आहे. म्हणून ते मुलांना मदत करत आहेत पण खरं तर हेच आहे की ते शिक्षक शिकवत नसेल किंवा त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण झालेला नसतो तसेच खाजगी क्लास चा शिक्षक जर मुलांना मदत करून कॉपी पुरवून पास करत असेल किंवा त्याचा चांगला निकाल ओढून आणत असेल तर त्यांनी या गोष्टीचा विचार करावा यामुळे त्या मुलांना भविष्यात अनेक शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागेल. परिणामी उच्च शिक्षण घेत असताना विषय बॅक राहणे नापास होणे. हतबल होणे. दहावीला कॉपी केली की बारावीला पण अपेक्षा करतात. पुढे शिकताना कॉपी करता येत नाही अन मग परिणामी मुले डिप्रेशन मधे जातात. मानसिक ताणतणावाचा सामना करावा लागतो.शिक्षण पूर्ण होऊनही योग्य क्षमतेचा व्यवसाय सुरु न करू शकणे याला कारणीभूत आपणच ठरणार आहात. काही मुले वर्षभर अभ्यास करतात तर काही मुले अभ्यास करण्याचं ढोंग करतात. आई वडिलांना फसवीतात. आणि परीक्षेच्या दिवशी कॉपी ची अपेक्षा करतात आणि काही शिक्षक पालक तो हट्ट पुरवतात आणि त्यांचं भविष्य अंधारात पण हेच काही लोक ढकलत आहेत हे त्यांनी विसरू नये. एका बाजूला शिक्षण विभाग निर्णय घेत कॉपीमुक्त अभियानाची घोषणा करत आणि एका बाजूला या विभागाचे काही महाभाग कॉपी ला समर्थन करताना दिसून येतात अन म्हणतात दहावीचे/बारावीचे वर्ष आहे वाया जाईल मग प्रश्न



असा तुम्ही की तुम्ही वर्षभर शिकवता काय? अन मुलांनो तुम्ही वर्षभर कोणता अभ्यास करत असतात. परीक्षा केंद्रावर ज्या मुलांनी वर्षभर अभ्यास केला आहे आणि ज्या मुलांना कॉपीमुक्त परीक्षा द्यायची आहे अश्या मुलांची तेथील उर्वरित मुले व शिक्षक उपहास करताना दिसून येतात व त्यांची मानसिक हानी करतात. परिणामी वर्षांनुवर्षे हे मुले अभ्यास करत नाही शिक्षक शिकवत व तयारी करून घेत नाही व कॉपी च्या बळावर जास्तीचे मार्क घेऊन येतात तरी सुद्धा अयशस्वी ठरतात. स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर मुलांनो एक संकल्प करा वर्षभर अभ्यास करणार. घरच्यांना फसवीणार नाही.तुमचे पालक तुमची शैक्षणिक फीस भरण्यासाठी, शिक्षणाचा खर्च उचलण्यासाठी खूप मेहनत करत असतात. भलेही तुमचे पालक नोकरदार असो वा व्यावसायिक. मुलांनो उज्वल भविष्यासाठी त्याग करावा लागेल. अभ्यास करावा लागेल. कॉपीमुक्त पेपर द्यावे लागेल मग बघा आयुष्याच्या गणितात आणि स्पर्धेच्या युगात तुम्हाला कोणीच मागे टाकू शकत नाही. आणि तुम्ही विजयी व्हा. मुलांनो एका मिनिटात आयुष्य बदलू शकत नाही पण एक मिनिट विचार करून घेतलेला निर्णय मात्र आयुष्य बदलू शकतो.

**ए पोरा, कॉपी करून जाशील पुढे, पण तुला यशस्वी होता येणार नाही, प्रवास उजेडातील की अंधारातील**
**हे तुला समजून घेता येणार नाही**
**मुलगा म्हणजे घराचा दिवा असतो**
**मग का असे तो आपल्या आईबापा फसवतो**
**जन्म दिला आईने तुला बापाने धरले बोटाला**
**घास भरवीला तुला दिला पिळा स्वतःच्या पोटाला**
**कॉपीमुक्ती चा कर ध्यास त्यासाठी कर अभ्यास**
**मग जीवनात अन स्पर्धेतही गड्या**

होशील तू पास म्हणून एवढेच सांगेल तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार. तू गुलाब होऊन सुगंध दे तुला जग ओळखेल. आपला प्रवास कॉपीमुक्त करूया. घराच्यांची स्वतःची गावाची आपल्या जिल्ह्यांची मान उंचवूया आणि कॉपी ला हद्दपार करूया.

# थोर व्यक्तिमत्त्वांच्या अर्धांगिनींची जीवनगाथा



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**कन्या, बहीण, पत्नी, सुन, आई , आजी, मामी, मावशी, काकी, आत्या अशा विविध भूमिकेत वावरताना कर्तव्य आणि जबाबदारी यशस्वीरित्या निभावणारी शक्ती म्हणजे स्त्री. शरीराने कोमल, कमकुवत असली तरी मानसिकरित्या खंबीर आणि जिद्दी, संवेदनशील, प्रेमळ, कुटुंबवत्सल , घरावर संकट आल्यावर धीटपणे उभी राहणारी स्त्री . स्त्रीची ही रुपं आपण पाहत आलो आहोत. स्त्रीच्या आयुष्य कधीच सोपे नव्हते. पूर्वीच्या पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे स्त्री ही नेहमी दुय्यम स्थानावर राहिली.**

तिला स्वतःसाठी कधीही ठामपणे मत मांडता आले नाही. शिक्षणापासून वंचित, बालविवाह, सासरी छळ, हुंडाबळी, मारहाण या सगळ्यांला तिला सामोरे जावे लागले. आजही स्त्रियांना समाजाने आखून दिलेल्या चौकटीत राहावे लागते. स्त्री ही कितीही सक्षम असली, हुशार असली तरी तिची उन्नती होऊ दिली नाही. विसाव्या शतकानंतर खऱ्या अर्थाने स्त्रिया पुढे येऊ लागल्या. सामाजिक चळवळीत त्या सहभागी होऊ लागल्या. आधुनिक विचारांच्या प्रभावामुळे स्त्रियांमध्ये स्वतंत्र विचारांची बीजे रोवली गेली.

आज स्त्रिया कुटुंब , समाज, देशपातळीवर कोणतेही क्षेत्र असो आपल्या कर्तृत्वाने ती उजळून निघत आहे. सांगण्याचा मुद्दा हा, की स्त्री कितीही बुद्धिमान, हुशार, कुटुंबवत्सल किंवा एखाद्या कामात निपुण असली तरी तिचं कार्य, तिचा त्याग, समर्पण समाजाच्या नजरेत दुर्लक्षित राहिले. ते तिचे कर्तव्य आहे, त्यात तिने वेगळे काय केले, या प्रश्नामुळे म्हणा किंवा पुरुषसत्ताक समाजव्यवस्था, सामाजिक विचारांमुळे म्हणा , स्त्रीची कार्यकुशलता झाकोळली गेली. आपण आजवर अनेक कवी, लेखक यांचं साहित्य वाचलं असेल, त्यांच्या साहित्यावर अनेक कार्यक्रम सादर केले जातात, चर्चासत्र होतात, त्यांच्या कविता, कथा रसिकांच्या मनात अजरामर झाल्या. अनेक राजकारणी व्यक्ती, कलाकार यांचं कार्य आपणास माहीत आहे. पण या संपूर्ण प्रवासात त्यांच्या पत्नीची भूमिका काय असेल किंवा या विविध व्यक्तिमत्त्वांच्या पत्नीची फक्त नावेसुद्धा आपल्याला पटकन सांगता येत नाहीत, ही खरेच खेदजनक गोष्ट आहे. घरातील पुरुष आपले उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी बेदरकारपणे तेव्हाच बाहेर पडू शकतो, जेव्हा घरातील स्त्री सक्षमपणे कुटुंबाची धुरा सांभाळते. तेजस्वी व्यक्तिमत्त्वांच्या कार्यामुळे जिच्या त्यागाची, प्रेमाची प्रतिमा झाकोळली गेली अशा अर्धांगिनींची जीवनगाथा पुस्तकरुपात यावी, या प्रांजळ व कृतज्ञ भावनेने लेखिका यामिनी पानगांवकर यांनी 'साहित्यिकांच्या अर्धांगिनी' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात साहित्यिक, राजकारणी व्यक्ती, कलावंत अशा थोर व्यक्तिमत्वांच्या सहचारिणींचा परिचय करून दिला आहे. एकप्रकारे ही साहित्यिकांच्या पत्नींची अल्पचरित्रेच आहेत. या पुस्तकात स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य देऊन, तिचं कार्य प्रकाशात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य लेखिकेने केले आहे. 'साहित्यिकांच्या अर्धांगिनी' पुस्तकाचे शीर्षक इतके समर्पक आहे, की वाचताच क्षणी हा विषय मनात रुंजी घालत राहतो. खरेच विचारप्रवृत्त करणारी गोष्ट आहे ही, ज्यांचे कार्य जगाला माहीत आहे, त्यांच्या या जीवनप्रवासात त्यांच्या अर्धांगिनीचा किती बहुमोल योगदान असेल, हा विचार कधी मनात डोकावला नाही. लेखिका यामिनी पानगांवकर यांनी या पुस्तकात २४ अपरिचित स्त्रियांचा परिचय, त्यांच्या कार्याची ओळख करून दिली आहे. सहज ओघवती भाषाशैली, मुद्देसूद आणि अभ्यासपूर्ण मांडणी यामुळे या पुस्तकाची साहित्यिक गुणवत्ता लक्षात येते. या पुस्तकात रामकृष्ण परमहंस, जवाहरलाल नेहरू, गोपाळ आगारकर , माधव ज्युलियन, बालकवी, महर्षी धोंडो केशव कर्वे, कवी अनिल, यमुना सावरकर, कुसुमाग्रज, प्रल्हाद केशव अत्रे, डॉ. श्रीधर केतकर, डॉ.चिंतामणराव देशमुख, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, व . पु. काळे, गदिमा, जयवंत दळवी,




प्रभाकर पाध्ये, वसंत कनेटकर, विंदा करंदीकर, श्री. ज. जोशी, रागिणी पुंडलिक, नारायण सुर्वे, मंगेश पाडगावकर या दिग्गज व्यक्तिमत्त्वांच्या पत्नींचा जीवनप्रवास यात शब्दबद्घ केला आहे. पुस्तकात स्त्रियांच्या एकूणच जीवनप्रवासासोबतच तत्कालीन सामाजिक परंपरा, रूढ़ी, सामाजिक भेद, तत्कालीन विचारसरणी, कौटुंबिक वातावरण, स्त्रियांचे तेव्हाचे जीवन, भावविश्व , त्यांच्या वेदना हा भागही अत्यंत प्रभावीपणे लेखिकेने नमूद केला आहे. प्रचंड वाचन, दुर्मिळ ग्रंथ मिळवून, जिद्द, संबंधित साहित्यिकांच्या नातेवाईकांना भेटून,चर्चा करून, प्रत्येक गोष्टीची शहानिशा करून लेखिकेने हा महत्वपूर्ण ऐवज वाचकांसाठी प्रकाशात आणला आहे.

यातील काही स्त्रियांबद्दल फारच जुजबी माहिती आपण ऐकली असेल पण या पुस्तकात या सहचारिणींच्या जीवनाचं वास्तव, त्यांचा संघर्ष , त्यांचा त्याग , वेदना, दुःख वाचताना जाणवते की, अरे आपण किती अनभिज्ञ होतो, या गोष्टीपासून. यातील काही स्त्रिया आपल्याला त्यांच्या चरित्रामुळे परिचित असतील. उदाः कमल पाध्ये - बंध अनुबंध, साथसंगत - रागिणी पुंडलिक, मास्तरांची सावली - कृष्णाबाई सुर्वे, यशोदा पाडगावकर - कुणासस्तव कुणीतरी, पार्वतीबाई ठोंबरे - मी आणि बालकवी, आनंदीबाई कर्वे - माझे पुराण, सिंधुताई कानेटकर - साथ सोबत, सुधा अत्रे - गोदातरंग, विद्या माड़गूळकर - आकाशाशी जडले नाते, सुमा करंदीकर - रास इत्यादी. तसेच डॉ. सरोजिनी वैद्य, कुसुमावती देशपांडे यांची स्वतंत्र सिद्धहस्त लेखिका म्हणून सगळ्यांना परिचित आहेत. त्याव्यतिरिक्त ज्या स्त्रियांनी संसारासोबतच कौटुंबीक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक , आध्यात्मिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले, संघर्ष केला, सामाजिक भान जपत जबाबदाऱ्याही पेलल्या, ज्या प्रखर, तेजस्वी सूर्याच्या सोनेरी कडा होऊन त्या व्यक्तिमत्त्वांना आकार दिला, त्या कणखर आणि तितक्याच संवेदनशील अर्धांगिनींना वाहिलेली ही खरी आदरांजली आहे.

आपल्या संस्कृतीत पत्नीला सहचारिणी, अर्धांगिनी संबोधले जाते. त्या अर्थांप्रमाणे स्त्री पतीचे अर्धे अंग बनून त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. आपण निरंजन लावतो, पाहताना लोक म्हणतात, की दिवा जळतो आहे. खरे तसे नसते. दिवा जळत नसतो तर दिव्यातील वात जळत असते. तो दिवा म्हणजे पती आणि त्यातील वात म्हणजे पत्नी, अर्धांगिनी. हा दृष्टिकोन निर्माण करणारे हे पुस्तक स्त्रित्वाची खरी जीवनगाथा आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ कवी, गीतकार अरुण म्हात्रे यांनी प्रस्तावना लिहिली आहे.पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश खानविलकर यानी समर्पक साकारले आहे.

**( साहित्यिकांच्या अर्धांगिनी - लेखसंग्रह / लेखिका यामिनी पानगांवकर / प्रकाशक : संधिकाल प्रकाशन / मूल्य : १७५ रुपये )**

# बेरोजगारांना बेकारीच्या खाईत ढकण्याचे षड्यंत्र



मल्हारराव डोणगांवकर
संपर्क क्र. ९६३७९३७५७९

आधुनिक केसरी

**एव्हाना विधानसभेचं अधिवेशन चालु आहे. राज्याचे आर्थिक बजेट जाहीर करण्यात आले. यात काही निर्णय जनहिताचे घेण्यात आले. यानुसार नुकतेच विविध खात्यात रिक्त असणारी सुमारे ७५ हजार पदे ही भरली जाणार असे सुतोवाच सरकारने केले. हा निर्णय स्वागतार्ह म्हणावा लागेल. पण ही पदे सरळसेवा कायमस्वरुपी या तत्वावर न भरता कंत्राटी, तात्पुरत्या स्वरुपात भरली जाणार असे मा. मंत्री महोदय यांनी सांगितले. तेंव्हा हा निर्णय म्हणजे सर्व सुशिक्षित बेकारांवर अन्यायकारक असा आहे.**


का तर एकीकडे म्हणायचे आम्ही कर्मचाऱ्यांचे, बेरोजगांरांच्या हिताचे निर्णय घेतो, नोकऱ्या देतो. प रंतु कंत्राटीकरण म्हणजे एका हाताने घ्यायचे तर दुसऱ्या हाताने दिले आहे ते पण हिसकावून घ्यायचे, ही कुटनिती सरकारची दिसते. का तर मागील दहा वर्षापासून अनुभवास येत आहे. उदाहरणास्तव आता हेच बघा ना मागील दहा वर्षापूर्वी २०११-१२ या वर्षी कला, क्रीडा, कार्यानुभव ही शिक्षक निदशकांची २५ हजार पदे राज्य सरकारने भरली. परंतु ही सर्व पदे कंत्राटीकरणाच्या, खाजगीकरणाच्या तत्वावर भरली. ती तात्पुरत्या स्वरुपात म्हणजे ११ महिन्यांच्या ऑर्डरी, नियुक्ताा देण्यात आल्या, पुढे काय झाले ?

ही सर्व पदे कंत्राटीकरण, खाजगी तत्वावर भरल्यामुळे ११ महिन्यानंतर या सर्वांना राज्य शासनाने पुढील नियुक्त्या न देता या उलट कंत्राटीकरणाचा जी.आर. ही सबब पुढे करुन नोकरीवरुन कमी करण्यात आले. त्यांना चालू नोकरीपासून वंचित ठेवून उपासमारीच्या खाईत ढकलले. आज मितीस १० वर्ष होत आहे. पण यांना परत रुजू करुन घेतले नाही. न्याय मागायचा तरी कोणाकडे ? शेवटी निदेशक, शिक्षक कर्मचाऱ्यांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. न्यायालयाने कायमस्वरुपी नियुक्त्या द्या असा निकाल २०१४ दिला. पण हाच निकाल पायदळी तुडविण्याचे काम करुन सरकारने २०१४ ला चोख बजावले. हे सर्व कशामुळे तर कंत्राटीकरणाच्या जी.आर.मुळेच. हे मायबाप सरकार यांना नोकरी न देता नामानिराळे झाले. पण त्याची व त्याच्या कुटूंबियांची उपासमार होत आहे, याला जबाबदार कोण ? २०१४ चे भाजपचे सरकारच म्हणावे लागेल ना. तेंव्हा आता पुन्हा नव्याने कंत्राटीकरणाची भरती कशासाठी ? ही भरती नोकरी देणारी नाही तर रोजगार हिरावून घेणारी व त्यास बेरोजगारीच्या, उपासमारीच्या खाईत ढकलणारी म्हणावी लागेल सेच सध्या होणारी भरती ही एक-दोन हजार नव्हे तर तब्बल ७५ हजार पदांची भरती होणार आहे. तसेच शिपाई, शिक्षक, अकाऊंटंट, क्लार्क, लायब्रेरियन, इस्टेट मॅनेजर, जनसंपर्क आकिरी, बँक समन्वयक, उप लेखापाल, हेड क्लर्क, होस्टेल मॅनेजर, स्टोअर किपर, ज्युनिअर असिस्टंट, स्टेनो टायपिस्ट, सिनिअर क्लार्क, टेलिफोन ऑपरेटर, ड्रायव्हर आदि विवध खात्यातील मोठया संख्येने पदांची भरती होणार. तसे पाहिले तर मागील ५ वर्षापासून कोणत्याही पदाची भरतीच झालेली नाही. यामुळे बेकारांची संख्या ही भस्मासुरा सारखी वाढतच चालली आहे. दोन वर्षे तर कोरोनाचे सावट होते. त्या कालवधीत भरती तर दूरच उलट आहे ते आस्थापने, काम धंदे बंद होते. यामुळे कधी नव्हे एवढया मोठया प्रमाणात बेकारी, बेरोजगारीने डोके वर काढले आहे.

आता कुठे भरती जाहीर केली, पण कंत्राटीकरणाच्या नावाखाली. या कंत्राटीकरणामुळे कुणाचे भले होणार राज्यकर्ते, सरकारचेच ना. सुशिक्षित बेरोजगांराचे हित जोपासले जाणार आहे का ? अजिबात नाही. सरकारला याचे काही देणे घेणे नाही. त्यांना फक्त नी फक्त आर्थिक बोजा तिजोरीवर पडायला नको. असे वारंवार मा. उपमुख्यमंत्री साहेब ढोल बडवित आहे. मग कर्मचाऱ्यांची पेन्शन असेल, विविध पदांची भरती असेल.

अशा प्रकारे आता एक नाही, दोन नाही, तर सर्वच खात्यात असणारी रिक्त पदे ही कंत्राटीकरणाने भरली जाणार. याचाच अर्थ असा की, सर्वच विभागात खाजगीकरणाचा घाट घातल्या जात आहे.

## नवा पाडवा



नात्यात हवा गोडवा
निमित्त मात्र पाडवा
दुजाभाव विसरावा
पायंडा नवा पाडावा
कौरव लयास गेलेले
पांडवबंधुत्व आठवा
रावण जळो अंतरी
प्रभुराम गुण साठवा
सस्नेहसुयोग घडावा
देव भक्तीचा चढावा
उभारा गुढी स्नेहाची
अध्याय आरंभा नवा
कडुनिंब तारकमावा
तब्येत तंदुरुस्त ठेवा
व्हायरस काही नवा
घोर न लागो जीवा
प्रदूषण खूप झाले
बदलावी आतां हवा
बदलत्या युगा सवे
बदलआपणा व्हावा
जाणे सणांच्या गुणा
जतन संस्कृती ठेवा
भरवा भुकेल्या घास
मनात मिरवी गोडवा
- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

## घोडं कुठं अडलं आहे

आता पेन्शनसाठी
किती लढायचं
अन किती मरायचं ?
हयात सारी नोकरीत जाता
शेवटच्या दिसात
पोटाच्या खळगीसाठी
कोणाकडे पसरावे हात..
की जगायचं नाही निवृत्तीनंतर ?
प्रश्न तसाच अंधातरी
झाडाला टांगलेल्या वटवाघूळा
सारखा
तसं इथं नोकरी करीत
असतानाही
नाही भरोसा जिंदगीचा
उगलेला सूर्य मावळण्याआधी
दिवा घरातला विझून
अंधार सारा पडण्याचा
मग त्या काळोखात कसं जळावं
वातीना
दिवा निघून गेल्यावर ?
अन अन ती विझून जाता
दोष सांगा कोणाचा ?
आजही तुमचे आमदार अन
खासदार
लोकसेवक असूनही
पाच वर्षे सेवा करून पेन्शन
घेतांना
कायदा बदलतो माणूस पाहून
हे कळून चुकलं आहे
मग आमच्या जुन्या पेन्शनचं
सांगा
घोडं कुठं अडलं आहे ?

ज्ञानेश्वर गायके..कन्नड
मो..९४०३३८४८८९

## याद तुझी येऊन गेली

कुठे कधी कशी केव्हा अलवार मनात येऊन गेली
तुझ्या-माझ्या सोबतीची याद ती येऊन गेली
कोण कुठला कसा होतो एक प्रश्न मनात होता
अलवारपणे हासत जाता उत्तर ते देऊन गेली
पहाटेच्या गारव्याला पांघरून तो घेत होता
शेकोटीच्या उबेमधली उष्णता ती स्मरून गेली
भेटीमधल्या क्षणांचाही पसा तो भरला होता
कुठे गेली कशी गेली विरहात ते सांगून गेली
चाहूल तुझी लागता वाटेकडे तो पाहत होता
सांजावताना वेळ ती दुरावा तो बोलून गेली
अशाच त्या समयालाही प्रश्न तो विचारत होता
अनपेक्षित असे काही आठवून ती वेळ गेली
- © स्वानंद नंदकुमार मराठे

## एकच मिशन जुनी पेन्शन

एकच मिशन ठरलं आता आमचं
जुनी पेन्शन हाच आमचा ध्यास...
मान्य करा मागणी आमची
खाऊ द्या आम्हाला सुखाचा घास...

दिवस आता अवघड आले
महागाईने उच्चांक गाठला...
कसं द्यावं तोंड परिस्थितीला
मनात खरंच खूप दुःख साठलं...

पेन्शन साठी करून द्या
तुम्ही मोकळी वाट...
नका घालू सरकार तुम्ही
आमच्यासाठी अडचणींचा घाट...
उतार वयाची चिंता सतावते
पेन्शन नसले तर होतील हाल...
सोडवा आमचं कोड लवकर
रागात करू नका आम्हाला लाल...

आता आम्ही मागे
अजिबात हटणार नाही..
मा.मुख्यमंत्री साहेब तुम्ही
लवकर करा पेन्शन देण्याची घाई...

छाया भोसले
छ. संभाजीनगर.

## आयुष्याच्या संगतीला

आयुष्याच्या संगतीला
सजनी पांधी होऊन सोबतीला
सुर्याच्या तेजाने
तेवले पायाखालच्या मातीला
रस्त्यावरली खडेही काटे होऊन फुलली
आडवळणीच्या रस्त्याला
अंथरल्या वेदना
नशीबाच्या पंक्तीला
आयुष्याच्या संगतीला
सजनी पांधी होऊन सोबतीला
आयुष्याच्या चिंध्याची डागडुजी
उबदार गोधडीला
कोरड पडलेल्या आशेचा
कासरा नियतीच्या हाकेला
दिनकर,रजनी सहवासाला
हळवेसे रंग,ऊन वाऱ्याच्या संगतीला
आयुष्याच्या संगतीला
सजनी पांधी होऊन सोबतीला
- लक्ष्मण वाल्डे -कन्नड

## मंगलमय गुढी



नवचैतन्य घेवूनी
आला गुढीपाडवा
आपसात प्रेम वाटूनी
वाढवू नात्यातला गोडवा

गुढीपाडवा सण म्हणजे
आनंदाचा नि हर्षाचा
उत्सव साजरा करूया
मराठी नववर्षाचा

करूया नवे संकल्प
गुढीपाडव्याच्या
शुभदिनी
सलोख्याचे तोरण
बांधुनी
होवू आनंदाचे धनी

गुढी उभारू समतेची
नि हृदयातल्या ममतेची
नको आता जातीभेद
शिकवन घेवू एकतेची

निरोगी आरोग्यासाठी
स्वच्छतेचा वसा धरू
हाती लेखणी धरुनी
साक्षरतेचे बिज पेरू

स्नेहाची करूनी
देवाणघेवाण
विसरू मनातली अढी
घरोघरी उभारूया
सौख्याची मंगलमय गुढी

- रवींद्र व्ही.
चालीकवार
मो.9011559106

## कलियुग सत्य

भामट्याला तारू म्हणाला
सज्जनाला मारू म्हणाला
झिंगलेला होता तनाने
औषधाला दारू म्हणाला
अंधश्रद्धा आली रुपाला
ज्ञान बाजू सारू म्हणाला
सरळ मार्गी बेत ज्याचा
धूळ त्याला चारू म्हणाला
जीत ही मैदान सोडल्याने
कारणी मग हारु म्हणाला
वासनेने हापापलेला
ही कळी कुस्कारू म्हणाला
भ्रष्ट ज्यांचे आई व बाबा
ती मुले संस्कारू म्हणाला
® रज्जाक शेख
दोस्ती फौंडेशन अहमदनगर



## हाफ तिकीट

हसत हसत सिलेंडर
म्हणाला
जा फिरून ये आता मस्त
तुझा प्रवास झाला स्वस्त
पण तरीही अस्वस्थ
सिलेंडरच्या किंमतीने
ती बिचारी वाकून गेली
महागाईच्या बाजारात
तिची स्वप्नं झाकून गेली
तिकीट अर्धी
झाल्यापासून
मनात माहेर दाटलेलं
किती दिवस झालं
आई बाबांना भेटलेलं
तरीही ती किचनमध्ये
दमलेली स्वयंपाकात
रमलेली
सगळ्या डाळी हसत
होत्या वाढलेल्या किंमती
सांगत होत्या
मुलांची फी मानगुटीवर
बसलेली
साखर कायम रुसलेली
तेलाने तर तिचा घाम
काढला होता
शेवटचा पुडा आजच
फोडला होता
पगाराच्या
आकड्यासोबत
तिचा प्रवास सुरूच आहे
तिचं फिरणं स्वस्त झालं
म्हणून काय झालं..?
तिचं जगणं अजूनही
महागच आहे.
पांढऱ्या बगळ्यांचं
राजकारण
अजून तिला कळलं नाही
आणि समानतेचं तिकीट
तिला अजून मिळलं नाही
दंगलकार नितीन
चंदनशिवे
मु.पो.कवठेमहांकाळ
जि.सांगली
संपर्क 070209 09521



## असावं लागतं कविमन

कविता कळायला सुद्धा
कविमन असावा लागतं
काय लिहिलय कवितेत हे
शब्द-शब्दातून दिसावं लागतं
कवितेतला प्रत्येक शब्द
डोळ्यांत साठवायचा असतो
शब्दा शब्दातला गुढ अर्थ
हृदयापर्यंत पाठवायचा असतो
गुपित कवीच्या मनाचं
कवितेतून उमटतं
काय सांगायचंयं कवीला
हे शब्द -शब्दातून प्रकटतं
कवितेच्या प्रत्येक शब्दात
काहीतरी असतो अर्थ
ज्याच्याकडे नाही कविमन
त्याच्यासाठी सगळंच व्यर्थ
कवीच्या कवितेला सुद्धा
हृदयात बसावं लागतं
कवीच्या आर्त भावनेला
डोळ्यांतून दिसावं लागतं
कविता कळायला सुद्धा
कविमन असावं लागतं...
सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे,
परभणी

## गुढीपाडवा...!



सण गुढी पाडव्याचा,
आनंद घेऊनी आला.
नव्या वर्षाचा आरंभ,
गुढी उभारूनी झाला.
सण गुढी पाडव्याचा,
वृक्षांना फुटती पाने.
चोहीकडे दिसे प्रसन्न,
हिरवी-हिरवी राने.
सण गुढी पाडव्याचा,
कोरोनाला नष्ट करू.
सुख-शांती नांदावी ही,
संकल्पना मनी धरू.
सण गुढी पाडव्याचा,
बांधु यशाचे तोरण.
निरोगी जगण्यासाठी,
पाळू आरोग्याचे नियम.
सण गुढी पाडव्याचा,
स्फुर्ती चढे अंगाअंगात.
नव्या उमेदीने करू या,
नव्या प्रगतीची सुरुवात...!
- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४

## एकच मिशन, जुनीच पेन्शन

ही नवीन पेन्शन योजना
फसवी आहे, घातक
आहे; ती जुनीच पेन्शन
योजना सुरक्षित व
फायदेशीर आहे.
आमच्या बेमुदत
संपाला तुम्ही 'संघटित
दादागिरी' म्हणता;
राजकीय दबाव आला
की, विकाऊ पत्रकारिता
करता.
एकदा निवडून आले
की, तुम्ही आर्थिक
घोटाळे करता;
सात पिढ्यांची सोय
करण्यासाठी
निष्पाप जनतेचे गळे
कापता.
कोरड्या व फसव्या
आश्वासनांचा
तुम्ही बारमाही
पाऊस पाडता;
आमची तहान-भूक
शमण्याआधीच
विकासाची नदी गायब
करता. बेमुदत संप
आणखी तीव्र करू
जुनी पेन्शन योजना
सुरू झालीच पाहिजे;
सामर्थ्य व ताकदीचे
दर्शन घडवू
आमचा घास आम्हाला
मिळालाच पाहिजे.
एकच मिशन, जुनीच
पेन्शन जुनी पेन्शन
योजना लागू करा;
एकच मिशन, जुनीच
पेन्शन अन्यथा खुर्च्या
खाली करा...!

मिलिंद हिवराळे
बार्शिटाकळी, जि.
अकोला
भ्र. ७५०७०९४८८२




## तुझ्या पायाची पैंजण



तुझ्या पायाची पैंजण ।
कशी वाजते रुणझुण ॥
तिच्या गोडं श्रवणानं ।
माझे हरते गं भान ॥धृ॥
किती मंजुळ मधुर ।
कानी घुंगरांची धुन ॥
सखे आपुल्या प्रेमाची ।
गं हिच खरी खुन ॥1॥
हिऱ्या मानकांची नक्षी ।
तिला लाल लाल मणी ॥
राणी तुझ्या पैंजणांची ।
खूप करुण कहाणी ॥2॥
किती राबलो झिजलो ।
किती तुडविली वाट ॥
तुझ्या एका शब्दासाठी ।
सखे उचलली ताट ॥3॥
आरामाच जिणं माझं ।
गं त्यागल तुजसाठी ॥
केला पै पै जीवाचा ।
फक्त तुझ्या प्रेमापोटी ॥4॥
कधी घासली मी भांडी ।
कधी झाडूहीं मारला ॥
अट्टहास इतुका प्रिये ।
एका प्रेमासाठी केला ॥5॥
दिस रात केलं काम ।
तंव्हा घेतलं पैंजण ॥
तुझ्या मुखड्याच हसू ।
माझ्या सुखाच आंदण ॥6॥
नाही शोभा रातीला गं ।
जशी चंद्रकोरावीण ॥
माझ्या या जीवनाला ।
नाही अर्थ तुझ्यावीण ॥7॥
सखे येशील फिरून ।
जीव तुजवरी लिन ॥
स्वप्नी येई ऐकू मला ।
तुझ्या पैंजणांची धुन ॥8॥
- मनिष आहिरे
सटाणा नाशिक 7588069679

# वसंत फुलला



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आधुनिक केसरी

**आज देशमुखांच्या घरात अतिशय आनंदाचा दिवस होता. लग्नानंतर तब्बल सहा वर्षानंतर सायली आणि गौरवला बाळं झाली होती. सगळ्या देशमुखांच्या घराला जणू आनंदाने डोलवणारा,बहरवणारा वसंत ऋतु झुलवत होता. आईबाबा होण्याचं स्वप्न सत्यात उतरलं होतं त्याचा आनंद दोघांच्याही चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. लहानग्यांना उराशी कवटाळत सायली डोळ्यापुढे भुतकाळात हरवली होती. गौरव मधुकरराव व मालतीकाकूंचे शेंडेफळ..... थोरला अजय मधली शरयू धाकटा गौरव .....**

नाशिक जवळच्या आपल्या मुळगावी मधुकरराव व मालतीकाकूं रिटायरमेंट नंतर कौलारू टुमदार छोटेखानी बंगल्यात राहायला गेले होते. गावाला लागूनच त्यांची शेती होती ती बघत.आपल्या मदतनीस असलेल्या लांबच्या नात्यातल्या भाऊ आणि त्याच्या कुटुंबाला पण त्यांचा आधार होता आणि मधुकरराव आणि मालतीकाकूंना त्यांची सोबत!.. अजय पुण्यात सरकारी नोकरीच्या निमित्ताने आपल्या बायको आणि मुलांसोबत तिथेच स्थिरावला.शरयु पण खात्यापित्या घरात मुलांबाळांसोबत संसारात रमली होती. मालतीबाई गौरवसाठी चांगल्या मुलीच्या शोधात होत्या. मधुकररावांच्या मदतनीसांच्या ओळखीतून सायलीचे स्थळ आलं होतं. सायलीचे आईबाबा हयात नव्हते पण मामामामींनी तिचा पोटच्या लेकीसारखं वाढवलं होतं. गौरव रेल्वे खात्यात असिस्टंट स्टेशन मास्तर म्हणून कार्यरत होता. शिकलेला ,देखणा, उंचापुरा असलेल्या गौरवचं स्थळ जिला मिळेल ती भाग्यवान म्हणावी असंच होतं.

सायली पण देखणी,शिकलेली,सुगरण, सर्व कामात तरबेज अशीच होती. पत्रिका जुळल्या ,एकमेकांची चौकशी, विचारपूस सर्व काही ठीक आहे याची खात्री करून बघायचा दिवस ठरला.

फिक्कट गुलाबी रंगाची साडी नेसून लांबवेणी सावरत, कपबश्यांचा ट्रे घेऊन येणारी हसतमुख सायली बघताच क्षणी गौरवला आणि त्याच्या कुटुंबाला पसंत पडली होती. नेमक्या त्याच दिवशी गौरवने पण फिक्कट गुलाबी रंगाचा शर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स घातली होती त्यात तोअजूनच रुबाबदार दिसत होता ......

गौरव तर एकटक तिच्याकडे बघत राहिला होता.तुला काही विचारायचे असतील तर विचार असं म्हणत मधुकररावांनी त्याच्या पाठीवर छोटासा धपाटा घालत त्याला भानावर आणलं होतं......

नाही... काही नाही विचारायचं! असं म्हणल्याबरोबर एकच हशा पिकला होता. गौरव आणि सायली दोघेही क्लिनबोल्ड झाले होते...... मनात वसंत बहरला होता.

याद्या झाल्या, साखरपुडा झाला,लग्नाची तारीख ठरली. दोन्ही कुटुंबांनी लग्नाचा खर्च निम्मा वाटून घेतला होता. थाटामाटात,परंपरागत रितीरिवाजप्रमाणे लग्नसोहळा पार पडला. समृद्धीच्या, नव्यानवलाईने सोनपावलांनी नवरीचा देशमुखांच्या घरात प्रवेश झाला.

नव्या नवलाईचे दिवस सुरू होऊन.... संपले देखील! नाशिक रेल्वे स्टेशनवर गौरवचं रोजचं काम सुरू झाले होते. गौरवची शिफ्टवाईज ड्युटी असायची .कमी जास्त कामामुळे तो कधी कधी सकाळी गेल्यावर तो संध्याकाळीच घरी येत असायचा. सायली दिवसभर घरी एकटीच असायची. तिला बागकाम करायला खुप आवडायचे. आपल्या क्वार्टरसमोरच्या जागेत छोट्या प्रमाणात बाग फुलवायची असं ठरवत असतांनाच ............

एके दिवशी गौरव आनंदाने जवळजवळ धावतच घरी आला त्यांने सायलीला पटकन उचललं आणि म्हणाला सायलू ! सायलू डार्लिंग चल सामान बांधायला घे ! आपल्याला लोणावळ्याला जायचं आहे! मला प्रमोशन मिळाले आहे..... आठ दिवसांत जाँईन व्हायला सांगितले आहे. स्टेशन मास्तर म्हणून प्रमोशन झालं आहे ! चल चल तयारी सुरू कर निघायचं आहे आपल्याला......



दोघेही घरच्यांचा,शेजारचा निरोप घेऊन लोणवाळ्याला पोहोचले. आधीच लोणावळ्यातील हवा छान, गारं ,थंडी वातावरण कसं आल्हाददायक, गुलाबी सगळंच कसं छान होते. गौरवला मिळालेले क्वार्टर म्हणजे छोटेखानी टुमदार कौलारू घर होतं.समोरच्या बाजूला बागेसाठी जागा होती.छोटंस अंगण होते, सायलीने सकाळी अंगण झाडून स्वच्छ केले ,सडा घातला त्यावर सुबक रांगोळी काढली.

चहा करावा म्हणून तिने आणलेल्या सामानातला बॉक्स काढला तेवढ्यात घराची कडी वाजली. तीनं दार उघडले

मुळ हैद्राबादी असलेल्या त्याच टोनमध्ये म्हणाल्या "नमस्ते मैं आपकी पडोसन" मिसेस हरनामसिंग बुंदेल ! आपके बाजूवाले घर में रहते है ! आईये !बैठिये! असं म्हणत ती कुठं बसवावे ह्यांना ? हा विचार करत असतानाच ती पन्नास ते पंचावन्न वयाची बाई म्हणाली मुझे सब अक्का बुलाते है! आप भी यही बोली ये । असं म्हणत तीने सायलीच्या हातात डबा आणि थर्मासफ्लास्क दिला.

अब हम फॅमिली है ! आप का घर लगने तक आपको सुबह,दोपहर,शाम को हम में से एक टिफीन लाके देगी । इधर बाजूमें रेड्डी,अनंतराव, कुलकर्णी,पद्माराव, कृष्णराज, जब्बार पटेल, हॅरी,नंबियार,काटीकर और इनके बाजूंमे मार्कंडेय रहते है। सायली पाहताच राहीली..... हातातल्या डब्यातल्या गरमागरम पदार्थंचा चटका बसला. तेव्हा ती भानावर आली.धन्यवाद म्हणे पर्यंत अक्का निघून गेल्या होत्या.गरमागरम ईडली,सांबार,चटणी असा डबा देऊन गेल्या.....

दुपारी काटीकर काकू आल्या सायलीची सगळी चौकशी करत त्यांनी पण डबा हातात दिला. भाजी, पोळी आमटी, भात ,चटणी कोशिंबीर, अप्रतिम चवीचा शिरा असा साग्रसंगीत डबा दिला. काही काळजी करू नकोस ग ! तुला काही लागलं तर नक्की सांग. आणि हो तुझ्या मदतीला शकुबाईला पाठवते. चांगली आहे.... सांगून काम करून घे ...... असं म्हणत त्यांनी निरोप घेतला.

सायलीला आईची आठवण आली.पण ती मागे टाकीत आवराआवरी करण्यात ऐकेक बॉक्स काढतं असताना दाराची कडी वाजली.

दार उघडल्या वर मी शकुबाई मला काटीकरबाईंनी पाठवलंय.......काय काय करायचं ? सांगा म्हणत आपल्या नऊवारी साडीचा घोळ खोचत सायली आणि ती कामाला कधी लागल्या कळलेच नाही.बघतबघत संध्याकाळ झाली. घर जवळपास लागलंच होते आता उरलेले उद्या सकाळी लवकर येवून आवरू लागते असं म्हणत ती गेली.

सायलीने हातपाय धुवून देवापुढे सांजवात लावली तेवढ्यात दाराची कडी वाजली. दारात केसांचा अंबाडा,साडी खोचलेला पदर तसाच आणि त्यांच्या बरोबर एक वीस बावीस वर्षांची तरुणी सोबतच्या पिशवीत लखलखीत घासलेल्या पितळी डब्यात पांढऱ्याशुभ्र भाकरी ,वांग्याची भाजी, आणि वरणभात असा डबा आणला आहे हे एका दमात सगळे सांगून परत येते गं ! चल ग सुले ! दादा आले असतील घरी म्हणत परत परत फिरून सायलीची चौकशी करत होत्.या . तेवढ्यात त्यांची छोटी मुलगी धावत आली आई ग चल घरी दादा आले आहेत. मग लगबगीने उठत काकू म्हणाल्या येते गं परत ! डबा परत न्यायला कपीला नाही तर जयूला पाठवते काळजी करू नकोस.असं म्हणून त्या गेल्या. सायलीने डब्यावरचं नाव वाचलं सौ. मार्कंडेय!!

दुसऱ्या दिवशी किराणामाल,भाजी वगैरे आणण्यासाठी सायली आणि गौरव बाजारपेठेत गेले.... येताना सामानाबरोबर वेगवेगळी रोपं, भाज्यांच्या बिया,खत, बागेसाठी लागणारी अवजारे, कुंड्या असं बरंच सामान घेऊन परतले. सायलीला बागकाम करायची खुप आवड होती . गौरव ऑफिसला गेल्यावर तिला वेळचं वेळ होता.

त्यांच्या क्वार्टर्सचा परिसर अतिशय रम्य असा होता. छोटे छोटे कौलारू घरे, आणि प्रत्येक घरासमोर छोटीशी बाग होतीच. आधीच लोणावळ्यातील हवा छान, थंड आणि आजुबाजूच्या परिसरात असणाऱ्या झाडीमुळे आल्हाददायक वातावरण...... हळूहळू लग्नाला सहा वर्ष होतं होती.

सायलीची बाग पण हळूहळू फुलायला सुरुवात झाली., सिताफळ, पेरूचं झाड आकार घेत मोठं होतं होतं. सायली ,जाई,जुई मांडवावर चढण्यासाठी धडपडत होत्या. नीटनेटके वाफ्यात मेथी, पालक, कोबी कोथिंबीर,फ्लॉवर,गाजर अलगद मातीतून डोकावून बघत होते. चारपाच टोमॅटोची आणि चारपाच वांग्याची रोपं रूजली होती. मोगरा आणि गुलाब आपल्याच नादात होते. ........ रोजचं आयुष्य रूटिन झालं होतं......मातीत रोपं रूजली पण फुलायला मात्र........ उशीर होत होता.

कॉलनी मध्ये सर्व सणवार उत्साहात परंपरागत पद्धतीने एकत्र साजरे करायचे. एके दिवशी कॉलनी मध्ये कुठल्यातरी सणानिमित्त कार्यक्रम ठेवला होता. त्यात सायलीला पण बोलवलं होतं पण तिथं तिला विचित्र वागणूक मिळाली .बोलवून तिचा अपमानच करण्यात आला की काय असं तिला वाटायला लागलं. काहीही कुणाशी न बोलता ती तिथून मुकाटपणे निघून आली घरी आल्यावर खूप रडली... कुणीतरी तिला तुम्हाला मुलं किती हा प्रश्न विचारला या प्रश्नाने ती खूप दुखावली गेली कारण लग्नाला सहा वर्षे झाली तरी आपली कुस अजून उजवली नाही याचं दुःख तिला सतत बोचत असे... आजच्या प्रसंगाने तर तिचा धीर सुटला होता..... क्रमशः.

# अश्रूंची भाषा कळणे आवश्यक..!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**मनुष्य प्राण्यासारखा या जगात कोणताही दुसरा प्राणी हुशार नाही तसेच बुद्धीवान सुद्धा नाही म्हणून एखाद्या माणसातील माणुसकी बघून त्याला कोणी देवमाणूस म्हणतात तर..कोणी प्रेरणास्थान म्हणतात तर..कोणी आधारस्तंभ म्हणतात. पण, काही माणसातील माणुसकी बघून त्याच माणसापासून दूरही निघून जातात असे अनेकदा आपण आजच्या घडीला समाजात परिवर्तन होताना बदलेले चित्र बघितले असणार.**

तसेच आपल्याला अनुभव सुद्धा आलेले असतील... अशा अनुभवातून सुध्दा खूप काही शिकायला मिळत असतो .त्याच प्रमाणे माणूस जरी काही तत्वांनी बणलेला असेल तरी त्याच्यात काही इंद्रिये सुद्धा असतात व प्रत्येक इंद्रिये माणसाचे आधार होत असतात. पण काही लोक आपल्याच इंद्रियांकडे दुर्लक्ष करुन नको त्या मार्गाने जाऊन त्याच इंद्रियांना खराब करुन टाकतात तिथे कोणत्याही इंद्रियांचा दोष नाही. स्वयंम माणूसच दोषी असतो हे, माणसाला कळणार कधी... ? हा एक भारी मोठा प्रश्न आहे. हे, सर्व आजच्या सुशिक्षित माणसाला कळायला पाहिजे. या सर्व इंद्रियांमध्ये दोन इंद्रिय आहेत तेच म्हणजेच डोळे होत.

ह्या दोन डोळ्यांमुळे सर्व काही आवडीने माणूस बघू शकतो फक्त, बघण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक असायला पाहिजे. जेव्हा, आपण सकारात्मक दृष्टीने बघत असतो तेव्हा, त्याच डोळ्यातून वाहणारे आनंदाश्रू वाहत असतात आणि नकारात्मक दृष्टीने बघितल्यानंतर शेवटी त्याचे परिणाम ही वाईट बघायला मिळत असतात किंवा एखादे दुःख जवळून बघितल्यानंतर त्याच डोळ्यातून वाहणारे अश्रू सतधार तर..वाहत असतात पण खूप काही शिकायला भाग सुद्धा पाडत असतात व बोलून सुद्धा दाखवतात फरक एवढाच की,त्यांची भाषा आपल्याला कळत नाही. उदा.कधी, कधी आपण मुक्या प्राण्यांच्या भावना तसेच त्यांचा आवाज ऐकून सहजपणे त्यांना ओळखत असतो व होईल त्यावेळात त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करत असतो तसेच आपल्या डोळ्यातून वाहणाऱ्या सुख, दुःखाच्या अश्रूंची भाषा समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे.डोळ्यातून वाहणारे अश्रू आणि त्यांचा एक, एक थेंब खूप मोलाचे असतात कधी ते रडतात तर..कधी ते हसतात तर..कधी नव्याने जगण्यासाठी तयारी सुध्दा ठेवत असतात एवढेच नाही तर. .आपल्याच भाषेतून माणसाला बरेच काही सांगत असतात ते कधी म्हणतात अरे माणसा तू जागा हो,आता तरी लाग कामाला तू थकू नकोस बरंच काही तुला करायचं आहे जर..आताच थांबलास तर...पुढचा किणारा कधी गाठशील.. ? तू थकू नकोस तर. .सदैव सत्याच्या वाटेवर तुला चालत रहायचं आहे, मागे वळून पाहू नकोस कारण मागे बघशील तर..मागेच राहशील,स्वतः जगण्यासाठी तसंच इतरांना जगविण्यासाठी तुझा जन्म झालेला आहे, तू स्वतः ला कमी लेखू नको जीवनात कितीही संकटे आली तरी तू संघर्ष करण्याची ताकद ठेवली पाहिजे.

तू ज्ञानी आहेस, तू हुशार आहेस, चांगला मार्गदर्शक तर..आहेसच तेवढा मेहनती सुद्धा आहेस तू खंबीरपणे उभे रहाणे गरजेचे आहे तेव्हाच तू इतरांचा आधार होशील. .खरंच डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंची भाषा किती साधी आणि सरळ असते नाही का.. ?त्यांना आपल्याला ओळखता आले पाहिजे. बरेचजण म्हणत असतात की, अश्रू खूप काही शिकायला भाग पाडतात, खूप काही देऊन जातात, आपण फक्त ऐकतो, वाचतो पण त्यांच्याकडे मात्र लक्ष देत नाही त्यामुळेच आपल्याच डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंची भाषा आपल्याला कळत नाही हे सत्य आहे तरीही त्यांच्याकडे दुर्लक्ष न करता लक्ष देणे फार आवश्यक आहे तेव्हाच अश्रूंची भाषा अगदी सहजपणे आपल्याला कळेल..

# संघर्षाशिवाय पर्याय नाही!



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आधुनिक केसरी

**प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष हा ठरलेलाच आहे.कोणी एका रात्रीत मोठा होत नाही. त्याला संघर्ष करावाच लागतो.एखाद्याला खुप मोठी झेप घ्यायची असेल तर आयुष्यात संघर्षाशिवाय पर्याय नाही.**



संघर्षाशिवाय काहीच मिळत नाही. मनात इच्छाशक्ती असली पाहिजे. स्वकर्तुत्वावर स्वताच्या पायावर उभे राहुन आयुष्यात काहीतरी करून दाखवायचे हा प्रचंड आशावाद मनात असला पाहिजे.आयुष्यात कोणतीच गोष्ट नशिबाने मिळत नाही.जी माणसं संघर्ष करतात तिचं माणसं यशस्वी होतात. आयुष्यात कोणतीच परीक्षा अवघड नसते फक्त त्या परीक्षांचा सामना करता आला पाहिजे.जी माणसं संघर्ष करायला डगमगतात ती कधीच आयुष्यात यशस्वी होत नाही.आपला व्यवसाय, उद्योग कोणताही असो बस फक्त विश्वासाने ठाम रहायचं आपण प्रामाणिकपणे कष्ट केले तर कष्टाचे फळ आपोआप मिळते.आपलं नशिब मेहनतीने घडवणारे अनेक लोक आहेत. आपल्या वाट्याला आलेला संघर्ष ते हसत हसत झेलतात. आयुष्यात कोणतीही परीस्थिती यशाच्या आड येत नाही. हे लक्षात ठेवा. त्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे. संघर्ष आपल्याला जगण्यासाठी उर्मी देत असतात. आयुष्यात संघर्ष कोणालाच चुकलेला नाही. आयुष्यात संघर्ष करण्याची ताकद,जिद्द अंगी असावी लागते. ज्यांना यशस्वी व्हायचे आहे त्यांनी संघर्ष करण्याची क्षमता वाढवली पाहिजे. आपला स्वताला अभिमान वाटला पाहिजे. की आपल्याला संघर्ष करायला मिळाला.कारण ज्यांच्यामध्ये संघर्ष करण्याची क्षमता असते अशीच माणसे आयुष्यात घडलेली आहेत.बरेचजण प्रयत्न करून देखील असफल होतात.परंतु सतत संघर्ष करत आपण पुढे चालत राहिले पाहिजे.आपल्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत संघर्ष अटळ आहे.तो कधीच संपत नाही आणि संपणारही नाही त्यामुळे संघर्षाला घाबरू नये. असा एखादा माणुस शोधुन दाखवा की त्याला दुःख नाही.दुःख,अडचणी ह्यचा सामना करणे गरजेचे आहे.ज्यावेळेस सर्व काही संपले आहे .असं वाटायला लागते.त्याचवेळेस आपला संघर्ष सुरू होतो.त्यामुळे संघर्षाशिवाय काहीच मिळत नाही.जीवन आहे म्हटल्यावर संघर्ष अटळ आहे. तेव्हा आयुष्यात संघर्षाशिवाय पर्याय नाही.

# कापूस घरात आणि व्यापारी दारात

## ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे अर्थचक्र मंदावले

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**पिशोर :** कन्नड तालूक्यातील, पिशोर, हस्ता, मेहगांव, वासडी, निम्भोरा, पळशी, रामनगर, साखरवेल, खातखेड़ा, कोलंबी, भरम्बा,जैतखेड़ा, भिलदरी, वडाली, हिवरखेड़ा, जेहूर, औराळा, मूंगसापूर, तांदूळवाडी, आडगाव, खामगाव कानडगाव विटा, औराळा, शिरोडी, बीपखेडा गव्हाली कवीटखेडा, वड़नेर आदींसह परिसरातील शेतकऱ्यांनी यंदा कापसाला चांगला भाव मिळेल. या आशेवर कापूस घरामध्ये साठवून ठेवला. मात्र शेतकऱ्यांनी मागील 3 महीने कापूस सांभाळून सूध्दा चांगला भाव तर मिळत नसल्यांने शेतकरी वर्गाला कापसाला साठवून चार महीने पूर्ण होत असल्याने अनेक शेतकऱ्यांच्या कापसात वजनात मोठी घट तर आलीच पण कापसामध्ये पिसा झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या अंगाला खाज येत असून अनेक शेतकऱ्यांच्या त्वचा रोग आला आहे. यामुळे काही शेतकरी मिळेल त्या भावात कापूस व्यापाऱ्यांना देत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यात व्यापारी शेतकऱ्यांना सांगत आहे शासनाने कापसाला जीएस टी कर लागू केला त्यात गाडी भाडेही वाढल्याने कापसाचे भाव पडल्याने शेतकरीवर्ग मात्र हवालदिल झाला आहे. चार महीने थांबून ही कमी भावातच कापूस विकावा लागत आहे. त्यामूळे शेतकऱ्यांना झालेला खर्च ही वसूल होतो की नाही अशी परीस्थीती परीसरात पहावयास मिळत आहे. जास्त दिवस कापूस घरी पडून रहिल्याने कापसाचे वजन ही घटले आहे. भाववाडीच्या आशेमारी ठेवलेला कापूस शेतकऱ्यांना सध्या डोकेदुखी ठरत आहे. कापसाला कमी भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गातून मोठया प्रमाणात शासनाच्या विरोधात सूर निघत आहे.



### उधारीच्या स्वरूपात घेतलेले पैसे वसूलीसाठी सावकारांचा तगादा

आजघडीला शेतकऱ्यांचा 60 टक्के कापूस घरातच पडून आहे . बाजारात हमीभावाच्या तुलनेत ज्यादा भाव मिळत असला तरी गतवर्षी खुल्या बाजारात १३ हजारांपर्यंत पोहोचलेला कापूस साडेसात हजारांवर स्थिरावला आहे . किमान १० हजार भाव मिळावा या अपेक्षेने कापूस अजूनही घरात पडून आहे . सुरुवातीला कापसाने नऊ हजार ते साडेनऊ हजार रुपयांपर्यंत उसळी घेतली होती . या भाववाढीमुळे शेतकऱ्यांच्या अशा पल्लवित झाल्या व त्यासाठी पिके वाचविण्याकरिता शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागला . आलेल्या उत्पन्नाला कवडीमोल भाव मिळणार , या दु :खात बळीराजा असताना अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना तडाखा दिला असून , त्यात होते नव्हते ते सर्व हातचे गेले . यामुळे शेतकरी मेटाकुटीला आले आहेत . शेतकऱ्यांना दहा हजारांची प्रतीक्षा लागली . मात्र , भाव आठ हजारांच्या पुढे सरकायला तयार नाही . त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीसाठी सावकाराकडून घेतलेला कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे . गेल्या तीन ते चार महिन्यांपूर्वी मोजून ठेवलेल्या कापसाच्या वजनात दहा क्विंटलमागे एक ते दीड क्विंटल घट येत आहे . त्यात पुन्हा रब्बीसाठी व्याजाने घेतलेल्या कर्जाचा डोंगर वाढला आहे व सावकाराचा तगादा सुरू झाला आहे जास्त दिवस घरात साठवून ठेवलेल्या कापसावर पिसूंचा प्रादुर्भाव झाला असून , शेतकरी कुटुंबीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे . कापूस घरात ठेवला तर चावतो आणि एवढ्या दिवस घरात ठेवून कमी भावात विकायचा कसा ? अशा विवंचनेत शेतकरी सापडला आहे .

**यंदा उत्पादनात ही मोठी घट :** कन्नड तालुक्यातील या यंदा कमी पावसामुळे नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाचे यंदा उत्पादन कमी झाले . त्यामुळे त्याचा परिणाम बाजारपेठेवर झाला . खरेदी केंद्रावर कापसाची आवक थंडावली आहे . सुरुवातील निसर्गाने साथ दिल्याने कापसासह अन्य खरीप पिकांची चांगली वाढ झाली , पण नंतर संततधार व अतिवृष्टीच्या पावसामुळे 'फुलपगड्या' संपूर्ण गळाल्या , मात्र नवीन पालवी फुटलीच नाही . त्यामुळे कापूस उत्पन्न कमी झाले . मागील वर्षाच्या तुलनेत एका बॅगमागे दीड ते दोन क्विंटल उत्पन्न घटले आहे . कापसाच्या उत्पादनावर त्याचा परिणाम झाला आहे . शेतकरी अडचणीत सापडला आहे . सध्या घरामध्ये असलेल्या कापसाच्या थप्या पडून आहे . मात्र , दर कमी मिळत असल्याने कापूस घरात आणि व्यापारी दारात अशी गत झाली आहे, या महिन्यात कापसाचे दर वाढेल अशी आशा परिसरातील शेतकऱ्यांना आहे .



## आ. प्रशांत बंब यांच्या विकासनिधीतून १० लाखांच्या सिमेंट रस्त्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आ. प्रशांतजी बंब साहेब यांच्या स्थानिक विकास निधीतून भडजी येथे 10 लक्ष रू सिमेंट रस्त्याचे उद्घाटन माजी उपसभापती दिनेश अंभोरे , प्रकाश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच गावात जाणारा मोठा पुल देखील आमदार प्रशांतजी बंब साहेब यांच्या शिफारशीनुसार गंगामाई कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून तयार करून दिल्याबद्दल सरपंच बाबासाहेब वाकळे व गावातील नागरिकाच्या वतीने आमदार बंब साहेब याचे आभार व्यक्त करण्यात आले, या सिमेंट रस्त्याच्या उद्घाटन प्रसंगी ग्रामपंचायतचे सरपंच बाबासाहेब वाकळे , भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे,उपसरपंच राजु वाकळे, गणेश घोडके, मच्छिंद्र वाकळे, देवनाथ वाकळे, ज्ञानेश्वर वाकळे, रामेश्वर वाकळे, सुधाकर वाकळे, विजय वाकळे,भाऊसाहेब पुसे,बद्रीनाथ वाकळे, काकासाहेब वाकळे,नानाभाऊ कसारे, कादरभाई शेख,तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य व गावातील नागरिक उपस्थित होते.

## पाणी फाऊंडेशन फार्मर कप प्रशिक्षणासाठी शेतकरी जळगावला रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील दहा गावातील महिला व पुरुष गट शेती करण्यासाठी जळगाव जिल्ह्यात असणाऱ्या प्रशिक्षणासाठी रवाना झाले आहे. सदरील उपक्रम हा पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे, अशी माहिती पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद आरसुळ यांनी दिली. तालुक्यातील दहा गावांतील महिला व पुरुष शेतकऱ्यांची पहिली प्रशिक्षणार्थीची बॅच आर्यन इको रिसॉर्ट, जळगाव या सेंटरवर प्रशिक्षण घेण्यासाठी गुरुवारी (ता. १६) रवाना झाली. तालुका कृषी मंडळ अधिकारी काकासाहेब इंगळे यांनी प्रशिक्षणाला जाणाऱ्या गावकऱ्यांना शुभेच्छा देत बसला हिरवा झेंडा दाखवला. प्रशिक्षणाला कान्हेगाव, चिंचोली नकीब, शहापूर, वावना, निधोना,नायगाव, लालवन,आडगाव बुद्रुक, बोधेगाव बुद्रुक, मारसावळी,किनगाव, पाडळी आदी गावचे प्रतिनिधी गेले आहे. तिन दिवसीय निवासी प्रशिक्षणात गट शेती, शाश्वत शेती विषमुक्त शेती जमिनीचे आरोग्य सांभाळत कमी खर्चात विद्यापीठाच्या शास्त्रज्ञ यांच्या शेतीच्या सुधारित पद्धतीचा अवलंब करून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशिक्षणात मार्गदर्शन मिळणार आहे. यावेळी पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद आरसुळ, तालुका समन्वयक असलम बेग यांची उपस्थिती होती.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# महिलांचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान : पौर्णिमा केरकर

आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** महिलांचा सन्मान म्हणजे समाजाचा सन्मान असतो. अवतीभवती परिसर वैचारिक उंची, मनातलं व्यक्त करता येत नाही. आपण कितीही आकाशात भरारी घेतली तरी आपले पाय उंबऱ्याच्या आत असतात. आपल्या घरातील व कुटुंबातील आई,बहीण, नणंदा, सासू यांचे सहकार्य लाभत असते. आपण जे करतो त्याचा अभिमान जरुर असला पाहिजे. आपल्याला विरोध झाला पाहिजे म्हणजे आपली आत्मशक्ती वाढते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका व सामाजिक कार्यकर्त्या प्रा. पौर्णिमा केरकर यांनी केले.

साहित्यलेणी प्रतिष्ठानने कला आणि संस्कृती संचालनालयाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या सात कर्तृत्ववान महिलांच्या सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या.सौ. दीपा मिरिंगकर आणि कालिका बापट यांचीही यावेळी भाषणे झाली. रजनी रायकर यांनी सूत्रसंचालन केले. स्वागत व प्रास्ताविक सौ. चित्रा क्षीरसागर यांनी केले. आभार प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांनी मानले. इंदुमती परब आणि सृष्टी नाईक यांनी मान्यवरांना पुष्प प्रदान केले.

या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून ऑर्चिड ॲवॉर्डच्या आशा आरोंदेकर उपस्थित यावेळी डॉ. अनघा नासिरकर, ॲड. सिद्धी पारोडकर, सौ. माधुरी बेळगावकर, अस्नोड्याच्या सरपंच सपना मापारी, म्हापशाच्या नगरसेविका डॉ. नूतन डिचोलकर,उषा नार्वेकर, सुगंधा बोरकर यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. साहित्यलेणी प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाची सर्वांनी प्रशंसा केली. आपण विविध क्षेत्रात काम करू लागलो ते घरातील मंडळींच्या सहकार्यानेच, असे सर्वांनी सांगितले. उद्योग असो की राजकारण, व्यवसाय असो की समाजसेवा सर्व सन्मानार्थींना सासू, आई, सुना, मुले आणि सासरे व वडिलांनी सहकार्य केले. बाहेरचा भाग तुम्ही पाहा घरातील कामे आम्ही करू असे या सगळ्यांनी सन्मानार्थींना सांगितले. आपल्याला लहानपणापासून व्यवसाय व उद्योगाची आवड होती. आई व वडिलांनी तसेच पतीने उत्तम साथ दिल्यानेच आज ही भरारी घेतल्याचे, प्रतिपादन उद्घाटिका व उद्योजिका आशा आरोंदेकर यांनी केले.

# हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी गुढी पाडव्याला भव्य शोभायात्रा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रथेनुसार गुढीपाडव्याची भव्य शोभायात्रा चैत्र शुध्द १ प्रतिपदा, बुधवार, २२ मार्च रोजी दुपारी ३ वाजता संभाजीनगरचे आराध्य दैवत राजाबाजार येथील संस्थान गणपतीचे पुजन करुन संस्थापक अध्यक्ष शिवसेना नेते माजी खासदार चंद्रकांत खैरे व यावर्षीच्या हिंदु नववर्ष स्वागत समितीचे अध्यक्ष जयवंत (बंडू) ओक यांच्या प्रमुख उपस्थीतीत सुरुवात होणार आहे. शोभायात्रा शहागंज, गांधीपुतळा, सराफा रोड, सिटीचौक, गुलमंडी, औरंगपुरा मार्गे खडकेश्वर येथील महादेव मंदिर मैदानात पोहोचणार असुन, सायंकाळी ७ वाजता, १०८ भागवताचार्य श्री गोपालनंदजी महाराज, सुवर्णपालेश्वर, संस्थान कन्नड यांच्या अमृतवाणीने व मार्गदर्शनाने श्री खडकेश्वर शिव मंदिर येथे मिरवणुकीचा समारोप होणार आहे.

या शोभायात्रेत श्री विभुषीत जगतगुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्याजी महाराज संप्रदाय, राष्ट्रसंत श्री भैय्यु महाराज सुर्योदय परिवार, संत श्री वारकरी संप्रदाय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, मंदिर संरक्षण राष्ट्रीय धर्म संसद, विश्व हिंदु परिषद, आर्य समाज, बजरंग दल, शिवसेना-युवासेना, जय चतुर्थी प्रतिष्ठाण, रेणुका माता मंदिर ट्रस्ट, वीरशैव लिंगायत व जंगम समाज, श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, सनातन संस्था, पतीत पावन संघटना, स्वा. वीर सावरकर प्रेमी मित्र मंडळ, ब्राम्हण युवक मंडळ, पुरोहित संघ, सकल मारवाडी समाज, खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत, श्री योग वेदांत सेवा समिती-संतश्री आसाराम बापु संत सेवा संघ, माहेश्वरी समाज, माहेश्वरी युवा मंच, माहेश्वरी महिला मंडळ, माहेश्वरी प्रगती मंडळ, रेड स्वस्तिक सोसायटी, वेदविद्या प्रचार समिती, इस्कॉन, शिवराम प्रतिष्ठाण, गुजराती समाज, गुजराती समाज युवा मंच, गुरुव्दारा गुरुगोविंदसिंगपुरा, सिंधी कॉलनी, गुरुव्दारा, धावणी मोहल्ला, मेहगाव, अखिल भारतीय कुमावत समाज, राजपुत संघटना, राजपूत संघर्ष समिती, श्री गुरुदेव सेवा मंडळ, श्री समर्थ सदगुरु किसनगिरी बाबा भक्त मंडळ, श्रीराम मंदिर ट्रस्ट, जसवंतपुरा, जनसेवा क्रिडा व सांस्कृतिक मंडळ गवळीपुरा, अखिल भारतीय वारकरी मंडळ, संत निरंकारी संघ, स्वाध्याय परिवार, संतकृपा प्रतिष्ठाण, अनिरुध्द बापु उपासना फाऊंडेशन, भगवान महाराज संप्रदाय, सिंधी समाज बहावलपुरी पंचायत, सधांशु महाराज संप्रदाय विश्वजागृती मिशन सत्संग समिती, अध्यक्ष महावीर जयंती उत्सव समिती, अग्रवाल दिगंबर जैन मंदिर सराफा, अग्रवाल दिगंबर जैन मंदिर हडको, श्री श्री रविशंकर , पतंजली योगपीठ, भजनी मंडळ, ब्रम्हवृंद मित्रमंडळ, मराठा समजा, पेशवा संघटना, शिवसेना महिला आघाडी, दत्तात्रय सत्संग मंडळ पारंपारिक वेशभुषतो विविध सांप्रदाय सहभागी होणार आहेत. मिरवणुकीत धार्मीक, सजीव, निर्जीव देखावे, जनजागृती देखावे, ऊंट, घोडे, रथ, विविध बॅण्ड पथक हे आकर्षण असणार आहे.

# अवकाळीचा फटका, रब्बी पिकांची नुकसान तर कुठे आंब्याची नासाडी

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर परिसरात शुक्रवारी मध्य रात्री झालेल्या अवकाळी पावसाचा मोठा तडाखा बसला आहे. सुलतानपूरसह परिसरातील भांडेगाव, खांडी पिंपळगाव, माटरंगाव, वडोद, कानडगाव आदी गावासह परिसरात कोसळलेल्या अवकाळी पावसाने शेतातील उभ्या रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोसाट्याचा वारा असल्याने शेतातील उभे गहू, ज्वारी, मका, कपाशी आदी पिके आडवी झाली असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान भरपाई देण्याची मागणी पावसामुळे झालेल्या नुकसानीची पंचनामे करून त्वरित भरपाई देण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.





# खांडी पिंपळगाव चेअरमनपदी अण्णा श्रीखंडे, व्हाईस चेअरमनपदी रावसाहेब महालकर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुका खुलताबाद येथे निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक डॉ. आम्रपाली काशीकर मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली निवड पार पडली सुषमा साबळे सहकार अधिकारी व योगेश दांडेकर व आर व्ही मानकापे गटसचिव यांच्या उपस्थितीत निवड पार पडली. सविस्तर माहिती अशी की, खांडी पिंपळगाव येथील रा.सो.का. सहकारी सोसायटी स्थापना दिनांक 31/ 12/ 1959 रोजी स्थापना झाली असून तब्बल 63 वर्षा नंतर एकूण 13 उमेदवारांची बिनविरोध निवड करण्यात आली होती. आज बहुमताने सहा उमेदवारा विरुद्ध खालील सात उमेदवाराने बहुमताने बाजी मारत विजयी घोषित करण्यात आले. चेअरमन- पदी अण्णा उत्तम श्रीखंडे तर व्हाईस चेअरमन- पदी रावसाहेब नामदेव महालकर, सदस्य, अशोक बळवंत महालकर, निसार उस्मान सय्यद, नामदेव शहाजी भालेराव, केदार सांडू कोकणे, कमलबाई कारभारी श्रीखंडे या सर्व सदस्यांनी एकतर्फी मतदान करून सहा विरुद्ध सात बहुमताने विजयी झाले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष मुख्तार सय्यद, दामोदर महालकर, पोलीस पाटील जनार्दन उबाळे, पो. हे.कॉ. दांडगे सर, होमगार्ड मुळे सर , रशीद सय्यद शेषराव महालकर, कैलास रामराव, कैलास गायकवाड, अर्जुन काका महालकर, पंडित आधाने, गणेश बन, मच्छिंद्र उबाळे, राधाकिसन उबाळे, नवनाथ पुंजाराम महालकर, अनिल कारभारी श्रीखंडे, रमेश शिल्लाडे, अंकुश महालकर, गंगाधर कोकणे, वैजिनाथ कोकणे, ज्ञानेश्वर कोकणे, काकासाहेब कोकणे, नवनाथ कोकणे, सुभाष भालेराव, पांडुरंग भालेराव, बबन भालेराव, जिलानी पठाण, दिलावर पठाण, काकासाहेब महालकर, राजू श्रीखंडे, जीवन राठोड, अंबर सिंग राजपूत, सुनील राठोड, देविदास वाघचौरे, अंकुश श्रीखंडे, शरद श्रीखंडे, सुनील श्रीखंडे व इतर व गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला मंडळ तरुण मंडळ पुरुष मंडळ यांनी खांडी पिंपळगाव येथे मारुती मंदिरासमोर निवड झालेल्या उमेदवाराचे पुष्पहार फुलगुच्छ देऊन शब्दसुमनाने अभिनंदन केले व पुढच्या वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती फुलंब्री कार्यकारिणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर 132 वि जयंती उत्सव समिती फुलंब्री कार्यकारणी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडक 132 वि जयंती उत्सव समिती फुलंब्री कार्यकारणी वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते राजू दादा प्रधान यांच्या नेतृत्वात संपन्न करण्यात आली. यावेळी उत्सव समिती अध्यक्षपदी आकाश सुभाष गंगावणे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी सचिन पगारे व शुभम ससाने कार्याध्यक्ष विकास प्रधान सचिव सचिन प्रधान निलेश प्रधान कोषाध्यक्ष अभिजीत बनकर सागर गवळी सहसचिव साहिल गंगावणे, गौतम कचरू, गंगावणे सदस्य सुरेश दादा प्रधान, गौतम दादा गंगावणे, भीमराव गंगावणे, सुरेश गंगावणे, रमेश गंगावणे, शामराव हिवराळे, डॉक्टर हिवराळे, साहेबराव बनकर बाळू, बन्सीधर गंगावणे, बाळू नारायण गंगावणे, साहेबराव गंगावणे, राजू हिवराळे, रंगा भुईगळ, सुमित प्रधान, बाबासाहेब पांडुरंग गंगावणे, अजय गंगावणे, रवी साठे, राजू हिवराळे, अमोल गंगावणे, बाळू गंगावणे, सुरेश गंगावणे, अशोक गवळे, बबन प्रधान, विजय गवळे, बाळू नारायण गंगावणे, राज गंगावणे, संजय इंगळे, आकाश गंगावणे, दिलीप गंगावणे दिनेश खंडाळे बबन गायकवाड बबन प्रधान सुषमेश प्रधान संदीप प्रधान जितेंद्र साळवे, बंटी गंगावणे, विकी गंगावणे, प्रतीक वाहूळ बाबासाहेब मधुकर गंगावणे किशोर गंगावणे पंकज खंडागळे, अभिराज गंगावणे, अमोल मिलिंद गंगावणे सचिन ढोले शुभम गंगावणे, आकाश



संकपाळे, बाळू साहेबराव गंगावणे, सागर गंगावणे, सागर गवळी अतुल गवळी विशाल बाबुराव गंगावणे, मिलिंद बाबुराव गंगावणे, विशाल गवळी, वैभव घाटे कचरू गंगावणे चिंतामण मोरे, संदीप मोरे, संतोष ढोले कुणाल कैलास गंगावणे संतोष ढोले नवनाथ शेवाळे अनिल प्रधान योगेश प्रधान सचिन ढोले निलेश प्रधान निलेश दनके इरफान सय्यद अर्जुन गंगावणे सिद्धार्थ पगारे सांडू गंगावणे, अशोक गंगावणे यश बोर्डे संजय बबन प्रधान, प्रमुख मार्गदर्शक- सुहास भाऊ शिरसाट, राजेंद्र ठोंबरे, (मा जिल्हा परिषद अध्यक्ष औरंगाबाद) भगवान भाऊ गंगावणे, संदीप बोरसे, जे.पी. शेजवळ, अजगर पटेल, योगेश मिसाळ, बंटी देशमुख, रऊफ शेख नवनाथ विधाटे, इमरान खान, धनंजय श्रीमंत, सुभाष नागरे, मुदत सर पटेल, नंदू हापत महावीर, जयस्वाल देविदास भंगारे आनंदा ढोके जहीर चिस्ती रजाक हापीसाहब प्रभाकर गणेश राऊत संतोष धुंडे रहू कुरेशी चंद्रकांत जाधव, स्माईल खान सचिन ढोले अकबर पटेल रवी कासार राम बनसोड राजेंद्र नागरे अजय शेरकर नागेश भारद्वाज आप्पा सीमंत दादासाहेब मोरे जयपाल राजपूत संजय जाधव सोमीनाथ तर्फे मंगेश गुंजाळ आदी.

१८१ दिवस
मुदत ठेवीवर मिळवा
11% व्याजदर
* नियम व अटी लागू

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स


चंदुलाल बियाणी
चेअरमन

कार्यरत शाखा :
मुख्य कार्यालय व शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
पंचशिल नगर शाखा : विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
मुख्य शाखा विस्तारित कक्ष : ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ : दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२ उड्डाण पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
सिरसाळा शाखा : बडे निवास, जुने बस स्टँड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
अंबाजोगाई शाखा: प्रशांत नगर, बस स्टँण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ : मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२ घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
बीड शाखा : जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
सोनपेठ शाखा : स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
गंगाखेड शाखा : डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा : अपना बजार २०५ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
राजा बजार शाखा : बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
माळीवाडा विस्तारीत कक्ष : नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803
अंबड शाखा : जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
जालना शाखा : मेन बस स्टँड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
जालना विस्तारीत कक्ष-१ : जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
नांदेड विस्तारीत कक्ष : पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
उदगीर विस्तारीत कक्ष : पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
टोकवाडी विस्तारीत कक्ष: परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
दिंद्रुड विस्तारीत कक्ष : शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
लातूर विस्तारीत कक्ष : कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
औराद विस्तारीत कक्ष : मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
बीड विस्तारीत कक्ष : मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
उमरगा शाखा : शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
परभणी शाखा: कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
अहमदनगर शाखा: शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
केज शाखा : वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
माजलगाव शाखा : गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.
नियोजित शाखा : धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177




# सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांची अमूलला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड आनंद येथे घेतले तीन दिवस प्रशिक्षण मूचकुवा बायोगॅस प्रकल्प, सुधन स्लरी प्रक्रिया केंद्राची पाहणी सहकारातून समृध्दी कशी साधता येते याबाबत डॉ व्हर्गीस कुरियन यांनी केलेल्या महान कार्याची सखोल माहिती मिळाली. सोयगाव कृषी तंत्रज्ञान व्यवसथापन यंत्रणा आत्मा अंतर्गत सोयगाव तालुका कृषी अधिकारी कार्यालय मार्फत राज्य बाहेरील शेतकरी प्रशिक्षण योजेनेत दुग्ध व्यवसायाचे तालुक्यातील शेतकऱ्यांनी आनंद गुजराथ येथील राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड येथे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण घेतले. शेतकऱ्यांना डेअरी व्यवसायातील परिपूर्ण ज्ञान मिळावे यासाठी आत्मा अंतर्गत दि १३ ते १५मार्च दरम्यान आनंद ( गुजराथ ) येथील राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड येथे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यात दुग्ध व्यवसायात सहकाराचे महत्व त्यातून प्रगती तसेच अतिरिक्त आर्थिक स्त्रोत वाढविण्यासाठी शेणापासन बायोगॅस व त्यामधून निघणाऱ्या स्लरी वर प्रक्रिया, जनावरांचा संतुलित आहार, चारा व्यवस्थापन, पशू स्वास्थ्य याविषयावर प्रशिक्षण देण्यात आले. तसेच क्षेत्र भेटी दरम्यान देशातील पहिली स्लरी वर प्रक्रिया करणारी महिलांची सहकारी संस्था व सुधन स्लरी प्रक्रिया उद्योगाला शेतकऱ्यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली
गाव पातळीवर सहकारी संस्था कसे काम करते हे पाहण्याठी एका सहकारी डेअरी ला भेट दिली. तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ याच्या मार्गदरशनाखाली व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए एस महाजन यांच्या सहयोगाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड चे सावन गोहेल यांनी प्रशिक्षण प्रमुख म्हणून काम पाहिले. राजू दुतोंडे व मंगेश सोहनी यांनी कृषी विभाग, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड चे आभार मानले.

# रथाचे व विकासाचे चाक समान गतीने फिरले तर विकास होतो

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शासनाकडून गावाच्या व रस्त्याच्या विकासासाठी मिळालेला निधीचा विनियोग योग्य व नियोजन पध्दतीने व समन्वयाने झाला तर विकास योग्य प्रकारे होतो व लोकल्याणाची कामे पूर्णत्वास जातात असे प्रतिपादन वैजापूर-गंगापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रा.रमेश पा. बोरनारे यांनी शनिवार( ता,१८ )रोजी वैजापूर ते खंबाळा या रस्त्याचे व येवला नाका ते कावेरी मंदिर या चौपदरीकरणं कामाचे भूमिपूजन प्रसंगी केले.ते पुढे म्हणाले की गाव तेथे डांबरीकरण रस्ता असे माझे नियोजन आहे. यासाठी आ.बोरनारे यांच्या विशेष प्रयत्नाने या रस्त्याच्या डांबरीकरण कामासाठी सात कोटी रुपये मंजूर झालेले आहेत तर कावेरी मंदिर ते मापारी वस्ती डांबरीकरणं साठी पन्नास लाख रुपये मंजूर झालेले आहेत. या कामाचा शुभारंभ आमदार बोरनारे यांच्या उपस्थितीत जेष्ठ नागरिक गुलाबराव साळुंके,पोपट भोसले, अण्णासाहेब शेळके, रतन वाणी, उत्तमराव साळुंके, बाबुराव वाणी, साहेबराव मापारी,चांगदेव इंगळे यांच्या हस्ते पूजन करून व कुदळ लावून करण्यात आला, शिवसेना तालुकाप्रमुख ( शिंदे गट ) राजेंद्र पा.साळुंके, युवा प्रमुख श्रीकांत साळुंके, शहर प्रमुख पारस घाटे यांनी व सहकाऱ्यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. बाबासाहेब पुतळे यांनी पन्नास फुटाचा गुलाब फुलांच्या हाराने व्यासपीठावर आमदारासह उपस्थित असलेल्या सर्वांचा सत्कार केला प्रास्ताविक व सूत्रसंचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. राजेंद्र पाटील साळुंके व या परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अन्नछत्रासाठी भाविकांकडून दहा लाखांची देणगी

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरला बेंगलोर येथील भाविक श्रीमती रोहिणी नंदन निलेकणी यांनी अन्नदानासाठी रक्कम रू.10.00/- लक्ष रूपयांची देणगी धनादेश स्वरूपात दिली आहे.
त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीच्या वतीने लेखा अधिकारी अनिल पाटील यांच्या हस्ते येथोचित मानसन्मान करण्यात आला. त्यावेळी मंदिर समितीचे विभाग प्रमुख विनोद पाटील व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते. मंदिरे समितीच्या वतीने श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये दैनंदिन दुपारी 12.00 ते 2.00 व सायंकाळी 7.30 ते 9.30 या वेळेत मोफत



अन्नदान करण्यात येते. त्याचा दैंनंदिन 1200 ते 1500 भाविक लाभ घेतात. सदर अन्नछत्रात अन्नदान करण्यासाठी श्रीमती रोहिणी निलेकणी, बेंगलोर यांनी देणगी दिली आहे.

# मतदार यादी आता आडनावाप्रमाणे

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मतदार यादीतील एकाच कुटुंबातील व्यक्तींची नावे वेगवेगळ्या वस्त्यांच्या यादीमध्ये जोडली जात असल्याने तपासणी दरम्यान अडचणी येतात. त्यामुळे ही यादी आडनावाप्रमाणे तयार करावी ही केंद्र अधिकाऱ्यांनी ( बीएलओ ) केलेली विनंती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी योग्य ठरवत त्यानुसार मतदार यादी तयार करण्याचे संकेत दिले. देशपांडे सध्या पूर्व विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. शुक्रवारी त्यांनी नागपूर जिल्ह्यातील मतदार यादी व मतदार नोंदणीच्या कामाचा आढावा घेतला. बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, उपजिल्हाधिकारीमीनल कळसकर, तहसीलदार राहुल सारंग, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेल बीएलओ उपस्थित होते. निवडणूक आयोगने अचूक मतदार यादी तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. यादीतून एक नाव दोन वेळा असलेली, मृत मतदारांची नावे तत्काळ वगळावी. निवडणुकीस अजून एक वर्षाचा कालावधी असून या काळात मतदार यादी अचूक करण्याचे काम बीएलओनी करावे, असे निर्देश देशपांडे यांनी दिले. नवमतदार नोंदणीसाठी शाळा, महाविद्यालयात जावे, अस्पष्ट छायाचित्र असणाऱ्या मतदारांना शोधून त्यांची नवीन छायाचित्रे काढावी. यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी देशपांडे यांनी निवडणूक अधिकारी व मतदान केंद्राधिकारी यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

# न.पा. कामगार संघटनेचा जुनी पेन्शन, इतर मागण्यांसाठी थाळी नाद

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** महाराष्ट्र राज्य नगरपंचायत नगर परिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या व फेडरेशनच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय कर्मचारी, महानगरपालिका नगरपालिका कर्मचारी यांचा १४ मार्च २०२३ पासून राज्यव्यापी संप चालू आहे आज पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटनेच्या वतीने राज्याचे जनरल सेक्रेटरी ॲड. सुनिल वाळूजकर संघटनेचे कार्याध्यक्ष नानासाहेब वाघमारे अखिल भारतीय मजदूर सफाई कॉंग्रेस चे अध्यक्ष गुरु दोडिया यांच्या नेतृत्वाखाली शासनाचे मागण्याकडे लक्ष वेधण्यासाठी नगरपरिषदेसमोर थाळी नाद आंदोलन करण्यात आले यावेळी बोलताना ॲड. सुनिल वाळूजकर यांनी सांगितले की, आज मुख्यमंत्री मा एकनाथजी शिंदे साहेब यांनी समन्वय समितीचे राज्याचे अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांना चर्चेसाठी मुंबई येथे बोलवले असून या मीटिंगमध्ये महाराष्ट्रातील महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायत कर्मचारी व राज्य शासकीय कर्मचारी संघटना यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, कंत्राटी हंगामी कर्मचारी यांना सेवेत कायम करावे, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समान कामाला समान वेतन द्यावे व तोपर्यंत किमान वेतन देण्याची कारवाई करावी, सन २०१५ पासून नवीन स्थापन झालेल्या नगरपंचायत मधील उद्घोघोषणे पूर्वीचे व उद्घोघोषणे नंतरचे सर्व कर्मचारी व सफाई कर्मचारी यांचे विनाशर्त विना अट समावेशन करावे. नवीन नगरपंचायतीमधील सफाई कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करावा, नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी यांना दहा वीस तीस ची आश्वासित प्रगती योजना लागू करावी, अनुकंपाची भरती त्वरित करावी व इतर मागण्या वर चर्चा होणार आहे आज संपाचा तिसरा दिवस आहे शासनाचे वरील मागण्या मान्य होण्याच्या दृष्टीने लक्ष वेधण्यासाठी आज नगरपरिषदेसमोर थाळी नाद आंदोलन करण्यात आले असल्याचे अँड.सुनिल वाळूजकर यांनी सांगितले हे थाळी नाद आंदोलन यशस्वी करण्यासाठी पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष नानासाहेब वाघमारे सहकार्याध्यक्ष शरद वाघमारे नागनाथ तोडकर उपाध्यक्ष संतोष सर्वगोड, किशोर खिलारे, जयंत पवार,अनिल गोयल, दत्तात्रय चंदनशिवे,प्रीतम येळे,तनुजा सीताप, संभाजी देवकर, धनजी वाघमारे, दिनेश साठे, संजय वायदंडे, महावीर कांबळे, ओंकार वाघमारे, राम सर्वगोड, रमेश पवार,चेतन चव्हाण, शकील देवळे, कविता दंदाडे, विद्या भोरकडे,लता सर्वगोड, हेमा आठवले, रेश्मा चंदनशिवे,रवी दोडीया, राणी गायकवाड, सर्व सफाई कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दिव्यांगांना कुठेही कमी पडणार नाही

## आमदार मेघना बोर्डीकर : जिंतूरात दिव्यांगाना साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बि.डी.रामपूरकर**

**जिंतूर :** जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघातील दिव्यांग महिला पुरुष लहान बालक यांना आवश्यक त्या साहित्याच व जयपूर फूट आणि मुक बधीर यांना अँड्रॉइड मोबाईल च वाटप आज जिंतूर येथे भारतीय जनता पार्टीच्या जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघाचे आमदार मेघना दीदी बोर्डीकर साकोरे यांच्या हस्ते सातशे 747 लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले यावेळी बोलताना मेघना बोर्डीकर म्हणाल्या जिंतूर सेलू मतदारसंघात तसेच काय परभणी जिल्ह्यातील अपंगांच्या पाठीशी मदतीसाठी मी सदैव तत्पर असून मी त्यांच्या साठी कुठेही कमी पडणार नाही आज जिंतूर येथील बोर्डीकर पोतदार इंग्लिश स्कूलच्या भव्य मैदानावर दिव्यांग साहित्याचे वाटप करण्यात आलं पात्र लाभार्थ्यांची निवड यापूर्वी घेतलेल्या अपंगाच्या शिबिरात करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली सुमारे ७२७ लाभार्थ्यांना आज इलेक्ट्रिक सायकल तीन चाकी सायकल जयपूर फूट कुणाला हाताचे व पायाचे मोजमाप करून दिल्यानंतर जयपूर फूट मागून तर काहींना अँड्रॉइड मोबाईल वाटप करण्यात आले या कार्यक्रमासाठी जिंतूर सेलू मतदारसंघातील शेकडो लाभार्थी यांनी गर्दी केली तर नोंदणी न केलेल्या व प्रत्यक्ष दिव्यांग असलेल्या व्यक्तींनीही या ठिकाणी मोठी गर्दी केली होती त्यांच्यासाठी लवकरच अपंगाचे तपासणी शिबिर घेऊन त्यांना आवश्यक त्या साहित्याची नोंदणी करून ते साहित्य येत्या दोन महिन्यात मागविण्यात येईल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले जिंतूर सेलू मतदारसंघातील या लाभार्थ्यांना सुमारे एक कोटी रुपयाचे साहित्य आज या ठिकाणी वाटप झाल्याचे सांगण्यात आले कार्यक्रमाच्या व्यासपीठावर भाजपाचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण दादा बुधवंत भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप कोकडवार डॉक्टर पंडित दराडे प्रदीप चौधरी महिला आघाडी च्या सौ बार्शीकर ताई शहर अध्यक्ष सौ.निर्मलाताई बांडे ताई यांच्यासह मान्यवर मंडळी उपस्थित होती संचलन भगत सर तर आभार मेटांगले सर यांनी मानले.



# मुखेड तालुक्यांमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

## रब्बी हंगामातील पीकाचे मोठे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यात अवकाळी पावसाने हजेरी लावत मोठे नुकसान केले. विशेषतः रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा काढणीला आला असताना मोठे नुकसान झाले. अवकाळी पावसामुळे प्रवाशांची तारांबळ उडाली. गेल्या दोन दिवसापासून ढगाळ वातावरणामुळे लहान मुलांना सर्दी खोकला ताप असे आजार वाढले आहेत. काढणीला आलेल्या पिकासाठी शेतकऱ्यांची एकच धांदल उडाली आहे. लग्न जेवणावळी, लग्न मंडप यातून सावरण्यासाठी वराडी मंडळींची तारांबळ उडत आहे.

अशा अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे रब्बी पीकांचे खुप मोठे नुकसान झाले आहे. मुक्रमाबाद, गोजेगाव, सावळी, बेन्नाळ, कोटग्याळ, सावरमाळ, रावी, गोणेगाव, ईटग्यासह परिसरात सोसाट्याचा वारा आणि जोरदार अतिवृष्टी झाल्यामुळे पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानाची तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.



कालच्या चक्रीवादळामध्ये रब्बी हंगामातील पिकांसोबत शेतकऱ्यांच्या जनावरांची जीवित हानी झाली आहे .प्रशासनाने याचे पंचनामे तात्काळ दाखल करावेत . आणि सरकारने अधिवेशनातून यासाठी मदत जाहीर केली पाहिजे .वीज आणि वादळामध्ये जनावरांची जिवीत हानी झालेल्या गेल्या आठ-नऊ महिन्यापासूनची मदत अजून मिळालेली नाही . प्रशासनाकडून यासाठी पैसे नाहीत,असे सांगितले जाते .पिकांच्या नुकसानीबद्दल विमा कंपनीचे धोरण केवळ दिशाभूल आणि लूट करणारे झाले आहे .अधिवेशनात यावर ठोस निर्णय झाला पाहिजे .

**शिवशंकर पाटील कलबंरकर,**
**शेतकरी नेते**

# ॲड. द्वारकादास बालमुकुंदजी मंत्री यांचे दुःखद निधन

आधुनिक केसरी न्यूज



**अंबड :** शहरातील ज्येष्ठ विधीज्ञ अँड. द्वारकादास बालमुकुंद मंत्री (काकाजी) यांचे आज दि. 18 मार्च 2023 रोजी दुपारी 1 वाजता हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या 83 व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. काकाजी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग कार्यवाह राहिले होते. विद्याभारती देवगिरी प्रांत अध्यक्ष, विश्व हिंदू परिषद, गोरक्षण विभाग देवगिरी प्रांताचे प्रमुख देखील होते. संघामध्ये मंत्री यांनी अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या. काकाजींनी शैक्षणिक विभागात आवडीने काम केले. देश घडवण्यासाठी विद्यार्थी घडवले पाहिजे असे त्यांचे मत होते. मराठवाड्यातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ,अंबाजोगाईचे ते उपाध्यक्ष राहिले होते. अंबड येथील कै. दत्ताजी भाले विद्यालय उभारण्यात काकाजींचे फार मोठे योगदान होते. तसेच प्रतिष्ठित वकिल म्हणून त्यांनी आपली कारकिर्द गाजवली. वकिल संघाचे ते अध्यक्ष राहिले होते. काकाजींच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. द्वारकादास मंत्री यांच्या पश्चात पत्नी गोमती काकी मंत्री, तीन मुले केदार मंत्री, कैलास मंत्री, किशोर मंत्री, मुलगी नीलिमा व भाऊ जयनारायण मंत्री, पुतणे डॉ. दीपक मंत्री, संजय मंत्री, अभय मंत्री, सुना, नातू व नाती असा मोठा मंत्री परिवार आहे.

त्यांचा अंत्यविधी उद्या दिनांक 19 रविवार रोजी सकाळी 9 वाजता मारवाडी स्मशानभूमी ,अंबड येथे होईल.




महाराष्ट्र Business Katta







